जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
गुरुवार, दि. ५ जून २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३०। अंक : २८३। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८+४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध



## थोडक्यात महत्त्वाचे...



### चाळीसगावात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू

**चाळीसगाव :** येथील नगरपालिकेने हाती घेतलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेस ३ जूनपासून सुरुवात झाली. मालेगाव रोड परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या अतिक्रमणधारकांना किमान २०० जणांना नगरपालिका प्रशासनाकडून नोटीसा देण्यात आल्या होत्या. यात काहींनी स्वतः तर नगरपालिका कर्मचारी यांच्या टीमने नगरपालिकेचे मुख्याधिकारी सौरव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळपर्यंत ३५ ते ४० छोटी-मोठी दुकाने हटवण्यात आली, असे अतिक्रमण हटाव मोहिमेचे पथकप्रमुख दिनेश जाधव यांनी सांगितले. अतिक्रमण काढण्यासाठी नगरपालिका प्रशासनाकडून यावेळी नगरपालिका ४० ते ५० कर्मचारी, अधिकारी पोलिसांचे पथक १ जेसीबी, २ ट्रॅक्टर यात पथकप्रमुख दिनेश जाधव यांच्या मार्गदर्शनाने बांधकाम विभागाच्या दीपाली गावित, संजय गोयर, सुनीता किनोर, दीपक देशमुख, विजय जाधव व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### फैजपुरात महिलेच्या बदनामीप्रकरणी एकास अटक

**फैजपूर, ता. यावल :** येथील एका ४२ वर्षीय महिलेसोबत ३२ वर्षीय तरुणाने बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित करून ते फोटो काढून ते सोशल मीडियावर व्हायरल करून समाजात बदनामी केल्याप्रकरणी फैजपूर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. २० जून २०२४ ते १७ मार्च २०२५ या काळात ही घटना घडली. याप्रकरणी पीडित महिलेने तरुणाविरुद्ध फैजपूर पोलिसात २ जूनला मध्यरात्री गुन्हा नोंदविल्याने या तरुणास पोलिसांनी अटक केली. या गुन्ह्याचा तपास सपोनि रामेश्वर मोताळे यांच्या मार्गदर्शन खाली पोलीस करीत आहेत

### के. के. पाटील चाळीसगावचे नूतन डीवाय. एस. पी.

**चाळीसगाव :** चाळीसगाव उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून के. के. पाटील यांच्या नियुक्तीचा आदेश काढला आहे. काही दिवसांपूर्वी चाळीसगाव शहराला अवगत असलेले चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक म्हणून काम पाहिलेले के. के. पाटील पुन्हा चाळीसगाव उपविभागाचे उपविभागीय अधिकारी म्हणून येणार आहेत.

### चाळीसगाव बाजार समितीचा आजचा समारंभ रद्द

**चाळीसगाव :** येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कमान व दवाखान्याचा उद्घाटन समारंभ रद्द करण्यात आला आहे. हा कार्यक्रम ५ जूनला होणार होता. पुढील तारीख कळविण्यात येईल. याची तालुक्यातील शेतकरी, व्यापारी व बाजार समिती संलग्न घटक हमाल मापाडी घटकांनी नोंद घ्यावी, असे बाजार समिती सभापतींनी कळविले आहे.

### जय गणेश फाऊंडेशनतर्फे ९ जूनला बुद्धिबळ स्पर्धा

**भुसावळ :** येथील जय गणेश फाऊंडेशनच्या स्पोर्ट्स क्लबतर्फे स्व.चैत्राम पवार स्मृती बुद्धिबळ स्पर्धा सोमवार, दि.९ जून रोजी सकाळी ९ वाजता आयोजित केली आहे. सुरभी नगरातील नवसाचा गणपती मंदिरात आयोजित या स्पर्धेत पहिला गट इयत्ता पाचवी ते सातवी, दुसरा गट आठवी ते दहावी व तिसरा खुल्या गटात स्पर्धा होईल. नाव नोंदणीसाठी स्पर्धकांनी हर्षल वानखेडे ७०५७७४४७३० किंवा नचिकेत यावलकर ७२१९१८१७८१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जय गणेश स्पोर्ट्स क्लबतर्फे करण्यात आले आहे.

### स्वाभिमानी मराठा महासंघ इतिहास आघाडी उपाध्यक्षपदी इंद्रजीतसिंह घोरपडे



**मुंबई:** स्वराज्याचे शिलेदार म्हाळोजी बाबा घोरपडे व बहिर्जी घोरपडे - हिंदुराव गजेंद्रगडकर यांचे वंशज श्रीमंत इंद्रजीत सिंह घोरपडे हिंदुराव गजेंद्रगडकर यांची आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाच्या इतिहास आघाडी उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

समाजाचे प्रश्न सोडविण्यासोबत छत्रपती शिवरायांचा इतिहास, गडकिल्ले, शिवरायांची युद्धकला शिवकालीन कृषी धोरणे, गोवंशाच्या माध्यमातून समृद्ध गाव इत्यादी धोरणे गावागावातील तरुणांपर्यंत पोहचावी यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल असे नवनिर्वाचित उपाध्यक्ष इंद्रजीत सिंह घोरपडे हिंदुराव गजेंद्रगडकर यांनी नियुक्ती बाबत आपली प्रतिक्रिया देताना सांगितले.

आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाचे कार्य जागतिक पातळीवर सुरू आहे, मराठा कुर्मी राजपुत समाजाला न्याय देण्यासाठी संघटन प्रयत्नशील आहे असे ही ते म्हणाले. या नियुक्ती बद्दल आंतरराष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघाचे अध्यक्ष स्वराज्य भुषण एम के बी एन सागर, कार्याध्यक्ष रवी प्रताप पटेल, उपाध्यक्ष हेमंत सरकार, सचिव चैतन्य रावल, इतिहास आघाडी अध्यक्ष रवींद्र जगदाळे, इतिहास आघाडी कार्याध्यक्ष अमरसिंह जाधवराव, आंतरराष्ट्रीय महिला मोर्चा अध्यक्ष किरण शेखावत आदींनी इंद्रजित सिंह घोरपडे यांचे स्वागत केले आहे.

## निधन वार्ता



### विकास लहासे; आज अंत्ययात्रा

**पहूर, ता.जामनेर :** पहूरपेठ येथील संतोषीमाता नगरातील रहिवासी विकास दयाराम लहासे (वय ४६) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी सकाळी ८.३० वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात वडील, दोन भाऊ, एक बहिण, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ते दयाराम ओंकार लहासे यांचे चिरंजीव, तर शिक्षक अशोक लहासे व दिलीप लहासे यांचे भाऊ होत.



### यशोदाबाई कोलते; आज अंत्ययात्रा

**नशिराबाद, ता. जळगाव :-** येथील रहिवासी यशोदाबाई मधुकर कोलते ( वय ७७ ) यांचे बुधवार, दि ४ जून २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.त्याची अंत्ययात्रा उद्या गुरुवार, दि. ५ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता मुक्तेश्वर नगर, नशिराबाद येथील राहत्या घरून निघेल. त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. टाटा सोलर चे मुख्य व्यवस्थापक सूरज कोलते तसेच ज्ञानेश्वर व महेश यांच्या आई त्या होत.



### सोनू आहिरे

**सोयगाव :** येथील सोनू राजेंद्र आहिरे (वय ३३) यांचे मंगळवारी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात आजोबा, आई, वडील, काका, काकू, पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र आहिरे यांचा तो पुत्र होय.



### मधुकर कोळी

**फैजपूर :** रणगाव, ता रावेर येथील रहिवासी मधुकर रामू कोळी (वय ७०) यांचे ४ जून रोजी उत्तररात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते रणगाव येथील दिनेश कोळी व संदीप कोळी यांचे वडील यांचे होत.

# जिल्ह्यात दोन अपघातात चार ठार, ३२ जखमी

**जळगाव :** जिल्ह्यात बुधवारी झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एकूण चार जण ठार झाले, तर ३२ प्रवासी जखमी झाले. ज्ञानेश्वर झगडू शिवदे (वय ४०) आणि प्रमोद दगडू शिवदे (वय ३५)(दोन्ही रा. खोटे नगर, जळगाव) आणि देवीलाल पन्नालाल लोहार (वय ३८, रा. सुरत) आणि वाहक भगवतीलाल रेवा शंकर (वय २५, रा. उदयपूर, राजेस्थान) अशी मृतांची नावे आहेत

## मुक्ताईनगरजवळ लक्झरीचा भीषण अपघात दोन ठार ३२ प्रवाशी जखमी

**अंतुर्ली, ता. मुक्ताईनगर, ४ जून**

मुक्ताईनगरजवळील कोथळी येथे नादुरुस्त ट्रकला लक्झरी बसने मागून धडक दिल्यामुळे झालेल्या भीषण अपघातात २ जण ठार तर ३२ प्रवाशी जखमी झाले. ही घटना बुधवारी पहाटे पाऊणे पाचच्या सुमारास राष्ट्रीय महामार्गावर कोथळी फाट्यालगत पुलावर घडली. अपघातग्रस्त लक्झरी ही सिहोरी ट्रॅव्हल्स कंपनीची असून, सुरत येथून बुलढाणा जात होती. अपघातात जखमी बहुतांश प्रवाशी बुलढाणा जिल्ह्यातील आहेत. या अपघातात चालक देवीलाल पन्नालाल लोहार (वय ३८, रा. सुरत) आणि वाहक भगवतीलाल रेवा शंकर (वय २५, रा. उदयपूर, राजेस्थान) हे जागीच ठार झाले.





**हे आहेत जखमी**

जखमी ३२ प्रवाशांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा, मेहकर, चिखली तालुक्यातील प्रवाशांसह सुरत येथील प्रवाशी आहेत. जखमींमध्ये लता शालिग्राम देवघामे (वय ४९, रा. वरवंड, जि. बुलढाणा), शालिग्राम रामराव देवघामे (वय ६०, रा. वरखंड, जि. बुलढाणा), ऋषिकेश शालिग्राम देवघामे (वय ३०, रा. वरखंड, जि. बुलढाणा), जयसिंग शिरसाठ (वय ७०, रा. दादुलगव्हाण, मेहकर), राधाबाई जयसिंग शिरसाठ (वय ६०, रा. दादुलगव्हाण, मेहकर), आनंदा जंगलू शिरसाठ (वय २४, रा. दादुलगव्हाण, मेहकर), गजमल हिंमतराव आढाव (वय ४२, रा. लासुरा, जि. बुलढाणा), वर्षा गजमल आढाव (वय ४२, रा.लासुरा, जि. बुलढाणा) मो. अफरोज मो. युनुस (वय ३९, रा. रोहीणखेड, जि. बुलढाणा), कैलास धनराज गुजर (वय ५२, रा. रोहीणखेड, जि. बुलढाणा), सलीमा बी शेख सुपडू (वय ४५, रा. ढोणगा व, सानिया परविन शेख फिरोज (वय १९, रा. ढोणगाव), जयश्री विजय मोरे (वय २०, रा. बंडारी, सोदखेड), रामेश्वर आनंदा काळे (वय ४२), रा. शेणगाव हिंगोली, अनुमुद्रा रामेश्वर काळे (वय २४, रा. काहकर, जि. बुलढाणा), अष्टविनायक रामेश्वर काळे (वय ८ वर्षे, रा. काहकर, जि. बुलढाणा), आवेश शहा बशीर शहा (वय १६, रा. मोताळा, जि. बुलढाणा), जयनूर बी हमीद शहा (वय ६०, रा. मोताळा, जि. बुलढाणा), बब्बू शहा रहेमान शहा (वय ५७, रा. बुलढाणा), गोविंदा अंबादास गुंड (वय ३०, रा. चिखली), उषाबाई संतोष तायडे (वय ५९, रा. रुईखेड मायंबा, जि. बुलढाणा), उदय देविदास शेळके (वय ४१, रा.सारोळा, पि.) ,शेख फिरोज मुस्ताक (वय ४२, रा. सुरत), शबाना बी शे. फिरोज (वय ३६ रा. सुरत), सानिया परवीन (वय २०, रा. बुलढाणा), आदिल शेख बशीर (वय १७, रा. बुलढाणा), कल्याणी गजानन तायडे (वय ७ वर्षे, बुलढाणा), इशिता राजेश वानखेडे (वय १०), आराध्या राजेश वानखेडे (वय ६ वर्ष), समाधान भीमराव बोरकर (वय ३३) यांचा समावेश आहे.

सुरत येथून मेहकर बुलढाणासाठी निघालेल्या यासिहोर ट्रॅव्हल्सचा क्रमांक एआर २० ९५९५ हिने महामार्गावर कोथळी ते सालबर्डी फाटा दरम्यानच्या ओव्हर ब्रिजवर साईड ट्रकला उभ्या असलेल्या ट्रक (क्रमांक आरजे ०९ जीबी ३२४९) हिला मागून जोरदार धडक दिली. जोरदार धडकमुळे ट्रॅव्हल्सची कॅबिन ट्रकच्या एका बाजूने आठ ते दहा फ ूट घुसली.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नागेश मोहिते व सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली तर कोथळी, सलबर्डी आणि मुक्ताईनगर येथील ग्रामस्थांनी मदतकार्य केले.

अपघात इतका भीषण होता की, लक्झरी बसचा दर्शनी भागाचा चेंदामेंदा झाला होता. घटनास्थळी रुग्णवाहिका आणि खासगी वाहनातून जखमी प्रवाशांना उपजिल्हा रुग्णालयात पाचारण करण्यात आले. गंभीर जखमी रुग्णांना जळगावा वैद्यकीय महाविद्यालय येथे हलविण्यात आले तर काही जखमींना सोयीनुसार बुलढाणा जिल्ह्यात हालविण्यात आले आहे.



## जळगावातील दोन सख्ख्या भावांचा करूण अंत

### निमखेडी शिवाराजवळ अज्ञात वाहनाची रिक्षाला धडक; परिसरात शोककळा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ४ जून**

पाणीपुरीसाठी लागणारे सामान घेण्यासाठी रिक्षाने जात असलेल्या दोन सख्ख्या भावांचा निमखेडी शिवारात पहाटे झालेल्या अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीत मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. ज्ञानेश्वर झगडू शिवदे (वय ४०) आणि प्रमोद दगडू शिवदे (वय ३५) अशी मृतांची नावे आहेत. या भीषण अपघातामुळे परिसरात मोठी शोककळा पसरली आहे.

याबाबत माहिती अशी की, खोटेनगरातील ज्ञानेश्वर आणि प्रमोद हे दोघे भाऊ पाणीपुरी विकण्याचा व्यवसाय करत होते. ते दोघे दररोज पाणीपुरीचा माल घेण्यासाठी शिवाजीनगर येथील जुन्या घरी जात असत. बुधवारी देखिल हे दोघे भाऊ रिक्षाने पाणीपुरीचा सामान घ्यायला निघाले होते. निमखेडी येथे कांताई नेत्रालयाजवळ एका अज्ञात वाहनाने त्यांच्या रिक्षाला जोरदार धडक दिली. या अपघातात दोन्ही भाऊ गंभीर जखमी झाले. त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. ज्ञानेश्वर शिवदे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या महिला शहर प्रमुख ज्योती शिवदे यांचे पती होते. प्रमोद हे त्यांचे दीर होते. एकाच कुटुंबातील दोघं सख्ख्या भावांचा मृत्यू झाल्याने शिवदे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघातानंतर दोघांचेही मृतदेह जिल्हा शासकीय रुग्णालयात तपासणीसाठी नेण्यात आले. त्यावेळी त्यांचे नातेवाईक आणि शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने रुग्णालयात जमा झाले होते.

**चालक फरार**

अपघातानंतर गाडी चालवणारा व्यक्ती घटनास्थळावरून पळून गेला आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे. शिवसेना शिंदे गटातील कार्यकर्त्यांमध्ये दुःखाचे वातावरण आहे. पोलीस या अज्ञात वाहनाचा शोध घेत आहे.

# बोदवडच्या शेतकऱ्याचा जिल्हा परिषदेसमोर आत्मदहनाचा प्रयत्न

## जळगावात ४० वर्षांपासून पिकांच्या नुकसानभरपाईसाठी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ४ जून**

लघु सिंचन विभागाच्या पाझर तलावातील पाण्याने सलग ४० वर्षांपासून शेती व पिकांचे नुकसान होत आहे. यामुळे कर्जबाजारी झालो आहे. तरीही प्रशासन दखल घेत नसल्याचा आरोप करीत बोदवड येथील शेतकरी शांताराम रामकृष्ण कोळी व मनकरणाबाई रामकृष्ण कोळी यांनी

बुधवारी ४ जून रोजी सकाळी जिल्हा परिषदेसमोर आत्मदहनाचा प्रयत्न केला. परंतु, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करीत त्यांना जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल पाटील यांच्या दालनात नेले. यावेळी अमोल पाटील यांनी त्यांची बाजू ऐकून घेत त्यांच्यासोबतच थेट शांताराम कोळी यांना सोबत घेत त्यांच्या शेतीकडे रवाना झालेत.

बोदवड येथील शेतकरी शांताराम कोळी यांनी आत्मदहनाचा इशारा दिल्याने सकाळपासूनच पोलिसांनी जिल्हा परिषद येथे बंदोबस्त लावला होता. कोळी हे त्यांच्या आई मनकरणाबाई रामकृष्ण कोळी, मुलासोबत जिल्हा परिषदेत दाखल झाले होते. यावेळी त्यांनी त्यांच्या सोबत पिशवीतून आत्म दहन करण्यासाठी पेट्रोल आणले होते. पिशवीतून पेट्रोलची बाटली काढण्याचा प्रयत्न करीत असतांना पोलिसांनी त्यांना रोखले. यावेळी कोळी यांनी वारंवार पाठपुरावा करुन देखील माझ्या तक्रारीची दखल घेतली जात नसल्याने आपण आत्मदहन करु असा इशारा पोलिसांना दिला. याप्रसंगी पोलिसांनी त्यांची समजूत काढत त्यांना आत्मदहनापासून परावृत करीत कार्यकारी अभियंता अमोल पाटील यांच्या दालनात नेण्यात आले.

### सीईओंवर रोष

शांताराम कोळी यांनी आपण केवळ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबतच चर्चा करु असे ठामपणे सांगितले. परंतु, मुख्य कार्यकारी अधिकारी ह्या दौऱ्यावर गेल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उत्तराने कोळी यांनी संतप्त होत मी आत्मदहनची पूर्व कल्पना देऊन देखील मुख्य कार्यकारी अधिकारी नसल्याने त्यांना शेतकऱ्यांची पर्वा नसल्याचे यातून दिसून येत असल्याचा आरोप कोळी यांनी यावेळी केला.

**उपजिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करणार - अमोल पाटील**

जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल पाटील यांनी तरुण भारतशी बोलतांना सांगितले की, शांताराम कोळी यांचे जे नुकसान झाले आहे, ते भविष्यात पुन्हा होऊ नये याकडे आम्ही लक्ष केंद्रीत केले आहे. संबंधित काम पूर्ण करुन पुढील वर्षी त्यांचे नुकसान होणार नाही याची आम्ही दक्षता घेऊ. त्यांचे प्रकरण ४० वर्षांपासून प्रलंबित आहे. याकरिता उपजिल्हाधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करुन मार्ग काढण्याचा प्रयत्न करु. प्राथमिक स्वरुपात काय करता येईल याबाबत प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन पाहणी करणार आहे.



# जिभेने चित्र रेखाटणाऱ्या राशीचे विलक्षण कौशल्य

## मंत्री गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अनोखी भेट

**तभा वृत्तसेवा**
**पाळधी/भुसावळ/जळगाव, ४ जून**

माणसाच्या जिद्दीपुढे शारीरिक मर्यादा काहीच अडथळा ठरत नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे भुसावळ येथील दिव्यांग मुलगी राशी प्रवीण पाटील हिने. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राशीने तोंडाने एक अप्रतिम अॅक्रेलिक पेंटिंग साकारून त्यांना भेट दिली.

आज गुलाबराव पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन राशीने स्वहस्ते (तोंडाने) तयार केलेले पेंटिंग त्यांच्या हस्ते सुपूर्द करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी तिच्या विलक्षण प्रतिभेने पालकमंत्र्यांसह उपस्थित सर्वांना भारावून टाकले. केवळ चित्रकलेत नव्हे, तर राशीने



जिभेने मोबाइल वापरून पियानो वाजवून उपस्थितांना आश्चर्याचा धक्का दिला. तिचा आत्मविश्वास, कलागुण आणि मनोबल पाहून मंत्री गुलाबराव पाटील यांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात तिचे व तिच्या कुटुंबाचे भरभरून कौतुक केले. 'राशी ही केवळ एक कलाकार नाही, ती एक प्रेरणास्त्रोत आहे. तिच्यात असलेल्या विलक्षण ऊर्जेने आणि जिद्दीने संपूर्ण समाजाला दिशा मिळेल,' असे उद्गार पालकमंत्री पाटील यांनी काढले. त्यांनी राशीच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा आणि आशीर्वाद दिले.

राशीसोबत तिचे वडील प्रवीण पाटील, आई नेहा पाटील, भाऊ सौरभ पाटील, तसेच शिवसेनेचे दीपक धांडे उपस्थित होते. ही घटना केवळ एक भेट नव्हे, तर कलात्मकता, संघर्ष आणि सकारात्मकतेचा संगम आहे. दिव्यांगत्वावर मात करून रसिकांच्या हृदयात घर करणाऱ्या राशी पाटीलचे आयुष्य उजळत राहो, अशी प्रार्थना यानिमित्ताने सर्वत्र होत आहे.

**जळगाव :** शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या महात्मा फुले व्यापारी संकुलातील अतिक्रमण महापालिकेतर्फे काढण्यात आले या ठिकाणच्या लोटगाड्या आणि वस्तु ठेवण्याचे कपाटे मनपा कडून जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे फुले संकुलाने मोकळा श्वास घेतला.

## पिता-पुत्रावर शस्त्राने हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा

**धुळे :** नकाणे रस्त्यावर पिता-पुत्रावर धारदार शस्त्राने हल्ला चढविण्यात आल्याची घटना घडली. या घटनेने परिसरात तणावपूर्ण शांतता निर्माण झाली होती. सिद्धांत मनोज गुप्ता (रा. रेऊनगर, नकाणे रोड, देवपूर, धुळे) यांनी पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. तीत म्हटले आहे की, सोमवारी (२ जून) दुपारी साडेतीनच्या सुम ारास पाणीपुरी विक्रीचा व्यवसाय चांगला चालतो, या कारणावरून मुकेश रवींद्र पाटील याने शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केली. मुकेश पाटील याने धारदार शस्त्राने मारत असताना वडील मनोज गुप्ता यांनी वाचविले. वडिलांच्या उजव्या हाताच्या मनगटावर धारदार हत्यार लागून दुखापत झाली. म ुकेश पाटील याने मारण्याचा प्रयत्न केला. त्याच्याकडून हत्यार घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, उजव्या हाताच्या करंगळी व अंगठा कापला जाऊन दुखापत झाली. रवींद्र गुलाब पाटील (रा. एकवीरानगर), याने प्लास्टिक पाइपने भाऊ व वडिलांना मारून

**Change In Name**

I Have Change
My Name From
**Mohammad Faizan Fakhruddin Mullaji**
To
**Mohammad Faizan Fakhroddin Mullaji**
For all future purpose

थेंब थेंब वाचवा भरपूर पिकवा



ठिबक सिंचन संच
पूर्णतः आधुनिक व वाजवी दरात उपलब्ध.
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना, बँकांना, सरकारी क्रेडीट सोसायटी, को. ऑप. बँक, पतसंस्था, निमसरकारी कार्यालय यांना आमचे पक्षकार **१) सौ. अनिता राजेश शिरसाट, २) श्री. राजेश दंगल शिरसाट,** दोघेही रा. जळगांव, ता.जि. जळगांव यांनी दिलेल्या हक्क व अधिकारानुसार या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) **मिळकतीचे वर्णनः मौजे** पिंप्राळा, ता. जि. जळगांव **येथील गट नं.४० मधील प्लॉट नं.८० यांसी क्षेत्र १५०.०० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील प्लॉट क्षेत्र ७५.०० चौ.मी. व यावरील बांधीव क्षेत्र ३६.७५ चौ.मी., यांसी चतुःसिमाः- पुर्वेस-गट नं. ३९, पश्चिमेस- रोड व वापर, उत्तरेस प्लॉट नं.८१, दक्षिणेस- प्लॉट नं.८० चे उर्वरीत क्षेत्र.** येणेप्रमाणे मिळकतीत जाणे-येणेचे, वहीवाटीचे रस्त्यासह व तदंगभुत वस्तुसूध्दा.

२) सदर मिळकतीसंबंधी मिळकतीचे मुळ मालक श्री. दिनेश मधुकर पवार रा. जळगांव यांनी आमचे उपरोक्त पक्षकार यांचेशी विक्रीचा सौदा केला असुन सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असुन सदर मिळकतीवर कोणाचाही काहीएक हक्क, हितसंबंध, बोजा, तारण, गहाण, जप्तीत, जामीनकीत, कर्ज प्रकरण, वाटणीत, वारसा हक्कात, मेहेरमध्ये, संबंध दिशा व सिमा क्षेत्र वगैरे बाबत कुठल्याही हक्क, दावा, अधिकार असल्यास खालील सही करणार यांच्याशी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ५ (पाच) दिवसांचे आत समक्ष भेटून कागदोपत्री पुरावा दाखवुन तशी खात्री पटवुन आपली लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. तसा कोणताही आक्षेप वर मुदतीत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, बोजाविरहीत व क्लिअर मार्केटेबल टायटलची आहे असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीचा पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग तद्नंतर सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, ही जाहीर नोटीस दिली.

३) **तसेच** सदर मिळकत ही **श्री. दिनेश मधुकर पवार** रा. जळगांव यांनी संजीवी अशोक चव्हाण यांचेकडुन खरेदीखतान्वये विकत घेतलेली असुन त्याबाबतचे खरेदीखत दस्त नं. १२३२/१९९५ अन्वये दि.०४/४/१९९५ रोजी मे. दुय्यम निबंधक साहेब, जळगांव यांचे दप्तरी दस्त नोंदविलेले आहे.

४) सदर दस्ताचे दस्त नं.१२३२/१९९५, दि.४/४/१९९५ रोजीच्या खरेदीखताची मुळ प्रत, एस. आर. आर. पावती, इंडेक्स-२ चा उतारा हे दस्त हरवलेले/गहाळ झालेले असुन त्यांचा आमचे अशिलांनी भरपूर शोध घेतलेला आहे. अशा प्रकारे आमचे अशिलांना सदरच्या दस्ताचे खरेदीखताची मुळ प्रत, नोंदणी पावती व इंडेक्स २ चा उताराची आवश्यकता आहे. काही व्यवहार असल्यास तसे हरकतीद्वारे कळवावे. याउपर सदरचा दस्त न आढळल्यास आमचे अशिल पुढील बँकेसह संपूर्ण व्यवहार करण्यास मोकळे राहतील. सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी सांगितलेवरुन, माहिती दिलेवरुन आज रोजी अशिलांचे खर्चाने प्रसिध्दीस दिली आहे.

**जळगांव**
**दिनांक**
**०४/६/२०२५**

**सही/-**
**अॅड. शैलेश रविकांत नागला**
**ऑफिसः-** फ्लॅट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (श्रध्दा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव.
मो.नं.८२०८००९६८९

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस, वित्तीय संस्थांना, बँक, पतपेढी व **श्री. चंद्रकांत योगीराज ढाके,** रा.वराडसिम, ता.भुसावळ, जि. जळगांव यांना व त्यांचे कुटूंबातील घटकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कीः-

**त्या मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा जळगांव, पोट तुकडी तालुका जळगांव, जि.प. जळगांव, पं.स. जळगांव पैकी **मौजे मन्यारखेडा** येथील ग्रामपंचायत हद्दीतीलः-**मौजे मन्यारखेडा शेत गट नं. १२८ याचे क्षेत्र ०३हे. ३७, यास आकार रूपये २२=५६ पैसे यापैकीः- सामाईकातील माझ्या मालकीचे ०-८-० हिस्सा क्षेत्र १हे.३८.५आर, आकार रूपये ११=२८ पैसे, यास चतुःसिमाः- पुर्वेस- गट नं. १२७ व नशिराबाद शिव, पश्चिमेस- गट नं. १५८, उत्तरेस- गट नं.१२७, १३० व १३१, दक्षिणेस-नशिराबाद शिव**

येणे प्रमाणे चतुःसिमेतील आतील दगड, माती आणि तदंगभूत वस्तुसुध्दा व पुर्वापार बैलगाडी व ट्रॅक्टर वापर वहिवाटीची सामाईक हक्कासहची मिळकत श्री. चंद्रकांत योगीराज ढाके, रा.वराडसिम, ता.भुसावळ, जि.जळगांव यांचे संपूर्ण मालकीची व कब्जे उपभोगातील आहे. सदर मिळकतीच्या इतर अधिकारातील वराडसिम विकास सोसायटी यांचा रक्कम रूपये १,२५,०००/- दि.१०/०८/२०१० तसेच इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया शाखा-कुन्हे पानाचे यांचा रक्कम रूपये ३,७४,०००/- दि.२४/०२/२०१२ रोजीचा नमूद आहे, सदर बोजा व्यतिरिक्त सदर मिळकत निर्वेध निमजोखीम व बोजेविरहीत असुन त्यांना खरेदी देण्याचा हक्क व अधिकार असल्याबाबतचा पुर्ण भरवसा व विश्वास आमच्या अशिलास दिलेला आहे व त्यांचे म्हणण्यावर पुर्ण विश्वास ठेवून आमच्या अशिलांनी सौदा केलेला आहे. त्यानुसार आमचे अशिल लवकरच वर नमूद मिळकतीचे खरेदीखत करणार आहेत तरी तमाम जनतेस वित्तीय संस्थेचे तसेच व वरील व्यक्तीचे व त्यांचे कुटुंबातील घटकांचे काही एक मागणे व म्हणणे वगैरे राहू नये म्हणून त्यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकीहक्क व हितसंबंध, तबदिल संबंधातील दस्त, ताबा हक्क अधिकार, मृत्युपत्रान्वये हक्क, वारस हक्क, कोर्ट कारवाई, जप्ती जामिनकीत अगर मिळकतीचे सिमांकीत वाद, क्षेत्राबाबत व वहिवाटीबाबत तक्रार वाद, सौदापावती करार अगर मुखत्यारनामा, बोजा गहाण वगैरे असल्यास संबंधित व्यक्तींनी **नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत** प्रत्यक्ष भेटून अगर योग्य ती साक्षांकित कागदपत्रे दाखवून व सदर जाहीर नोटीसीस फक्त उत्तर न देता त्या हक्काबाबत समाधान करून द्यावे. याप्रमाणे नोटीस व सुचना मिळूनही कोणीही खाली सही करणार यांना योग्य त्या कागदानिशी प्रत्यक्ष न भेटल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध, निमजोखीम व बोजेविरहीत आहे असे समजून **खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील** व त्यानंतर मात्र कोणीही, कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास सदरची हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस दिली असे.

सदरची नोटीस अशिलाने दिलेल्या माहितीवरून व दिलेल्या कागदपत्रावरून आज रोजी अशिलांच्या खर्चाने प्रसिध्दी दिली असे.

**जळगांव**
**दि.२१/०५/२०२५**
शिक्का

**सही/-**
**अॅड. एच.जी. किरंगे**
ब्लॉक नं.७, सुपरसेव्हन, गजानन हौसिंग सोसायटी, चर्च जवळ, जळगाव मो.नं. ९९६०२८३२९३

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. *संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

शोभायात्रेमध्ये सजीव देखाव्यासह शिवलिंग ठरले आकर्षण
वाचा पान ६ वर

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएल/८८/२०२४-२०२६
गुरुवार, दि. ५ जून २०२५। युगाब्द ५१२७




# तरुणीला ‘लव्ह जिहाद’च्या जाळ्यात अडकविणाऱ्या दोन मुस्लीम तरुणांना अटक

## जळगावात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ४ जून**

खरेदीसाठी आलेल्या तरुणीचा पाठलाग करुन तिला आत्महत्येची धमकी देत जबरदस्तीने बुरखा घालण्यास सांगितले. त्यानंतर तरुणीने बुरखा काढण्यास सांगितले असता, तिला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी मोठ्या प्रमाणात गर्दी जमल्याने पोलिसांनी वेळीच दाखल होत त्यांनी दोघांना पोलीस ठाण्यात आणले. याठिकाणी तरुणीने दिलेल्या तक्रारीवरुन संशयित फरहान हकीम खाटीक (वय २३) व त्याचा मित्र जमील कुरेशी (दोघ रा. किनगाव, ता. यावल) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघांना अटक करण्यात आली आहे.

यावल तालुक्यातील एका गावात राहणारी तरुणी फार्मसीचे शिक्षण घेत असून त्याच महाविद्यालयात फरहान हकीम खाटीक हा तिसऱ्या वर्षाला शिकत होता.



ते दोघा कॉलेजला एकाच बसने ये-जा करीत असल्याने त्यांची ओळख झाली होती. त्यावेळी फरहान खाटीक हा तरुणीला सोशल मीडियावरुन मॅसेज करून तिच्यासोबत जवळीक करण्याचा प्रयत्न करीत होता. तो तरुणीला धर्म, जात असे काही नसून प्रेम प्रेम असते असे सांगत होता.

**धार्मिक व्हिडीओही दाखविले**

त्यानंतर काही दिवसांनी फरहान याने तरुणीला प्रपोज करून तू जर माझा प्रपोज स्वीकारला नाही तर आत्महत्या करेल, अशी धमकी देखील दिली होती.

प्रेमाच्या जाळ्यात ओढल्यानंतर तरुण हा तरुणीसोबत सोशल मीडियावर चॅटींग करुन तिला एका धर्माबाबत व्हिडीओ टाकून तिला त्या धर्माबाबात आपुलकी निर्माण होण्यासाठी प्रयत्न करीत होता. तरुणीने घाबरुन ही बाब कोणालाही सांगितली नाही.

### डीमार्टमध्ये तरु अणीसोबतचा प्रकार उघड

ही तरुणी कामानिमित्त बुधवारी सकाळी डीमार्ट येथे खरेदीसाठी आली होती. त्यावेळी संशयित फरहान व एक अनोळखी इसम तिचा पाठलाग करीत तेथे पोहचले. फरहान याने सोबत आणलेला बुरखा तरुणीला जबरदस्तीने परिधान करण्यास सांगितले, बुरखा नाही घातला तर मी आत्महत्या करेन, अशी धमकीदेखील त्याने दिल्यामुळे तरुणीने डीमार्टच्या चेजिंगरुमध्ये बुरखा परिधान केला. बुरखा परिधान केल्यानंतर संशयित फरहान याने माझ्यासोबत खरेदी कर, असे म्हणत तरुणीसोबत खरेदी केली. तरुणीने पैसे देण्याच्या काऊंटरवर बुरखा काढण्यास सांगितले असता, फरहान याने तू बुरखा काढला तर मी तुला मारुन टाकेल अशी धमकी दिली. त्यावेळी आजूबाजूचे लोकांनी हे वाक्य ऐकून त्यांना संशय आल्याने मोठा जमाव जमा झाला. जमाव जमल्यानंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत डायल ११२ वर कॉल आल्यानंतर रामानंद नगर पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर तरुणीसह दोघा तरुणांना त्यांनी पोलीस ठाण्यात आणले. याठिकाणी तरुणीने दिलेल्या तक्रारीवरुन संशयित फरहान हकीम खाटीक (वय २३) व जमील कुरेशी (दोघ रा. किनगाव, ता. यावल) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. तपास उपनिरीक्षक प्रदीप बोरुडे हे करीत आहे.

# देशभरात दोन टप्प्यात जातनिहाय जनगणना

## १ ऑक्टोबर २०२६ पासून चार राज्यांतून सुरुवात

**नवी दिल्ली, ४ जून**

केंद्र सरकारने बुधवारी जातनिहाय जनगणनेला हिरवा कंदील दिला आहे. त्यानुसार देशभरात जातनिहाय जनगणना दोन टप्प्यात होणार असून पहिला टप्पा १ ऑक्टोबर २०२६ पासून तर दुसरा टप्पा १ मार्च २०२७ पासून सुरू होणार आहे.

पहिल्या टप्प्यात उत्तराखंड, हिमाचल, लडाख आणि जम्मू आणि काश्मीर या चार राज्यात जनगणना होणार आहे. त्यानंतर पाच महिन्यानंतर देशातील इतर राज्यात जातनिहाय जनगणना होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत झालेल्या मंत्रिगटाच्या बैठकीत आगामी जनगणनांमध्ये जातींच्या जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, बैठकीत देशभरात जनगणनेसोबत जातनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली.

जनगणना दोन टप्प्यात केली जाणार आहे. देशभरात दोन टप्प्यात ही जनगणना केली जाणार असून डोंगरी भागात म्हणजेच लडाख, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड येथून १ ऑक्टोबर २०२६ पासून जनगणनेला सुरुवात होणार आहे. देशातील इतर राज्यात १ मार्च २०२७ पासून जनगणना केली जाईल. यापूर्वी २०११ मध्ये देशात जनगणना झाली. त्यानंतर २०२१ मध्ये जनगणना होणे अपेक्षित होते. मात्र, कोरोना महामारीमुळे जनगणना घेण्याचा निर्णय झाला नाही.

विशेष असे की, १८८१ ते १९३१ पर्यंत नियमितपणे होणारी जातनिहाय जनगणना १९५१ च्या पहिल्या जनगणनेत थांबवण्यात आली होती. २०११ मध्ये, सामाजिक-आर्थिक आणि जात जनगणनेत अंतर्गत जातीचा डेटा गोळा करण्यात आला. देशात जातनिहाय जनगणना करावी, अशी मागणी काँग्रेसने लावून धरली. तसेच काँग्रेसशासित कर्नाटक सरकारने जनगणनेचा निर्णय घेतला. बिहार सरकारनेही जनगणना केली. या निर्णयावर काँग्रेससह विरोधी पक्षांनी निवडणूक स्टंट असल्याचे टीका केली आहे.









## अग्रलेख...

# तुर्कस्तान, अझरबैजानला शह

भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावप्रसंगी पाकिस्तानला सक्रिय पाठिंबा देणे अझरबैजान आणि तुर्कस्तानच्या अंगलट आले आहे. देशातील ५० टक्के पर्यटकांनी या देशातील बुकिंग रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, या दोन्ही देशांमधील वस्तूंवर बहिष्कार घालण्याच्या आवाहनाला मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत असल्याचे दिसत आहे. भारताने आजवर कुणा देशावर हल्ला करून, त्याची भूमी बळकावल्याचे उदाहरण नाही. कुठल्या युद्धात भारताने संपूर्ण भूमिका समजल्याशिवाय कुणाला पाठिंबा दिलेला नाही. रशिया-युक्रेन युद्धातही भारताने उभयतांना युद्धापासून दूर राहण्याचे आवाहन करून तटस्थतेची भूमिका निभावली होती. पहलगामच्या बैसरण घाटीत पाकिस्तानी जिहादी दहशतवाद्यांनी २६ हिंदू पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारत सरकारने पुकारलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ने पाकिस्तानचे कंबरडे मोडले. भारताने एकीकडे लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबूल मुजाहिद्दीनला पाणी पाजले आणि दुसरीकडे जनजागृती करून अनेक देशांना पाकिस्तानने केलेल्या आगळिकीची माहितीही दिली. या साऱ्या लढाईत दहशतवादाला बळी पडलेले बहुतांशी देश भारताच्या पाठीशी उभे राहिले असताना अझरबैजान आणि तुर्कस्तानने मात्र पाकिस्तानच्या पाठीशी उभे राहून भारताशी शत्रुत्व विकत घेतले आहे. पाकिस्तानला पाठिंबा दिल्याने भारतीय पर्यटकांमध्ये या देशांविरुद्ध तीव्र भावना निर्माण झाल्या. यामुळे अझरबैजान आणि तुर्कस्तानला भेट देणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. अनेक ट्रॅव्हल एजन्सीजने या देशांमधील बुकिंग रद्द केल्या. यामुळे त्यांच्या पर्यटन उद्योगाला आर्थिक फटका बसला आहे. भारतीय व्यापारी संघटनांनी तुर्कस्तान आणि अझरबैजानमधून आयात कमी करण्याचे आवाहन केले आहे. काही तुर्की कंपन्यांचे भारतातले करार रद्द करण्यात आले आहेत, त्यात विमानतळावर विमान वाहतूक सेवा देणाऱ्या सेलेबी कंपनीचा समावेश आहे. भारताच्या नाराजीमुळे या देशांसोबतचे संबंध ताणले गेले आहेत. भारत एक मोठी अर्थव्यवस्था आणि जागतिक शक्ती असल्याने, त्यांचे समर्थन गमावणे या देशांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर धोक्याचे ठरणार, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भारताने यापूर्वी दाखवून दिले आहे की, तो आपल्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही देशावर अवलंबून राहणार नाही आणि जे देश भारताच्या विरोधात भूमिका घेतील, त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. पाकिस्तानची मदत करण्यामागे या दोन्ही देशांचा मुस्लिम धर्मदेखील महत्त्वाचा ठरला आहे.या दोन्ही देशांचा भारतासोबतचा व्यापार १२ अब्ज डॉलर्सचा आहे. अलिकडे या देशांमध्ये जाणाऱ्या भारतीयांची संख्या वाढली आहे. पण पाकिस्तानच्या गोटात जाऊन बसल्याने त्यांना मोठा आर्थिक फटका बसणे, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. भारत तुर्कस्तानला कार, रसायने आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात करतो. भारतात या देशातून इंधन, मशिनरी, सिमेंट आणि ड्रायफ्रूट्स आयात होतात. तुर्कस्तानच्या अनेक कंपन्या भारतात लोकप्रिय आहेत. यामध्ये गोदिवा, उल्कर, आणि एलसी वायकिकी यांचा समावेश आहे. तेथील स्किन केअर आणि पर्सनल केअर ब्रॅण्डही भारतात शिरकाव करीत आहेत. पण नव्या बदललेल्या समीकरणामुळे या साऱ्या व्यापारावर तणावाची आणि बॉयकॉटच्या मागणीची काळी छाया पडली आहे. अझरबैजानही पर्यटनाच्या दृष्टीने भारतासाठी महत्त्वाचा देश होता. या देशासाठी नवी दिल्लीहून दर आठवड्याला १० थेट उड्डाणे आहेत. रशिया, तुर्कस्तान, इराणनंतर सर्वाधिक भारतीय पर्यटक अझरबैजानला जातात. बदललेल्या समीकरणात या देशासोबतचा व्यापारही धोक्यात येणार आहे. या दोघांना शह देण्यासाठी भारताने आर्मेनियाला साद घातली असून, भारत-आर्मेनिया युती पाकिस्तानी मित्रांसाठी ध्योक्याची ठरणार आहे.

अझरबैजानचे माजी अध्यक्ष हैदर अलीयेव यांनी म्हटले होते की, तुर्कस्तान आणि अझरबैजान यांच्यात "एक राष्ट्र, दोन राज्ये" इतके घनिष्ठ बंधुत्व आहे. बदलत्या भूराजकीय गणितांमुळे हे नाते आता अधिक जटिल परंतु घट्ट अशा युतीमध्ये विकसित झाले आहे. २०२० साली झालेल्या काराबाख युद्धामुळे या दोन देशांनी आर्मेनियाशी शत्रुत्व या समान धाग्याचा वापर करून परस्पर मैत्रीसंबंध अधिकच गहिरे केले आहेत. सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर नागोर्नो-काराबाख संघर्षात रशियाने आर्मेनियाची बाजू घेतली होती. परंतु चार वर्षांपूर्वी झालेल्या मोठ्या संघर्षात रशियाने अझरबैजानचे तेल, गॅस आणि दळणवळणासाठी असणारे महत्त्व ओळखून आर्मेनियाला अपेक्षित पाठिंबा दिला नाही. दुसरीकडे पाकिस्ताननेही अझरबैजानच्या बाजूने मैदानात उतरून या देशाची कोंडी केली. परिणामी दुर्बळ ठरलेल्या आर्मेनियाला नागोर्नो-काराबाखचा मोठा भूभाग अझरबैजानला सोपवावा लागला. तुर्कस्ताननेही संलग्न सीमा बंद करून आर्मेनियाच्या संकटात भर टाकली. आर्मेनियातील कॉकेशिअस भागातील ख्रिश्चनांना कित्येक दशके इस्लामी जिहादी कारवायांचा फटका बसत आला आहे. १९१५-१६ मध्ये जिहादी मुस्लिमांनी जवळपास १२ लाख आर्मेनियन ख्रिश्चनांचे शिरकाण केले होते. सध्या तुर्कस्तानच्या प्रभावक्षेत्रात असलेल्या भूभागात तेव्हा आर्मेनियन ख्रिश्चनांची जनसंख्या २० टक्के होती. मुस्लिमांकडून झालेल्या हत्या व असुरक्षिततेमुळे ख्रिश्चनांनी पलायन केल्यामुळे आज तेथे केवळ २ टक्के ख्रिश्चन उरले आहेत. या पृष्ठभूमीवर भारताकडून आर्मेनियात होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झालेली आहे. आर्मेनियाला पूर्वी शून्य निर्यात करणारा भारत आज त्यांचा प्रमुख शस्त्रास्त्र पुरवठादार बनला आहे. भारत आणि आर्मेनिया यांच्यातील या सौहार्दाच्या संबंधांमुळे आशिया खंडाच्या उत्तरेला युरोपचे द्वार असणाऱ्या या कॉकेशिअस पर्वतरांगांच्या नजीकच्या या भूभागात भारताला धोरणात्मक आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असून, भारताचे प्रभावक्षेत्र वाढले आहे.

स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटनुसार २०१६ ते २०१८ दरम्यान आर्मेनियाच्या शस्त्रास्त्र आयातीत भारताचे योगदान जवळजवळ शून्य होते. गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आर्मेनियाने २०२२ ते २०२४ दरम्यान केलेल्या एकूण शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा आयातीपैकी ४३ टक्के भारतातून केली आहे. भारताने आर्मेनियासोबत शेकडो दशलक्ष डॉलर्सचे करार केले आहेत. आर्मेनिया हा देश आकाश-१एस एअर डिफेन्स मिसाईल सिस्टिम या स्वदेशी विकसित भारतीय हवाई संरक्षण प्लॅटफॉर्मचा पहिला परदेशी ग्राहक आहे. भारताने आर्मेनियाला पिनाका मल्टी-बॅरल रॉकेट लाँचर्स हे अत्यंत सक्षम रॉकेट लाँचर्स पुरवण्यास सुरुवात केली आहे. आर्मेनियाच्या तोफखान्याला प्रगत बनवण्यासाठी भारताने प्रगत आर्टिलरी गन सिस्टिम पुरवल्या आहेत. या देशाने मार्च २०२० मध्ये ४० दशलक्ष डॉलरमध्ये भारताकडून ४ स्वाती वेपन लोकेटिंग रडार खरेदी केले. या देशाने रणगाडाविरोधी रॉकेट आणि विविध दारुगोळा पुरवठ्याबाबत भारताशी करार केला आहे.

गेल्या काही वर्षांपासून अझरबैजान आणि तुर्कस्तान या दोन मुस्लिम देशांच्या कात्रीत सापडलेल्या आर्मेनियाशी धोरणात्मक संबंध प्रस्थापित करून, भारत त्याला विविध शस्त्रास्त्रे पुरवत आहे. आर्मेनियाचे त्याच्या शेजारी राष्ट्रांशी पूर्वापार चालत आलेले वैर आहे. इंग्रजांनी द्विराष्ट्रवादाला खतपाणी घालून भारताची फाळणी केली आणि तेव्हापासूनच भारताला पाकिस्तानातील कट्टरपंथीयांच्या प्रभावामुळे इस्लामी दहशतवादाचा सामना सातत्याने करावा लागत आहे. अगदी तसाच अनुभव आर्मेनियन लोकांना तुर्कस्तान आणि अझरबैजानमधील कट्टरतावादी मुस्लिमांकडून सातत्याने आलेला आहे. फाळणी झाली तेव्हा पाकिस्तानात मुस्लिमांनी हिंसाचार सुरू केल्यामुळे लक्षावधी हिंदूंना पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात यावे लागले होते. आर्मेनियाच्या अनेक नागरिकांना देखील तुर्कस्तान आणि अझरबैजानने पोसलेल्या जिहादच्या भीतीने पलायन करावे लागलेले आहे. बदलत्या स्थितीत आर्मेनियाशी व्यापार बळकट करून, भारताने तुर्कस्तान आणि अझरबैजानला शह दिला आहे.


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# डिजिटल प्रतिकृती; उद्याचे आभासी वास्तव!

सयामी जुळे वा जुळ्या व्यक्तींबद्दल आपण जाणतो. साधारण एकमेकांसारखेच दिसणारे व काही वेळा एकसारखाच विचार करणारे ते एक व्यक्तिमत्त्व असते. अनेक वेळा जुळे इतके सारखे दिसतात की कोण कुठला हेही ठरवणे अवघड जाते. हे झाले भौतिक विश्वाबद्दल. आता क्षणभर कल्पना करा की, आपली एक प्रतिकृती डिजिटली तयार झाली तर काय होईल? ही वास्तवाशी समांतर असणारी प्रतिमा असेल आणि आपली नक्कलही असेल. आज असे काही घडत असून तंत्रज्ञानाचा नवसाक्षात्कार घडवत आहे. या प्रतिकृतीला डिजिटल ट्विन (जुळे) असे म्हटले जाते. एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे तिची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तीची इत्थंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन म्हणजे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे एक अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या साहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते. नित्यनेमाने नवोन्मेषाला सामोरे जाणाऱ्या आजच्या काळात तंत्रज्ञानाचे असे आविष्कार सातत्याने पाहायला मिळत असतात. त्यातील काही कल्पनेच्या पलीकडचे असतात, पण आपले जीवन मोठ्या प्रमाणात सुसह्य करतात. उद्याचे आभासी वास्तव ठरू शकणाऱ्या या डिजिटल प्रतिकृतीचे अंतरंग आवर्जून समजून घेण्यासारखे आहेत.

डिजिटल ट्विन हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, जे एखाद्या भौतिक वस्तू, प्रणाली किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व करते. या आभासी प्रतिनिधित्वालाच डिजिटल ट्विन म्हणतात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रीकरण झाले आहे. यामुळे डिजिटल ट्विन तंत्रज्ञान हे एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळतो आहे. व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. सुरुवातीच्या काळात फक्त उत्पादनाच्या स्तरावर याची कल्पना केली होती. पण आता आभासी जगात आणि भौतिक वास्तवांसाठीही हे डिजिटल तंत्रज्ञान वापरात येणार आहे. 'डिजिटल ट्विन' हा शब्द सगळ्यात पहिल्यांदा २००२ मध्ये मिशिगन विद्यापीठात डॉ. मायकेल ग्रीव्हस यांनी सादर केला होता. सुरुवातीच्या काळात उत्पादन क्षेत्रात ही संकल्पना मांडण्यात आली होती. त्यानंतर ही कल्पना मोठ्या प्रमाणात ॲप्लिकेशन्सचा समावेश करण्यासाठी विकसित झाली. डिजिटल ट्विनमध्ये विविध परिस्थितींचे अनुकरण करून आणि डेटाचे विश्लेषण करून भविष्यसूचक देखभाल, परिपूर्ण व्यवहार आणि उत्पादन विकासामध्ये नावीन्य आणले जाते. भौतिक मालमत्ता आणि प्रक्रियांच्या कामगिरीचे परीक्षण, विश्लेषण आणि त्याची क्षमता वाढवण्यासाठी उत्पादन, आरोग्यसेवा, वाहतूक आणि शहरी नियोजन यासारख्या विविध



उद्योगांमध्ये डिजिटल ट्विन्सचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या परिस्थितींची पडताळणी करू शकते, त्याच्या परिणामांचा अंदाज लावू शकते आणि निर्णय घेण्यासाठीही मदत करू शकते.

मेटाव्हर्समध्ये एक आभासी जागा तयार केले जाते. यामध्ये वापरकर्ते डिजिटल वातावरणाशी आणि एकमेकांशी संवाद साधतात आणि डिजिटल ट्विनिंगला अनेक प्रकारे छेदतात. मेटाव्हर्स विकसित होत असताना समग्र आणि एकमेकांशी जोडलेले आभासी जग तयार करण्यासाठी डिजिटल ट्विन कणा म्हणून काम करू शकतात. हे तंत्रज्ञान वापरकर्त्यांना मेटाव्हर्समध्ये स्वतःचे अत्यंत तपशीलवार आणि अचूक प्रतिनिधित्व तयार करण्यास सक्षम बनवू शकते. यामुळे वैयक्तिक स्वरूपाचे आणि खरे असल्यासारखे अनुभव घेता येतात. उदाहरणार्थ, व्हर्च्युअल शॉपिंगमध्ये उत्पादनांचे डिजिटल ट्विन्स खरेदीचे निर्णय घेण्यासाठी वापरकर्त्यांना मदत करू शकतात. शिवाय डिजिटल ट्विन्स मेटाव्हर्समधील विविध मंच आणि यंत्रणांमधली देवाणघेवाण सुलभ करतात. तसेच विविध आभासी वातावरणांमध्ये अखंड संवाद आणि परस्परसंवादही घडवून आणतात. या देवाणघेवाणीमुळे परस्परसंबंधित अनुभव घेता येतात आणि जागतिक स्तरावर सहयोग आणि नवकल्पना वाढीला लागते. डिजिटल ट्विन्स विविध क्षेत्रांमध्ये खोली, समृद्धी आणि कार्यक्षमता वाढवून मेटाव्हर्सचा लक्षणीय विस्तार करू शकतात. याव्यतिरिक्त स्मार्ट शहरे, औद्योगिक संयंत्रे किंवा नैसर्गिक वातावरण यासारख्या संपूर्ण इकोसिस्टिमचा समावेश करण्याच्या उद्देशाने डिजिटल ट्विन वैयक्तिक प्रतिनिधित्वाच्या पलीकडे विस्तारू शकतात. रिअल-टाईम डेटा आणि सिम्युलेशन एकत्रित करून हे तंत्रज्ञान बहुआयामी आणि प्रतिसादात्मक आभासी जग आणखी सक्षम करते. यामुळे त्यांचे भौतिक समकक्ष जवळून प्रतिबिंबित करता येतात.

डिजिटल जुळे डेटा स्रोतांशी जोडलेले असतात. परिधान केलेल्या एका छोट्या उपकरणाद्वारे आपले डिजिटल विश्व साठवले जाते, आपण भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे सोशल प्रोफाईल्स, झालेले संभाषण, व्यवहार या सर्व बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. अनेक वर्षांच्या साठवणुकीनंतर या माहितीचे एआय तंत्राद्वारे पृथक्करण करून काही विशिष्ट साचे, वर्तणुकीचे प्रकार तयार केले जातात. या संकल्पनेचा उपयोग आपल्याला स्मरण केलेल्या गोष्टी साठवण्यासाठी करता येऊ शकतो. मानवी मेंदूमध्येही अफाट क्षमता असते, पण त्यात कालानुरूप त्रुटी निर्माण होतात. अनेकांना विस्मरण होते, एखादी व्यक्ती समोर येते पण नाव आठवत नाही. कधी कधी नाव आठवते पण व्यक्ती डोळ्यासमोर येत नाही. इथे आपला डिजिटल जुळा मदत करू शकतो. एआयमधील प्रिडिक्टिव्ह अॅनॅलिटिक्स तंत्रामुळे आपण एखाद्या व्यक्तीला वा ठिकाणी जायच्या आधी त्यासंबंधी माहितीची खातरजमा, उजळणी आधीच करू शकतो. काही टूल्स तुमची रिअलटाईम मदत करू शकतात.

प्लॉड या एआय उद्योगाने नोट नावाचा एक स्लिम सक्षम ऑडिओ रेकॉर्डर विकसित केला आहे. तो तुमच्या फोनच्या मागील बाजूस अडकवला जाऊ शकतो किंवा तुमचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी, हावभाव रेकॉर्ड करण्यासाठी आणि सारांशित करण्यासाठी शर्टच्या खिशात ठेवला जातो. हे तंत्र नेहमी तुमचे संभाषण ऐकते आणि कालांतराने तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमची प्राधान्ये, तुमचे संवाद जाणून घेत काही वर्षांत तुमचे, डिजिटल जुळे तयार करते. या तंत्रात आणि चॅटजीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्समध्ये बराच फरक आहे. चॅटजीपीटी सार्वत्रिक डिजिटल माहितीसंग्रहाचे पृथक्करण करून माहिती निर्माण करते. इथे तसे होत नाही. फक्त आपल्याशी संबंधित माहितीचे पृथक्करण आपला डिजिटल ट्विन करतो आणि गरज पडल्यास आपली जागादेखील घेतो. यामुळे आपल्या मानवी मेंदूच्या क्षमता कमी होतील असे काहींना वाटते. गुगल मॅप वापरून आपण दिशा शोधतो आणि इच्छित स्थळाचा वेध घेतो. पूर्वी आपण स्मरणशक्तीला ताण देऊन विचारत विचारत एखादा पत्ता शोधत असू. एकदा कष्टाने शोधलेला पत्ता कायम लक्षात राहत असे. आता हेच तंत्र सर्वत्र हातपाय पसरू लागले आहे. यामुळे भविष्यात माणसाचे आयुष्य सुसह्य नक्की होणार आहे. फक्त एक मोठा धोका आहे तो सुरक्षेचा. आपल्याबद्दलची सर्व माहिती सायबर गुन्हेगारांनी चोरली तर ते दुरुपयोग करू शकतात. सर्वच तंत्रांना असा धोका असतोच. त्यामुळे जास्त काळजी घेतली पाहिजे हेच अंतिम सत्य.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# पुन्हा कोरोना; सावध होण्याची वेळ

कोरोना विषाणूने संपूर्ण जगाला हादरवून सोडले होते. भारतातही याचा प्रचंड फटका बसला. लाखो जणांना आपले प्राण गमवावे लागले, कोट्यवधी लोकांचे आयुष्य बदलून गेले. दोन वर्षांच्या कठीण काळानंतर कोरोना नियंत्रणात आला, लसीकरणाने जनतेत आश्वस्तता आली आणि समाज पुन्हा एकदा सामान्य जीवनाकडे वळला. मात्र, नुकतेच समोर आलेले आकडे पाहता पुन्हा एकदा कोरोनाचा धोका डोके वर काढत आहे. देशात सध्या चार हजार नवीन कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. विशेषतः महाराष्ट्रात पुन्हा नव्याने ८६ रुग्ण आढळले असून, चंद्रपूर, नागपूर आणि इतर काही जिल्ह्यांमध्ये केवळ दोन दिवसांत चार मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. ही स्थिती गंभीर असून, जनतेने आणि शासनाने दोघांनीही योग्य खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे. लसीकरणानंतर कोरोना संपला आहे, अशी एक सामूहिक भावना समाजात निर्माण झाली होती. त्यामुळे अनेकांनी मुखाच्छादन वापरणे, सार्वजनिक ठिकाणी भौतिक अंतर राखणे, सॅनिटायझर वापरणे यासारख्या गोष्टी पूर्णपणे थांबवल्या.



पण आता, जेव्हा पुन्हा रुग्णसंख्या वाढू लागली आहे, तेव्हा या गाफीलपणाचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. लस ही संसर्ग पूर्णपणे रोखत नाही, तर ती फक्त गंभीर लक्षणे, हॉस्पिटलायझेशन आणि मृत्यूचे प्रमाण कमी करते. नव्याने आढळणारे कोरोना व्हेरिएंट्स, विशेषतः ओमिक्रॉन आणि त्याचे उपप्रकार, हे अधिक संसर्गजन्य असून लसीकरणानंतरही लोकांना बाधित करत आहेत. त्यामुळे वाढती रुग्णसंख्या ही फक्त आरोग्य व्यवस्थेसाठी नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी चिंतेची बाब आहे.

पुढील मोठा प्रश्न हा आहे की शासनाने नव्याने उद्भवणाऱ्या परिस्थितीकडे किती गांभीर्याने पाहिले आहे? २०२० आणि २०२१ मध्ये जो त्रास सहन करावा लागला- ऑक्सिजनचा तुटवडा, बेड्सची अनुपलब्धता, औषधांची टंचाई- ही परिस्थिती पुन्हा उद्भवू नये यासाठी सरकारने आणि आरोग्य यंत्रणांनी योग्य त्या उपाययोजना आखणे गरजेचे आहे. शासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना जर लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत मर्यादित राहिल्या, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचबरोबर सार्वजनिक कार्यक्रम, सण-समारंभ, राजकीय सभा यामध्ये खबरदारी घेतली जात आहे का, याचीही खातरजमा केली पाहिजे. सध्याच्या वातावरणात कुठलाही हलगर्जीपणा प्रचंड महागात पडू शकतो. कोरोनाचा संसर्ग पुन्हा पसरू नये यासाठी काही ठोस उपाययोजनांची अंमलबजावणी आवश्यक आहे. सर्वप्रथम, मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहिमा पुन्हा सुरू कराव्या लागतील. नागरिकांनी मुखाच्छादन वापरणे, गर्दी टाळणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे याचे महत्त्व पुन्हा लक्षात आणून द्यावे लागेल. शाळा आणि महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांमध्ये योग्य माहिती पसरवणे अत्यावश्यक आहे. तसेच, समाज माध्यमावर अफवा आणि चुकीच्या माहितीचा प्रसार होऊ नये यासाठी सायबर यंत्रणांनी अधिक जागरूक राहिले पाहिजे. साथीच्या रोगांमध्ये सुरुवातीचे काही दिवस अत्यंत महत्त्वाचे असतात. त्यामुळेच कोविड चाचण्या मोठ्या प्रमाणावर वाढविणे, संसर्ग असलेल्या भागात हॉटस्पॉट तयार करून निर्बंध लावणे, नागरिकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे हे तातडीचे उपाय असू शकतात. याशिवाय, सरकारी रुग्णालयांमध्ये कोविडसाठी आवश्यक औषधे, व्हेंटिलेटर्स, पीपीई किट्स, ऑक्सिजनची साठवणूक याची पुन्हा एकदा तपासणी करून सर्व व्यवस्था सज्ज ठेवावी लागेल. अशा उपाययोजनांनी मोठ्या संकटाला टाळता येऊ शकते. ज्या जिल्ह्यांमध्ये आधीच मृत्यू झाले आहेत, तिथे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. चंद्रपूर, नागपूर आणि इतर भागांमध्ये घडलेले मृत्यू हे केवळ आकडेवारी नसून तो एक इशारा आहे. हे मृत्यू लसीकरण असूनही झाले का, संबंधित व्यक्तींना इतर आजार होते का, त्यांच्यावर वेळीच उपचार झाले का - या सर्व बाबींची चिकित्सा व्हायला हवी. सरकारने अशा भागांमध्ये विशेष आरोग्य पथक नेमून स्थानिक स्तरावर उपाययोजना सुरू करायला हव्यात. कोरोनाचा अनुभव आपल्याला शिकवून गेला होता की, आरोग्य व्यवस्था किती महत्त्वाची आहे. त्यामुळे आता पुन्हा ही चूक टाळण्याची गरज आहे. ही वेळ काळजी घेण्याची आहे. जागरूक होण्याची आहे. कारण पुन्हा कोरोना आला आहे आणि तो कोणाला क्षमा करणार नाही, हे तितकेच सत्य आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# तेजप्रताप, राजद आणि बिहारची निवडणूक

बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांनी आपला मोठा मुलगा तेजप्रताप यादव याची पक्षातून आणि कुटुंबातून हकालपट्टी केली. राजकीय पक्षात पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे एखाद्या नेत्याची पक्षातून हकालपट्टी करण्याच्या घटना नवीन नाही. पण पक्षासोबत एखाद्या नेत्याची कुटुंबातूनही हकालपट्टी होण्याची घटना दुर्मिळ म्हणावी लागेल. याला कारण ठरले २४ मेची फेसबुकवरील एक पोस्ट. यात आपण १२ वर्षांपासून अनुष्का यादव यांच्यासोबत लिव्ह इन मध्ये असल्याचे तेजप्रताप यादव यांनी म्हटले होते. एकप्रकारे त्यांनी आपल्या प्रेमाची जाहीर कबुली दिली. यामुळे बिहारच्या राजकारणात विशेषत: राजदमध्ये भूकंप आला.

भाजपा आणि जदयूच्या प्रवक्त्यांनी राजदवर हल्ला चढवला. त्यामुळे तेजप्रताप यांनी ही पोस्ट काढून टाकली. नंतर पुन्हा टाकली आणि दुसऱ्यांदा पुन्हा काढून टाकली. यामुळे राजद तसेच लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबाचे व्हायचे ते राजकीय नुकसान होऊन गेले. पक्षाची तसेच कुटुंबाची प्रतिमा डागाळल्याच्या कारणावरून लालूप्रसाद यांनी तेजप्रताप यांची पक्षातून सहा वर्षांसाठी तसेच कुटुंबातून अनिश्चित काळासाठी हकालपट्टी केली. खरं म्हणजे सामान्यस्थितीत ही असामान्य घटना नव्हती. पण बिहार विधानसभेची निवडणूक यावर्षीच्या अखेरीस होऊ घातली आहे. त्यामुळे तेजप्रतापची छछोर वागणूक आपल्याला अडचणीत आणेल, असे वाटल्यामुळे लालूप्रसाद यादव यांना या घटनेची गंभीर दखल घ्यावी लागली.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तेजप्रताप आणि ऐश्वर्या राय यांच्या घटस्फोटाचे प्रकरण न्यायालयात आहे. तसेच येत्या महिन्या दोन महिन्यात त्याचा निकाल लागण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील निकाल तेजप्रताप यांच्या विरोधात जाण्याची शक्यता आहे. ऐश्वर्या राय या बिहारचे माजी मुख्यमंत्री दरोगाप्रसाद राय यांची नात आहे. ऐश्वर्याचे वडील चंद्रिकाप्रसाद हे राजदचे नेते होते. तेजप्रताप १२ वर्षांपासून अनुष्का यादव हिच्यासोबत लिव्ह इनमध्ये असताना लालूप्रसादांनी त्याचे ऐश्वर्या रायशी लग्नच का केले, असा प्रश्न उपस्थित होतो. म्हणजे लालूप्रसादांनी ऐश्वर्या राय आणि तिच्या संपूर्ण कुटुंबाची फसवणूक केली, असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतील संभाव्य राजकीय नुकसान टाळण्यासाठी लालूप्रसादांना तेजप्रतापची कुटुंबातूनही हकालपट्टी करावी लागली. अन्यथा लालूप्रसाद



यादव आणि नैतिकता आणि नीतिमत्ता यांचा दूरदूरपर्यंत संबंध नाही. लालूप्रसाद यादव यांचा आतापर्यंतचा राजकीय इतिहास पाहिला तरी यापेक्षा जास्त गंभीर अशी अनेक प्रकरणे त्यांच्या कार्यकाळात राजदमध्ये घडली आहेत. लालूप्रसाद यांचा साळा साधू यादव याच्या गुंडगिरीच्या घटना तर बिहारमधील जनतेच्या अंगावर काटा आणणाऱ्या होत्या. पण तेव्हा कधी लालूप्रसादांना नैतिकता आठवली नाही. त्यांनी साधू यादववर कोणतीही कारवाई केल्याचे स्मरत नाही. त्यामुळे तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म असे लालूप्रसादांना विचारावेसे वाटते. याचा अर्थ तेजप्रताप यादव यांच्यावरील त्यांची कारवाई चुकीची आहे, असे नाही.

काही वर्षांपूर्वी राजदमध्ये सक्रिय असताना तेजप्रताप यादवने आकाश यादव याची राजदच्या युवा आघाडीचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. त्यावेळी राजदचे प्रदेश अध्यक्ष जगदानंदसिंह यांनी आकाश यादवची त्याच्या पदावरून हकालपट्टी केली होती. त्यामुळे चिडलेल्या तेजप्रतापने जगदानंदसिंह यांचा जाहीरपणे अपमान केला होता. आकाश यादव हा त्याच अनुष्का यादवचा भाऊ असल्याचे आता उघडकीस आले आहे. गंमत म्हणजे जगदानंदसिंह यांचा मुलगा खासदार सुधाकरने तेजप्रताप यादवची पाठराखण केली आहे. लालूप्रसाद यादव यांनी कारवाई केली असली तरी तेजप्रतापने त्यांच्याविरोधात कोणतेही विधान केले नाही वा नाराजीही व्यक्त केली नाही. ट्विटमधून त्याने वडील लालूप्रसाद यादव आणि आई राबडीदेवी यांच्याबद्दल आदरच व्यक्त केला आहे. एवढेच नाही तर आपण भाऊ तेजस्वी यादवच्या पाठीशी असल्याचे म्हटले आहे.

असे करताना त्याने आपल्यावरील कारवाईचे खापर पक्षातील जयचंदांवर फोडले आहे. तेजस्वी यादवांचे राजकीय सल्लागार संजय यादव यांच्यावर तेजप्रतापचा खरा राग आहे. संजय यादवमुळे पक्षात आपल्याला डावलले जात असल्याचा त्याचा आरोप आहे. त्यामुळे संजय यादव यांचा उल्लेख तेजप्रतापने जयचंद असा केल्याचे मानले जात आहे. शिवसेना उबाठात जे स्थान मिलिंद नार्वेकर यांचे आहे, ते स्थान राजदमध्ये संजय यादवचे असल्याचे समजते. ज्याप्रमाणे शिवसेनेत मिलिंद नार्वेकर यांच्या अनुमतीशिवाय कोणी उद्धव ठाकरे यांना भेटू शकत नाही, त्याप्रमाणे राजदमध्ये संजय यादव यांच्या अनुमतीशिवाय कोणालाच लालूप्रसाद यादव आणि तेजस्वी यादव यांना भेटता येत नाही, असे म्हटले जाते.

तेजप्रताप यादव हा कधी स्वत:ला भगवान कृष्णाचा अवतार मानतो, कधी शंकराचा. राजदमध्ये असतानाही त्याच्या वागणुकीने पक्षाचे सर्व नेते त्रस्त झाले होते. त्यामुळे त्याच्या हकालपट्टीने सुंठेवाचून खोकला गेल्याची भावना पक्षात व्यक्त केली जात आहे. पण तेजप्रताप फार दिवस पक्षाबाहेर राहील असे वाटत नाही. त्याचे फार दिवस बाहेर राहणे राजदला परवडणारे नाही. याचा अर्थ पक्षात त्यांचा खूप फायदा आहे, असे नाही. राजदमध्ये फूट पाडण्यासाठी जदयू वा एखादा राजकीय पक्ष तेजप्रतापला आपल्याकडे ओढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेजस्वी यादव यांचे पक्षातील राजकीय वर्चस्व वाढल्यानंतर तेजप्रतापने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी राजदला आव्हान देण्यासाठी लालू-राबडी मोर्चा काढला होता. त्याला राजदविरुद्ध उमेदवार उतरवायचे होते, पण ते शक्य झाले नाही. फक्त जहानाबाद लोकसभा मतदारसंघात त्याने चंद्रप्रकाश हा आपला उमेदवार दिला. त्याला ७७५५ मते मिळाली. या मतदारसंघात राजदचे सुरेंद्र यादव यांचा १७५१ मतांनी पराभव झाला होता.

म्हणजे तेजप्रताप आपले उमेदवार जिंकवू शकला नाही तरी राजदचे उमेदवार हरवू नक्की शकतो. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या आधी लालूप्रसाद तेजप्रतापला पक्षात परत घेतील, हे नक्की. बाहेर निर्वासितासारखे राहण्यापेक्षा राजदमध्ये राहण्यात तेजप्रताप याचाही फायदा आहे. लालूप्रसाद यांचा ओढा तेजस्वी यादवकडे असला तरी तेजप्रताप आई राबडीदेवीचे लाडके आहेत. त्यामुळे राबडीदेवींच्या मध्यस्थीने येत्या काही दिवसांत तेजप्रतापची घरवापसी झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मात्र काही दिवस तरी तेजप्रताप बिहारच्या राजकारणात खळबळ उडवेल, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

### मनपा व महा मेट्रोची उत्कृष्ट संकल्पना

नागपूर विमानतळाकडून अजनी चौकाकडे येताना वर्धारोड महामार्ग व मेट्रोरेलचा तीन मजली अत्याधुनिक उड्डाणपूल आहे. त्यातील मधील मार्गावर अगदी वर चढतानापासूनच भारतरत्न पुरस्कारांनी सन्मानित व्यक्तींचे मोठाले फोटो नावांसह सुंदररीत्या विशिष्ट अंतरावर लावण्यात आले आहेत. यामधील उड्डाणपुलाचे अंतर पार करताना एका वेगळ्याच आनंदाची अनुभूती होते व या महानुभावांचे सहजच स्मरण होते. ही सुंदर संकल्पना प्रत्यक्षात उतरविणारे कौतुकास पात्र आहेत. माझे मित्र आनंद सहस्रबुद्धे यांनी या संदर्भात मांडलेली एक संकल्पना मांडू इच्छितो. आनंद यांचा असा प्रस्ताव आहे की नागपुरातीलच एक असा उड्डाणपूल जो सदर ते कामठीपर्यंत विस्तारित आहे (ऑटोमोटिव्हच्या पण पुढे जाणार) हा मेट्रो-महामार्गवर देखील अशाच प्रकारे आपले तीनही सैना दलांचे शूरवीर, सर्वोच्च परमवीरचक्र विजेते जवान/अधिकारी यांचे पण फोटो लावून त्यांना पण सन्मानित करण्यात यावे. नागपूरमधील अशा वेगळेपणाला नागरिकांचा व नागपुरात चहूबाजूंनी प्रवेश करणारे प्रवासी यांना नक्कीच अभिमान वाटेल ही खात्री आहे. नागपूर नगरीत प्रवेश करताच अशा प्रेरणादायी व्यक्तींचे दर्शन घडल्यास नक्कीच नागपूरच्या वैभवात भर पडेल यात शंका नाही. तेव्हा या सूचनेचा विचार व्हावा, ही विनंती.

**राजीव दारव्हेकर**

●● ●●

### काँग्रेसकडून मोदीद्वेषाचा अतिरेक सुरूच

'शशी थरुर बनले भाजपाचे प्रवक्ते' ही बातमी वाचली. म्हणजे आजवर शशी थरुर यांनी जे केले ते काँग्रेसला योग्य वाटत होते पण आता कुठे त्यांनी मोदींचे थोडेसे कौतुक केले तर काँग्रेसला ती चमचेगिरी वाटावी? या सगळ्या प्रकारांचा नीट आणि खोलवर विचार केला तर त्याच्या मुळाशी, देशहिताला दुय्यम मानून व्यक्तिपूजेचा अतिरेक हे एकमेव कारण असल्याचे दिसून येते. काँग्रेस, भाजपा, समाजवादी पक्ष, द्रमुक, अण्णा द्रमुक, तृणमूल काँग्रेस, शिवसेना (दोन्ही गट), राष्ट्रवादी

## वाचक पत्रे

काँग्रेस (दोन्ही गट), नॅशनल कॉन्फरन्स, मनसे, राष्ट्रीय जनता दल अशा विविध राजकीय पक्षांची विचारसरणी बघितली की आपला नेता म्हणेल ती पूर्वदिशा अशी विचारधारा फोफावत आहे, मग तो नेता काहीही म्हणो! पूर्वी म्हणजे १९७५ च्या आणिबाणी लागण्याआधी, काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष असलेल्या देवकांत बारूआ यांनी इंदिरा इज इंडिया आणि इंडिया इज इंदिरा असे वादग्रस्त वक्तव्य करून व्यक्तिपूजेच्या जाहीर अतिरेकाचा श्रीगणेशा केला होता. अर्थात तत्पूर्वी आणि त्यानंतरही अनेकांच्या बाबतीत हा अतिरेक झाला आहे. आताही मोदींना विरोध म्हणजे भारताला विरोध, असे नवीन समीकरण जन्माला आले आहे. वास्तविक पंतप्रधान नरेंद्र मोदी जे काही करतात ते त्यांच्या व्यक्तिगत फायद्यासाठी नसून केवळ देशहितासाठीच असते, हे जनताजनार्दन चांगले ओळखून आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात जनता कधीच बोलत नाही. मात्र मोदींना ठिकठिकाणी विरोध करणे हाच काँग्रेसच्या नेत्यांचा जीवनमार्ग झाल्यामुळे कोणीही मोदींचे कौतुक केले की काँग्रेसच्या तळपायाची आग मस्तकात जाणे साहजिकच आहे. मग काँग्रेसचे शशी थरुर यांनी मोदींचे केलेले कौतुक त्यांना कसे सहन होणार? भारतद्वेष आणि मोदीद्वेष यात फरक करण्याची काँग्रेसच्या नेत्यांची तयारी नाही हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे.

**शिवराम वैद्य**

●● ●●

### विस्तारवादी चीनला अद्दल घडवायलाच हवी

चीन हा नेहमीच पाकिस्तानची बाजू घेत आलेला आहे. दहशतवादाला पाठिंबा देतानाच त्याची पाठराखण करत आलेला आहे. प्रत्येक वेळी भारताविरुद्ध असलेली त्याची भूमिका काही नवीन नाही. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी त्याने पाकिस्तानला शस्त्रे पुरवली. या आधीही "हिंदी चिनी भाई भाई" म्हणत त्याने आपला विश्वासघात केलेला आहेच. आता तर तो उघडपणे भारताविरुद्ध पाकिस्तानला समर्थन देतो आहे. नुकतेच त्याने बांगलादेशला देखील कर्ज दिले आहे. मदतीच्या नावाखाली त्या देशाला शस्त्र विकणे आणि हळूहळू तिथे आपले हातपाय पसरून तो भाग गिळंकृत करणे ही चीन अर्थात ड्रॅगनची जुनीच खोड आहे. पण ही खोड जिरवणे आपल्या हातात आहे. कारण पाकिस्तान आणि बांगलादेशच्या सीमा भारताला लागून असल्यामुळे भारतासाठी ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे या ड्रॅगनच्या मुसक्या आवळून त्याच्या मुळावरच घाव करायला हवा आणि त्यासाठी त्याचा पाठीचा कणा मोडायला हवा. शत्रुराष्ट्राशी युद्ध हे केवळ शस्त्राने लढता येत असे नाही तर त्याची आर्थिक बाजू कमकुवत करून सुद्धा युद्ध जिंकता येते. भारतीय बाजारपेठ जर चीनच्या हातून आपण काढून घेतली तर या विस्तारवादी चीनचे कंबरडे मोडल्याशिवाय राहणार नाही. यासाठी चीनच्या वस्तूंवर बहिष्कार घालायला हवा.

**डॉ. स्वाती देशमुख**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### प्राध्यापक, कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती सत्कार
### जिजामाता महाविद्यालयातर्फे कार्यक्रम

**नंदुरबार** : शहरातील जिजामाता शिक्षण संस्था संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती सोहळा झाला. संस्थेच्या अध्यक्षा शोभा मोरे, सचिव डॉ. अभिजित मोरे आणि प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश देवरे उपस्थित होते. जिजामाता महाविद्यालयात गेली ३०-३५ वर्षे प्रामाणिकपणे सेवा करून अलीकडच्या काळात अनेक प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी निवृत्त होत आहेत. अशा काही निवृत्त प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती सोहळा एकत्रित व्हावा, निवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा एकदा एकत्र करून त्यांच्या परिवारासह त्यांचा सन्मान करावा, ही अपेक्षा संस्थेच्या अध्यक्षा शोभा मोरे, सचिव डॉ. अभिजित मोरे, उपाध्यक्ष डॉ. विक्रांत मोरे, संचालक ॲड. राऊ मोरे यांनी व्यक्त केली. त्यामुळे महाविद्यालयातील निवृत्त प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा एकत्रित सेवापूर्ती सोहळा पार पडला. या वेळी निवृत्त प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सेवाकाळातील अनुभव कथन केले. या वेळी शोभा मोरे, डॉ. अभिजित मोरे यांनी विचार मांडले. प्रभारी प्राचार्य डॉ. सतीश देवरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. देविदास सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. हेमंत रत्नपारखी यांनी आभार मानले.



### भाजपतर्फे गोपीनाथ मुंडेंच्या स्मृतिदिनी कार्यक्रम

**धुळे** : भाजपतर्फे लोकनेते (स्व.) गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम झाला. जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. याप्रसंगी ज्येष्ठ पदाधिकारी विजय पाच्छापूरकर, माजी महापौर प्रतिभा चौधरी, कल्याणी अंपळकर, प्रदेश महिला पदाधिकारी जयश्री अहिरराव, बेटी बचाओ-बेटी पढाओच्या प्रदेश उपाध्यक्ष अल्पाभाभी अग्रवाल, जिल्हा सरचिटणीस संदीप बैसाणे, नगरसेविका योगिता बागुल, जिल्हा प्रवक्ते पृथ्वीराज पाटील, सोशल मीडिया संयोजक पवन जाजू, उपाध्यक्ष अनिल थोरात, भगवान देवरे, जयंत वानखेडकर, सागर चौधरी, प्रदीप पानपाटील, ॲड. किशोर जाधव, भय्यासाहेब पाटील, सूरज चौधरी, प्रदेश पदाधिकारी सुरेश बहाळकर, प्रदेश पदाधिकारी सुनील बैसाणे, नागसेन बोरसे, सुहास अंपळकर, नगरसेवक नरेश चौधरी, दगडू बागूल, भगवान गवळी, बन्सीलाल जाधव, मंडळ अध्यक्ष प्रथमेश गांधी, ज्ञानेश्वर पाटील, अनिल सोनार, कार्यालयप्रमुख प्रकाश उबाळे, मंडळ पदाधिकारी योगेश कोठावदे, नीरज देसले, माजी मंडळ अध्यक्ष अरुण पवार, रमेश करणकाळ, सुनील कोठावदे, प्रशांत बागुल आदी उपस्थित होते.



### एसव्हीकेएम अभियांत्रिकीतर्फे तांडेत जनजागृतीपर उपक्रम

**शिरपूर** : दहिवद येथील एसव्हीकेएम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगतर्फे आंतरराष्ट्रीय मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त तांडे गावात महिलांसाठी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. त्यात मासिक पाळीशी संबंधित स्वच्छतेचे महत्त्व, आरोग्यविषयक काळजी आणि समाजातील गैरसमज दूर करण्यावर भर देण्यात आला. किशोरी आणि महिलांना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची स्वच्छता, योग्य सॅनिटेशन पद्धती याविषयी माहिती देण्यात आली. यानंतर महिलांना मोफत सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनात प्रा. लोकेश सोनार, डॉ. सागर मोरे, प्रा. लीना अग्रवाल आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी सहकार्य केले.



### नंदुरबारला आरती, महाप्रसादाचे वाटप

**नंदुरबार** : शहरातील सिंधी कॉलनी परिसरातील गुरू जोदर मंदिरात शिवलिंगाची सोमवारी महाआरतीसह महाप्रसादाचे वाटप झाले. याप्रसंगी सिंधी समाजाचे धर्मगुरू श्री साई भरतलाल मसंद व लीनाबेन मसंद (गुरू माँ)यांच्या हस्ते आरती आणि प्रसादाचे वाटप झाले. तदनंतर संयोजक राजूभाई खानवाणी यांच्यातर्फे मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी साई भरतलाल मसंद व लीनाबेन मसंद (गुरू माँ) यांनी बालाजी फाउंडेशनचे अध्यक्ष राजूभाई खानवाणी यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. याप्रसंगी माजी नगरसेवक मोहन खानवाणी, रमेश गुरबक्षानी, विष्णू फ्रिजवाला, सुरेश मंद्याणा, डॉ. वानखेडे, सोनार, अतुल कुलकर्णी, तसेच समाजबांधव उपस्थित होते.

### गोवंश हत्याबंदीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**धुळे** : आगामी बकरी-ईद सणाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या गोवंश हत्याबंदीसंदर्भात भाजपतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. महानगर-जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, आमदार अनुप अग्रवाल, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभागीय संघचालक प्रशांत मोराणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गोहत्या थांबविण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी त्वरित यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, उपायुक्त रोहिणी डहाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक बोलाविली. आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या गोवंश हत्याबंदीसंदर्भात चर्चाविनिमय करून, प्रशासकीय स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

### शहादा, तळोद्यासाठी लवकरच शववाहिनी

**तळोदा** : शहादा आणि तळोदा या शहरांसाठी प्रत्येकी एक शववाहिनी लवकरच उपलब्ध होणार असून, यासंदर्भात आमदार राजेश पाडवी यांनी प्रशासनाकडे मागणी केली होती. त्यांनी स्पष्ट केले की, शववाहिनीच्या अभावामुळे नागरिकांना मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नेण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यांनी दोन्ही पालिकांसाठी शववाहिन्या तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. प्रशासनाने मागणीची दखल घेत लवकरच शववाहिन्या उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे मृत्यू पश्चात सन्मानाने अंत्यसंस्कारासाठी आवश्यक असणारी अत्यावश्यक सुविधा आता त्यांच्या दारी येणार आहे, असे आमदार पाडवी यांनी सांगितले.

### तळोदा बाजार समितीतील गुरांचा बाजार उद्या बंद

**तळोदा** : आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर ७ जूनला राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश कृषी उत्पन्न बाजार समित्यांना देण्यात आले आहेत. महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या २७ मेच्या पत्रानुसार, येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत शुक्रवारी (६ जून) बकरी आणि गुरांचा आठवडे बाजार पूर्णपणे बंद राहील. तालुक्यातील शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन तळोदा बाजार समितीने केले आहे.

# धुळे जिल्ह्यात कृषी विद्यापीठासाठी हालचाली गतिमान

## प्रा. शरद पाटील : उपमुख्यमंत्री पवारांची सूचना; कृषिमंत्री कोकाटेंकडून प्रस्ताव सादर होणार

**धुळे** : जिल्ह्यात कृषी विद्यापीठ स्थापनेसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यासंदर्भातील प्रस्ताव सादर करणार आहेत. ही माहिती धुळे कृषी विद्यापीठ निर्माण समितीचे निमंत्रक आणि माजी आमदार प्रा. शरद पाटील यांनी मंगळवारी (३ जून) यांनी दिली.

शहरातील गुलमोहर शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुणे येथे १ जूनला पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या ११९ व्या बैठकीत हा विषय उपस्थित करण्यात आला होता. कृषिमंत्री कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्यातील चार कृषी विद्यापीठांच्या कार्यावर चर्चा झाली. या वेळी प्रा. पाटील यांनी धुळे जिल्ह्यासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव मांडून कृषिमंत्र्यांकडून ठोस आश्वासन मिळवले.



प्रा. पाटील यांनी बैठकीत २००९ पासून सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. त्यांनी डॉ. एस. वाय. पी. थोरात समिती आणि डॉ. व्यंकटेश्वरलू समितीच्या अहवालांतील सकारात्मक नोंदींचा हवाला दिला. धुळे जिल्ह्यातील सुमारे ३५० ग्रामपंचायतींचे ठराव, विविध आंदोलने, विधिमंडळातील प्रश्नोत्तरांची माहिती, विद्यार्थी संघटनांची निवेदने आणि उपलब्ध सुविधा यांची माहिती कृषिमंत्र्यांना दिली.

धुळे, नंदुरबार, जळगाव या जिल्ह्यांत अद्याप शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. आदिवासीबहुल नंदुरबारमधील वनसंपदा, धुळ्याचे कोरडवाहू कापूस, कांदा, कडधान्य तसेच केळीखेरीज इतर पिकांवरील संशोधनाच्या अभावामुळे खान्देश विद्यापीठाची गरज भासते, असे पाटील यांनी ठणकावले. यापूर्वी आरोग्य, मुक्त व आदिवासी संशोधन विद्यापीठांचा अन्यायपूर्ण अपहार झाल्याचे त्यांनी निदर्शित केले.

बैठकीला कृषी आयुक्त डॉ. सुरेश मांढरे, कृषी परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, उपाध्यक्ष तुषार पवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. धीरजकुमार कदम, स्मार्टचे राज्य प्रकल्प संचालक डॉ. हेमंत वसेकर आणि विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू व अधिकारी उपस्थित होते. यामध्ये परभणीचे डॉ. इंद्रमणी, राहुरीचे गणेश शिंदे, कोकणचे विनायक काशिद, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे प्रवीण देशमुख यांचा समावेश होता. बैठकीत कृषिमंत्री कोकाटे यांनी, ''उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या सूचनेनुसार विद्यापीठ विभाजन प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर केला जाईल आणि अंतिम निर्णयासाठी तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवला जाईल,'' असे ठाम आश्वासन दिले. त्यामुळे खान्देशातील विद्यापीठ निर्मितीची प्रक्रिया मार्गी लागण्यास मदत होणार आहे.



# शहाद्यात शिक्षक कॉलनीत सन्मान सोहळा

## निवृत्त, पदोन्नती अधिकारी, कर्मचाऱ्यांसह गुणवंतांचा गौरव

**शहादा** : येथील मोहिदे त. श. रोडवरील नवीन तहसील कार्यालय परिसरातील शिक्षक कॉलनीत निवृत्त, पदोन्नती मिळालेले आणि विविध क्षेत्रांतील गुणवंत व्यक्तींचा विशेष सन्मान सोहळा उत्साहात झाला.

ईश्वर साळुंखे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक प्रभाकर कटारे, निवृत्त मंडळ अधिकारी पी. बी. मोरे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात बौद्धाचार्य युवराज आगळे यांनी घेतलेल्या सामूहिक बुद्धवंदनेने झाली. उपस्थितांनी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पार्पण करून अभिवादन केले.

सोहळ्यात अक्कलकुवा तालुक्यातील जमाना आश्रमशाळेचे प्राचार्य भगवान महिरे आणि ब्राह्मणपुरी माध्यमिक हायस्कूलचे प्रयोगशाळा परिचर दिलीप साळवे यांचा निवृत्तीबद्दल, तर चिरखान आश्रमशाळेचे शिक्षक संतोष साळवे यांची नवलपूर शासकीय आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकपदी पदोन्नती झाल्याबद्दल सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच पत्रकारितेतील योगदानाबद्दल गिरिधर मोरे, कृषी साहाय्यक बुद्धभूषण संजीव कुवर, ॲड. आशुतोष काकडे आणि दहावीच्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवणारे अमोल आगळे यांचाही सत्कार करण्यात आला. शिक्षक कॉलनीचे अध्यक्ष सचिन नगराळे आणि मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रभाकर कटारे, आदिवासी विकास विभागाचे माजी शिक्षणविस्तार अधिकारी सिद्धार्थ महिदे, ईश्वर साळुंखे यांची भाषणे झाली. प्राचार्य भगवान महिरे, दिलीप साळवे आणि मुख्याध्यापक संतोष साळवे यांनी दुर्गम भागातील सेवेचे आणि आलेल्या अडचणींवर मात केल्याचे अनुभव कथन केले. संजय कुवर यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. दुधखेडा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक रमेश बिरारे यांनी आभार मानले. याप्रसंगी लखन खर्डे, युवराज काकडे, सुदाम बिरारे, टी. टी. बिऱ्हाडे आदी उपस्थित होते.

# धुळ्यात आजपासून कुत्र्यांचे निर्बिजीकरण

## आमदार अग्रवाल यांच्या सूचनेनुसार महापालिकेतर्फे कार्यवाही सुरू

**धुळे** : मोकाट कुत्र्यांच्या उपद्रवामुळे त्रस्त झालेल्या धुळेकरांना दिलासा देण्यासाठी गुरुवारपासून (५ जून) येथील महापालिकेतर्फे मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण तसेच अँटी रेबीज लसीकरणाची मोहीम सुरू होत आहे. कोल्हापूर येथील सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन या संस्थेची या मोहिमेसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. धुळेकरांची मोकाट कुत्र्यांच्या त्रासातून मुक्तता करण्याच्या हेतूने आमदार अनुप अग्रवाल यांनी याबाबत महापालिकेला सूचना केली होती. त्यानुसार ही कार्यवाही होत आहे.

शहरात काही वर्षांपासून मोकाट कुत्र्यांचा उपद्रव धुळेकरांसाठी मोठी डोकेदुखी ठरली आहे. गेल्या काही दिवसांत तर मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात बालकांसह अनेकांचा जीव गेला. त्यामुळे मोकाट कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी त्रस्त धुळेकरांकडून होत होती. याबाबत आमदार अग्रवाल यांनी महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील यांच्यासह प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाची





मोहीम तातडीने सुरू करण्याची सूचना केली होती. त्याअनुषंगाने महापालिका प्रशासनाकडून कार्यवाही सुरू होती.

मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण तसेच अँटी रेबीज लसीकरण करणे आवश्यक आहे. यातून मोकाट कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया ही केंद्र शासनाची संस्था नियंत्रण व मार्गदर्शन करते. या नियमानुसार मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाकडे नोंदणीकृत प्राणी कल्याण संघटना, संस्थांनाच हे काम करण्याची परवानगी आहे. त्यानुसार धुळे शहरातील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरणासाठी कोल्हापूर येथील सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन या संस्थेला हे काम देण्यात आले आहे. या मोहिमेस गुरुवारपासून (५ जून) प्रारंभ होत असून, वरखेडी रोडवरील एबीसी सेंटरमध्ये संस्थेतर्फे मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण करणे, शस्त्रक्रियेनंतर तीन-चार दिवस त्यांचे संगोपन करणे, त्यानंतर मोकाट कुत्र्यांना जेथून नेले होते तेथे सोडण्यात येणार आहे. या निर्बिजीकरणातून भविष्यात मोकाट कुत्र्यांच्या संख्येला आळा घालणे, हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

### मनपाचे आवाहन

धुळे शहरवासीयांनी महापालिकेच्या या मोहिमेला सहकार्य करावे, परिसरात उघड्या जागांवर उष्टे अन्न फेकू नये, हाड-मांस टाकू नये, मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यांपासून सावधगिरी बाळगावी, आपल्या लहान मुलांसह ज्येष्ठांना एकटे सोडू नये, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

# 'नरेगा'च्या महासंचालकांचा हरणखुरीकरांशी संवाद

## शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी दिला कानमंत्र; गावातील विविध कामांची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ४ जून**

जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील हरणखुरी गाव स्थलांतरमुक्त झाल्याचे मानले जाते. गावातील मजुरांना नरेगातून वर्षभर कामे उपलब्ध करून देण्यास ग्रामपंचायत यशस्वी ठरली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे राज्याचे महासंचालक नंदकुमार यांनी गावात झालेल्या रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामांची पाहणी करीत ग्रामस्थांशी संवाद साधला.

याप्रसंगी महेश चौधरी, मनरेगा विभागाचे उपजिल्हाधिकारी राजेंद्र शहाडे, राज्य गुणवत्ता नियंत्रक नीलेश घुगे, राज्य प्रशिक्षण समन्वयक सुमित गोरले, अक्राणी येथील क्षमताबांधणी



कक्षाचे तहसीलदार पंकज लोखंडे, धडगावचे गटविकास अधिकारी मनोज भोसले, तालुका कृषी अधिकारी आर. एम. शिंदे, वनक्षेत्रपाल चारुशिला काटे, आर. डी. पेंढारकर पंचायत समितीचे कृषी अधिकारी अनिल बिराडे, सचिन कुमावत, आदी अधिकारी उपस्थित होते.

महासंचालक नंदकुमार यांनी गावात झालेल्या रोजगार हमी योजनेंतर्गत कामांची पाहणी केली. २०२५-२६ वर्षाचा नंददीप गावांचा तयार करण्यात आलेला जलव्यवस्थापन आराखडा, प्रतिजॉबकार्ड आदी कामांच्या प्रगतीची पाहणी केली.

सरपंच अर्जुन पावरा म्हणतात, धडगाव तालुका पथकाचे सहकार्य आणि जनतेचा प्रत्यक्ष सहभाग, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी आणि रोजगार सेवकांच्या मदतीने रोजगार हमी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करून गावात सामूहिक कामांसह वैयक्तिक लाभाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात यशस्वी झाले आहे. गाव मजुरांचे स्थलांतरमुक्त करण्यास यश मिळविले असले, तरी हे कायम टिकविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार हमी योजना कामांच्या मंजुरीची आवश्यकता आणि वर्षभर प्रभावी नियोजनाची आवश्यकता भासणार आहे. यासाठीच महासंचालक नंदकुमार यांचा हरणखुरी गावाचा दौरा महत्त्वाचा ठरणार असून, सुविधासंपन्न कुटुंब मिशन आणि नंददीप गाव तथा हरित महाराष्ट्र कार्यक्रमाच्या निमित्ताने नियोजन करण्यात आले आहे.

# पिंपळनेरला सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर रूट मार्च

**तभा वृत्तसेवा**
**पिंपळनेर (साक्री), ४ जून**

आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधिकारी व विविध दलाच्या जवानांतर्फे शहरात रूट मार्च काढण्यात आला. साक्रीचे उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनात पिंपळनेर पोलीस ठाण्यापासून सामोडे चौफुली, बसस्थानक, पंचमुखी कॉर्नर, सुभाष चौक, गोपाळनगर, नाना चौक, बाजारपेठ व विश्वनाथ चौक या भागातून रूट मार्च काढण्यात आला.





या वेळी पिंपळनेर पोलीस ठाण्याचे साहाय्यक निरीक्षक किरण बर्गे, उपनिरीक्षक विजय चौरे, भूषण शेवाळे, ईश्वर शिरसाट, साक्रीचे आरसीपी पथक तसेच शीघ्र कृती दलाचे साहाय्यक कमांडर विशाल एरंडे, निरीक्षक सुरेंद्र प्रताप पटेल, ६ दुय्यम अधिकारी व ३४ जवान यांसह पिंपळनेर पोलिस ठाण्यातील अंमलदार व गृहरक्षक दलाचे कर्मचारी रूट मार्चमध्ये सहभागी झाले होते.

## मोदी सरकारचे ११ वर्ष संकल्प ते सिद्धी

# नंदुरबार जिल्ह्यात आजपासून विविध कार्यक्रमांचे नियोजन

## भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ४ जून**

मोदी सरकारचे ११ वर्षे संकल्प ते सिद्धीअंतर्गत जिल्हा, मंडळ, शक्तीकेंद्र आणि बूथ स्तरावर गुरुवारपासून (५ जून) विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विजय चौधरी म्हणाले की, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारला ३० मे २०२५ रोजी ११ वर्षे झाली. यानिमित्त राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वात तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रात मोदी सरकारचे ११ वर्ष संकल्प ते सिद्धीअंतर्गत जिल्हा, मंडळ, शक्तीकेंद्र आणि बूथ स्तरावर विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी जिल्हा कार्यक्रम समिती नियुक्त करण्यात आली आहे. गुरुवारी (५ जून) जागतिक पर्यावरण दिनापासून पुढील २ महिने पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण व बीज प्रत्यारोपण आदी कार्यक्रमांचे व्यापक अभियान करून मंडळ, शहरी भागात प्रभाग व ग्रामीण भागात ग्रामपंचायत स्तरावर कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.



२५ जून २०२५ रोजी तत्कालीन काँग्रेस सरकारने देशावर लादलेल्या आणीबाणीचे ५० वे वर्ष आहे. याविरोधात जिल्हास्तरावर काळा दिवस म्हणून पाळण्यात येणार आहे. या वेळी आणीबाणीसंबंधी माहिती देऊन या विषयासंबंधी चर्चासत्र आयोजित करून आणीबाणीमध्ये अटक झालेल्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या अभियानातील कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन विजय चौधरी यांनी केले आहे.

विजय चौधरी म्हणाले, शहरी भागात प्रभागनिहाय चौकसभा, ग्रामीण भागात ग्रामपंचायतनिहाय चौकसभा आयोजित करून गेल्या ११ वर्षातील ऐतिहासिक निर्णय व कामगिरीची माहिती देण्यात येणार आहे. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात शासकीय योजना माहिती शिबीर आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच लहान व मोठे व्हिडिओ व चित्रात्मक ग्राफिक्ससंबंधी स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर परीक्षण करून पुरस्कार विजेत्यास पुरस्कार देण्यात येणार आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात अनेक ऐतिहासिक निर्णय व कामगिरीचे प्रचार लावण्यात येणार आहे, असेही विजय चौधरी यांनी सांगितले.

# हस्ती बँकेतर्फे साहाय्यक सरव्यवस्थापक अनिल मराठे यांचा गौरव सोहळा

**दोंडाईचा (शिंदखेडा)** : दि हस्ती को-ऑपरेटिव्ह बँकेचे साहाय्यक सरव्यवस्थापक अनिल जुलाल मराठे यांचा सेवापूर्तीनिमित्त हस्ती चॅरिटेबल ट्रस्टच्या हस्ती बहुउद्देशीय सांस्कृतिक भवनात गौरव सोहळा उत्साहात झाला.

ज्येष्ठ संचालक मदनलाल जैन अध्यक्षस्थानी होते. माजी मंत्री डॉ. हेमंतराव देशमुख, माजी नगराध्यक्ष डॉ. रवींद्र देशमुख, हस्ती बँकेचे प्रेसिडेंट कैलास जैन, स्थानिक कमिटी चेअरमन किशोर जैन, ज्येष्ठ संचालक पहलाज माखिजा, संचालक संजय दुग्गड, व्ही. एम. पाटील, प्रा. पी. जी. कागणे, मधुबाला जैन, प्रा. मंजुषा पाटील, हितेंद्र कवाड, कीर्तिभाई शाह, प्रदीप पारख, भवरलाल जैन, सुगंधा जैन, शीतल



जैन, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश जैन उपस्थित होते.

मराठे यांनी हस्ती बँकेच्या मुख्य शाखेत ४४ वर्षे सेवा बजावली. त्यांच्या प्रदीर्घ सेवेच्या निमित्ताने बँकेतर्फे त्यांचा सपत्नीक सत्कार ज्येष्ठ संचालक मदनलाल जैन यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी मराठे यांच्या पत्नी नलिनी मराठे, मुलगा हर्षल मराठे, सुना जागृती मराठे, पूनम मराठे, नातू अर्पित मराठे, नात अविरा मराठे तसेच शालक भिकन खैरनार, शरद खैरनार उपस्थित होते. या वेळी अनिल मराठे यांचे अमेरिकास्थित ज्येष्ठ सुपुत्र गौरव मराठे यांनी वडिलांना सेवानिवृत्तीच्या भ्रमणध्वनीद्वारा शुभेच्छा दिल्या व हस्ती बँक परिवाराप्रति आभार व्यक्त केले.

मदनलाल जैन यांनी मराठे यांनी वैयक्तिक आयुष्यात मैत्री जोपासताना, सेवा बजावत असताना बँकेप्रति असलेली निष्ठा, कर्तव्यभावनेला सदैव प्राधान्यक्रम दिले. असे व्यक्तिमत्त्व क्वचितच आढळत असल्याचे नमूद करीत ते चांगले मित्र असल्याने त्यांनी कुटुंबापेक्षा बँकेला सर्वाधिक वेळ दिल्याचे कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांनी अनिल मराठे यांना निवृत्तीनिमित्ताने प्रत्यक्ष भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. तसेच कुटुंबाच्या संसारासोबत बँकेचे काम निष्ठेने केले. लोकांच्या कल्याणाची कामे करत जगले. त्यांचे कुटुंब समाधानी आहे. चांगल्या पद्धतीने, सचोटीने काम केल्याचा आम्हाला अभिमान असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री डॉ. हेमंतराव देशमुख यांनी केले.

चेअरमन कैलास जैन यांनी, अनिल मराठे म्हणजे 'गुगल' असल्याचे प्रतिपादन केले. किशोर जैन यांनी, अनिल मराठे बँकेत सेवा बजावत असताना बँकिंगसंदर्भात एखादे काम करणे चुकीचे होईल, हे सांगण्याचे धाडस दाखवत आम्हालाही सांभाळण्याचे काम केले असल्याचे प्रतिपादन केले.

अनिल मराठे यांनी ४४ वर्षे सेवा बजावल्यानंतरही बँकेसाठी वेळ देणार असल्याचे प्रतिपादन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश जैन यांनी सूत्रसंचालन केले. सोहळ्यास दोंडाईचा पंचक्रोशीतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक, नोकरदार अशा विविध क्षेत्रांतील सुमारे ७०० मान्यवर उपस्थित होते.

जळगाव
तरुण भारत
www.tarunbharatjalgaon.com






## महत्त्वाचे

### सेवाभारतीतर्फे आज शालेय वस्तू वाटप

**जळगाव :** जिल्हा सेवाभारती व तानाजी प्रभात शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी ५ जून रोजी सकाळी ८ वा. एमएसीबी कार्यालयाशेजारील वस्ती येथे शालेय वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक तथा समाजसेवक आनंदराव मराठे, विहिंपचे अध्यक्ष हरीष मुंदडा हे उपस्थित राहणार आहे. शालेय साहित्याचे वाटप जिंदा असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र लड्ढा यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक सेवाभारतीचे जिल्हाध्यक्ष मनीष काबरा आणि जिल्हा सचिव संदीप कासार यांनी केले आहे.

### कर भरूनही सुविधा नाही - नाटेकर

**जळगाव :** शहरातील गट नं. ४८, प्लॉट नं ४६ मध्ये नागरि सुविधांचा अभाव असल्याची तक्रार मनपाचे माजी कर्मचारी अनिल नाटेकर यांनी विभागीय लोकशाही दिनात करण्यात आली आहे. कर भरून देखिल या भागात सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी ९० एमएम ३० फुटी पाईप टाकण्यात यावा, रस्त्यावर बारीक मुरूम टाकण्यात यावा अशी मागणी नाटेकर यांनी केली आहे.

### नशिराबादजवळ रिक्षा उलटल्याने तीन जण जखमी

**जळगाव :** नशिराबाद जवळ रिक्षा उलटून झालेल्या अपघातात तीन प्रवासी जखमी झाले असून यातील तरूणाची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे. यासंदर्भातील माहिती अशी की, एमएच १९ बीजे ५४३१ क्रमांकाची रिक्षा ही प्रवाशांना भरून भुसावळहून नशिराबादकडे येत होती. हायवेवरून नशिराबाद शहराकडे जाणाऱ्या समांतर रस्त्यावरून ही रिक्षा जात असतांना चालकाचे नियंत्रण सुटल्याने अचानक उलटली. यात यातील तीन प्रवासी जखमी झाले असून यातील एक तरूणासह महिलेची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे. रिक्षा उलटताच येथून जाणाऱ्या प्रवाशांनी यातील जखमी झालेल्यांना रूग्णालयात पोहचवण्यासाठी मदत केली. नशिराबाद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले. शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा या प्रकरणी नशिराबाद पोलीस स्थानकात गुन्हा नोंदविण्याचे काम सुरू होते.

### चौघुले प्लॉट परिसरात मृत अर्भक आढळले

**जळगाव :** शहरातील कांचननगर परिसरातील चौगुले प्लॉट भागात मंगळवारी ३ जून रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना उघडकीस आली. तीन ते चार महिन्यांचे एक मृत नवजात अर्भक बेवारस अवस्थेत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेने मानवतेला काळिमा फासल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच, शनिपेठ पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृत अर्भक ताब्यात घेऊन ते जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल केले. अर्भकाचा मृत्यू कसा झाला आणि ते येथे कोणी टाकले, याबाबत पोलीस तपास करत आहेत. या संदर्भात, पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रमोद पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ९४ प्रमाणे शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक नंदकिशोर पाटील हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

### अंकासाठी संपर्क

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२

# शोभायात्रेमध्ये सजीव देखाव्यासह शिवलिंग ठरले आकर्षण

## श्री महेश नवमीनिमित्त शहरातील समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ४ जून**

शहरात श्री महेश नवमी उत्सव २०२५ निमित्त बुधवारी सायंकाळी शोभायात्रा जळगाव शहरातून काढण्यात आली. या शोभायात्रेत महिला-पुरुष यांचेसह सर्व समाजबांधवांनी पारंपारिक वेशभूषांमध्ये सहभाग घेतला. तसेच, भव्य शिवलिंगची प्रतिमा लक्षवेधी ठरली.

श्री माहेश्वरी समाज उत्पत्ती दिनानिमित्त शहरात श्री महेश नवमी उत्सव २०२५ साजरा होत आहे. माहेश्वरी समाजातार्फे बुधवारी महेश नवमी साजरी करण्यात आली. सकाळी ६ वाजता बालाजी पेठ येथे भगवान महेश यांचा अभिषेक व महाआरतीने धार्मिक कार्यक्रमला सुरवात झाली. त्यानंतर महाआरती करण्यात आली. सकाळी ८ वाजता पांजरपोळ गोशाळेत गोमातेला लापशी वितरित करण्यात आली. तसेच बाहेती पाणपोई जवळ अन्नदान वाटप कार्यक्रम घेण्यात आला. माहेश्वरी समाजातर्फे सकाळी १० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात फळ वाटप करण्यात आले.





**शिवमंदिरात ६१ किलो आंब्याची आरास**

महेश नवमीनिमित्त अयोध्या नगर येथील शिव मंदिरात ६१ किलो आंब्याची आरास करण्यात आली होती. माहेश्वरी बोर्डिंग येथे सकाळी ११ वाजल्यापासून रात्रीपर्यंत रक्तदान शिबिर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची रक्तपेढी, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, गोळवलकर रक्तपेढी यांच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले. यात २३२ रक्तपिशव्या संकलित झाल्या. समाजातील अनेक बांधवांनी या शिबिरात सहभाग घेऊन रक्तदान केले. दुपारी माहेश्वरी बोर्डिंग येथून शोभायात्रेला प्रारंभ करण्यात आला. सुरुवातीला बग्गी सजवण्यात आली होती.

**शिवलिंग ठरले आकर्षण**

शोभायात्रेत भव्य शिवलिंग लक्ष वेधून घेत होते. तर सोबत एका वाहनावर भगवान महादेवाची भव्य प्रतिमा सजविण्यात आली होती. दुसऱ्या वाहनात भगवान शिव व पार्वती यांच्या वेशभूषेत लहान बालके सहभागी झाले होते. यावेळी महिला-पुरुषांसह लहान मुलांचा उत्साह ओसंडून वाहत होता.



### महेश वंदनाने शोभायात्रेचा समारोप

महेश नवमीनिमित्त निघालेली शोभायात्रा माहेश्वरी बोर्डिंग येथून नेहरू चौक, टॉवर चौक, घाणेकर चौक, दाणा बाजार, नवी पेठ, शिवतीर्थ चौक मार्गे पुन्हा माहेश्वरी बोर्डिंग येथे विसर्जित झाली. याठिकाणी महेश वंदना भाविकांनी सादर केली. शोभायात्रा व श्री महेश नवमी उत्सवासाठी माहेश्वरी समाजाच्या विविध संघटनांनी एकत्र येऊन नियोजन करीत परिश्रम घेतले.

# वृद्ध महिलेची सव्वा दोन लाखांची सोन्याची मंगलपोत लांबविली

## शहर पोलिसात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ४ जून**

जळगाव शहरातील नवीपेठ ते नवीन बसस्थानक दरम्यान प्रवास करत असताना, एका वृद्ध महिलेच्या पर्समधून तब्बल २ लाख २० हजार रुपये किमतीची २५ ग्रॅम वजनाची सोन्याची मंगलपोत चोरून नेल्याची धक्कादायक घटना मंगळवारी सकाळी १० वाजता घडली आहे. या प्रकरणी दुपारी ४ वाजता जळगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धुळे तालुक्यातील साक्री येथील रहिवासी असलेल्या लिलाबाई ताराचंदजी ताटीया (वय ६५) या वृद्ध महिला आपल्या काही कामाच्या निमित्ताने मंगळवारी जळगाव शहरात आल्या होत्या. नवीपेठ येथून नवीन बसस्थानकाकडे प्रवास करत असताना, गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पर्समधून त्यांच्या गळ्यातील २५ ग्रॅम वजनाची सोन्याची मंगलपोत चोरून नेली. सकाळी १० वाजता ही घटना उघडकीस आली, त्यानंतर लिलाबाई यांनी परिसरात सर्वत्र शोध घेतला, परंतु त्यांना काहीही माहिती मिळाली नाही. अखेरीस, त्यांनी दुपारी ४ वाजता जळगाव शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल वीरेंद्र शिंदे करत आहेत.

शहरात वाढत्या चोऱ्यांच्या घटनांमुळे पोलिसांपुढे मोठे आव्हान उभे राहिले असून, नागरिकांनी प्रवास करताना आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पालकमंत्री ना. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आज रक्तदान शिबिर, जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ४ जून**

राज्याचे स्वच्छता व पाणीपुरवठा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त गुरूवारी ५ जून रोजी रक्तदान शिबिर व सायंकाळी पाळधी येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गुरूवारी ५ जून रोजी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवारी श्रीराम मंदिरात सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



सकाळी आठ ते दुपारी एक, तर दुपारी चार ते सहावाजे पर्यंत ना. गुलाबराव पाटील हे शिवसेना कार्यालयात शुभेच्छा स्वीकारणार आहेत. सायंकाळी ६ वा. बाजार पट्ट्यात जाहीर सभेला ते संबोधित करणार आहे.

तरी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रतापराव पाटील, विक्रम पाटील यांनी केले आहे.

# साहेब....मुलांना घरात बांधून ठेवायचे का?

## मयत चिमुकल्याच्या आईचा मनपा अधिकाऱ्यांना सवाल

**जळगाव ४ जून**

नागेश्वर कॉलनीमधील चार वर्षांच्या बालकाचा मोकाट कुत्र्याने लचके तोडल्यामुळे जीव गेला. त्यामुळे मयत मुलाच्या आईने साहेब कुत्र्यांना मोकाट सोडतात, मग मुलांना घरात बांधून ठेवायचं का? असा सवाल मनपाचे अतिरिक्त आयुक्त शाम गोसावी यांना उपस्थित केला. चिमुकल्याच्या आईने केलेल्या प्रश्नावर महापालिकेचे अधिकारी मात्र निरूत्तर झाले.

मनपाचे अतिरिक्त आयुक्त शाम गोसावी, सहाय्यक आयुक्त गणेश चाटे, स्वच्छता निरीक्षक रमेश कांबळे यांच्या टीमने मयत मुलाच्या कुटुंबियांची भेट घेतली. तसेच घडलेल्या दुदैवी घटनेची खंत व्यक्त करत मयताच्या कुटुंबियांना मदत मिळावी म्हणून शासनाकडे प्रस्ताव पाठवणार आहोत, तसेच तातडीने शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात येणार असल्याची ग्वाही अतिरिक्त आयुक्त गोसावी यांनी दिली. यावेळी मयत मुलाची आई म्हणाली की, साहेब, महापालिकेने आधीच कुत्र्यांचा बंदोबस्त केला असता तर, आज माझ्या मुलाला जीव गमवावा लागला नसता, आता माझा मुलगा गेला, आम्ही काय करावं आम्हाला काहीच सूचत नाहीये, पण यापुढे अशी घटना कोणाच्याच घरी घडायला नको, माझा मुलगा गेला तसा दुसऱ्यांचा मुलगा जाऊ नये, अशी अपेक्षा मयत मुलाच्या आईने अतिरिक्त आयुक्त शाम गोसावी यांच्याकडे व्यक्त केली.



### मन सुन्न करणारा प्रसंग

माझा मुलगा घराच्या कंपाऊडमध्ये खेळत होता, खेळता खेळता त्याचा बॉल कंपाऊडच्या बाहेर गेल्यामुळे तो बॉल घेण्यासाठी बाहेर गेला मात्र, त्याच वेळी कुत्र्याने त्याच्यावर झडप घातली आणि माझ्या मुलाच्या मानेचा लचका तोडला. त्या कुत्र्याने मुलाचा आवाज देखील बाहेर निघू दिला नाही, असा मन सुन्न करणारा प्रसंग मयत मुलाच्या आईने अतिरिक्त आयुक्त शाम गोसावी यांना सांगितला. तसेच मयताच्या आजीला गहिवरून आले होते. यावेळी मयताचे वडील सचिन सुकलाल गायकवाड, राजेश सोनवणे, आपीआय आठवले गटाचे मिलिंद सोनवणे, भिम आर्मीचे शाम सोनवणे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# रावेर येथे एक्सप्रेस गाड्यांना थांबे द्या

## केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांची रेल्वे बोर्डाचे चेअरमनकडे मागणी

**जळगाव :** केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी नुकतेच रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतीश कुमार यांची भेट घेऊन भुसावळ रेल्वे विभागातील रावेर स्थानकावर काही महत्त्वाच्या गाड्यांचे थांबे देण्याची मागणी केली. या बैठकीत रावेर आणि वरणगाव स्थानकांवर स्थानिक नागरिकांच्या वाढत्या मागणीनुसार गाड्यांचे थांबे देण्याबाबत चर्चा झाली.

खडसे यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी काही महत्त्वाच्या रेल्वेगाड्यांचे थांबे तात्काळ मंजूर करण्याची विनंती केली. त्यामध्ये पुढील गाड्यांचा समावेश आहे : नवजीवन एक्स्प्रेस (गाडी क्र. १२६५६) बोदवड थांबा दानापुर पुणे एक्सप्रेस (गाडी क्र. १२१५०) रावेर थांबा (पुणे मार्ग) महानगरी एक्स्प्रेस (गाडी क्र. २२१७७) रावेर थांबा रावेर येथे या गाड्यांचे थांबे देण्यात आल्यास शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी,



व्यापारी, नोकरदार, कामगार वर्ग तसेच सामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. यामुळे संपूर्ण परिसराचा सामाजिक व आर्थिक विकास साधला जाईल, असा विश्वास रक्षा खडसे यांनी व्यक्त केला. रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतीश कुमार यांनी या मागण्यांकडे सकारात्मकपणे लक्ष देण्याचे आश्वासन दिले असून, लवकरच यावर निर्णय घेण्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या बैठकीस रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

# प्रसूती प्रकरणात आरोग्यसेविकेसह कंत्राटी वाहनचालक दोषी

## प्रशासकीय कारवाई होणार ; आरोग्य अधिकाऱ्यांची माहिती

**जळगाव :** चोपडा तालुक्यातील आदिवासी भागातील बोरमढी येथील एका विवाहितेची रस्त्यावर प्रसूती झाल्याच्या गंभीर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे. या घटनेची त्रिस्तरीय चौकशी समितीद्वारे सखोल व पारदर्शक चौकशी करण्यात आली असून, चौकशीदरम्यान मिळालेले जबाब, उपकेंद्र कर्जाने येथील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दोषी आढळलेल्या आरोग्य सेविका आणि कंत्राटी वाहन चालक यांच्यावर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांनी दिली आहे.

डॉ. भायेकर यांनी सांगितले की, ही चौकशी प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबवण्यात आली. प्रकरणातील तक्रारदार प्रतिभा शिंदे यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी स्वतंत्र संधी आणि लेखी पत्राद्वारे निमंत्रण देण्यात आले होते. मात्र, वेळेत प्रतिसाद न आल्याने आणि चौकशी अहवाल सादर करण्यासाठी ठरवून दिलेल्या दोन दिवसांच्या मुदतीच्या मर्यादेत वारंवार संपर्क साधूनही प्रतिसाद मिळू शकला नाही. त्यामुळे चौकशी समितीने उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आपला अहवाल सादर केला.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह न ठेवता संबंधित १३ जणांचे जबाब, दस्तऐवज आणि घडलेली घटना यांच्या आधारे पारदर्शक पद्धतीने चौकशी करण्यात आली आहे. दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांवर आवश्यक ती प्रशासकीय कारवाई निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी सागितले. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना हाती घेतल्या जातील.

# विचार वारसा फाउंडेशनतर्फे १५२ विद्यार्थ्यांचा सन्मान

## माजी मंत्री गुलाबराव देवकर, माजी महापौर सीमा भोळे यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ४ जून**

येथील मेहरूण परिसरातील विचार वारसा फाउंडेशनतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात झाला. यात मान्यवरांनी १५२ गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, पदक देत गौरव केला. या वेळी विद्यार्थ्यांनी आयुष्यात पुढे जाताना भविष्यामध्ये सामाजिक बांधिलकी जोपासावी, अशी अपेक्षा मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आली.

विचार वारसा फाउंडेशनतर्फे महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीचे औचित्य साधून रामेश्वर कॉलनी परिसरातील मोठे हनुमान मंदिरात गुणगौरव सोहळा झाला. विचारमंचावर माजी मंत्री गुलाबराव देवकर, माजी महापौर सीमा भोळे, गोपाल दर्जी, अशोक पाटील, डॉ. पी. एस. पाटील, वैशाली झाल्टे, ॲड. महेश भोकरीकर, अर्चना सूर्यवंशी, शांताराम सूर्यवंशी, सुरेश राजपूत, संतोष पाटील, गणेश पाटील, दिलीप धनगर, सतिलाल पाटील, फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विशाल देशमुख उपस्थित होते.



सुरुवातीला महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. विशाल देशमुख यांनी प्रास्ताविकात कार्यक्रम घेण्यामागील उद्देश सांगितला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडून त्यांना प्रेरणा मिळावी, हा उद्देश असल्याचे सांगितले. यानंतर ॲड. महेश भोकरीकर व गोपाल दर्जी यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सतत मेहनत करून आयुष्यामध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये यश मिळवत राहावे. त्यासाठी चिकाटी कायम ठेवावी, असे माजी महापौर भोळे यांनी प्रतिपादित केले.

विद्यार्थ्यांना पुढे जाण्यासाठी समाजातून मोठे पाठबळ मिळत असते. त्यासाठी विचार वारसा फाउंडेशनच्या माध्यमातून हा कार्यक्रम प्रेरणा देण्याचे काम करेल, असे माजी मंत्री देवकर यांनी सांगितले. याप्रसंगी दहावी, बारावी तसेच इतर विविध परीक्षांतील गुणवंत १५२ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्हे व पदक देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त करून सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तुळजाई फाउंडेशनचे अध्यक्ष भूषण लाडवंजारी यांनी सूत्रसंचालन केले. अलकनंदा देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष आशिष राजपूत, अभिजित राजपूत, मनीष चौधरी, मयूर डांगे, निखिल शेलार, ऋषिकेश राजपूत, संकेत म्हस्कर, अविनाश पाटील, आकाश तोमर, अमोल पनाड, अमोल ढाकणे, चेतन राजपूत, गौरव डांगे, पवन साळुंखे, लोकेश निकम, युवराज राजपूत, देविदास पाटील, प्रफुल्ल सूर्यवंशी, प्रेम बडगुजर, संगीता राजपूत, सुरेखा निकम, मंगला मराठे, देवका हरणे, संगीता गुरव, रिता वाघ, कमल सनसे, पूजा देशमुख, ॲड. पायल देशमुख, सुरेखा वाणी आदींनी सहकार्य केले.



# चित्रकला, रांगोळी स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## 'महावितरण'तर्फे वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रम

**जळगाव :** 'महावितरण'तर्फे वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम होत असून, त्याअंतर्गत खान्देशातील जळगावसह धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांत वीज सुरक्षाविषयक संदेश असणाऱ्या विषयांवर चित्रकला व रांगोळी या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

'महावितरण'चा ६ जूनला २० वा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त १ ते ६ जूनदरम्यान राज्यात सर्वत्र वीज सुरक्षा सप्ताह विविध कार्यक्रमांनी साजरा होत आहे. मुख्यालयाचे यासंदर्भातील परिपत्रक आणि मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी यांच्या निर्देशाप्रमाणे जळगाव परिमंडळात ३ जूनला शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, तर ४ जूनला वीज कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. दोन्ही स्पर्धांना जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा व वीज कार्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी आयोजित चित्रकला स्पर्धा या विभागीय व उपविभागीय स्तरावर घेण्यात आल्या. या स्पर्धांत हजारो स्पर्धकांचा सहभाग राहिला. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. वीज सुरक्षाविषयक संदेश असणारे विषय घेऊन या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धांच्या यशस्वितेसाठी अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपकार्यकारी अभियंते, साहाय्यक अभियंते, मानव संसाधन व वित्त विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.



## थोडक्यात महत्त्वाचे...



### कायाप्पाचा पाडा सर्वोत्कृष्ट नाटक

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका आपल्या कलावंत कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी आंतरविभागीय खात्यांतर्गत नाट्य स्पर्धा भरवत असते. यंदाचे या स्पर्धे चे ५३ वे वर्ष होते. यावर्षी बा. य. ल. नायर धर्मदाय रुग्णालयातर्फे सादर झालेल्या 'कायाप्पाचा पाडा' या नाटकाला सर्वोत्कृष्ट नाट्यप्रयोग म्हणून प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. या व्यतिरिक्त या नाटकासाठी आठ वैयक्तिक पारितोषिकेही प्राप्त झालेली आहेत. हे नाटक नायर रुग्णालयाचे कर्मचारी असलेल्या देवेंद्र मधुकर काळसेकर यांनी लिहिले आहे. नाटकाचे दिग्दर्शन नम्रता देवेंद्र काळसेकर यांनी केले आहे. यासाठी दिग्दर्शनाचे सर्वोत्कृष्ट द्वितीय पारितोषिक त्यांना प्राप्त झाले. ही दोघं Radiation Oncology विभागात Radio Therapist ह्या हुद्यावर कार्यरत आहेत. सर्व तांत्रिकी प्रथम पारितोषिक प्राप्त करून नायर रुग्णालयाने या स्पर्धेत भरघोस यश मिळवले आहे. नायर नाटक मंडळ, यात अगदी कामगारापासून ते लिपिक वर्ग, सिस्टर्स, नर्सेस, लॅब टेक्निशन, डॉक्टर, असोसिएट प्रोफेसर ते अगदी विभागप्रमुख असे सर्व कर्मचारी एकत्रितपणे येऊन काम करतात. नाटक ही त्यांची फक्त आवड नसून वेड आहे आणि त्यामुळे आपल्या अतिशय जोखमीच्या व व्यस्त अशा कामकाजातूनही तालमीसाठी आपले कार्यालयीन वेळ संपल्यानंतर ते सवडही काढतात. गेली तीन-चार वर्ष नायर रुग्णालयातर्फे सादर झालेल्या नाटकांनी पहिल्या तीन क्रमांकात आपले स्थान मिळवले आहे व अनेक वैयक्तिक पारितोषिके प्राप्त केलेली आहेत. राज्य नाट्य स्पर्धेतही त्यांना अनेकदा यश मिळाले आहे. गेल्या वर्षी त्यांनी सादर केलेले नाटक 'धनंजय माने येथे राहतात का?' (लेखिका- रूपाली मिलिंद पवार नायर रुग्णालय कर्मचारी) याला सर्वोत्कृष्ट द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. नायर संघाने त्याचे आतापर्यंत मुंबई व मुंबई बाहेर असे ११ प्रयोग सादर केलेले आहे.

### पाचोऱ्यात आज पर्यावरण दिनाचा कार्यक्रम

**पाचोरा :** गिरणा-तापी जनविकास पर्यावरण संस्था पाचोरा- भडगाव यांच्यातर्फे पाचोरा येथे ५ जून रोजी येथील सु.भा. पाटील विद्यामंदिरात सायंकाळी ५ वाजता जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी गिरणा तापी जनविकास पर्यावरण संस्थेच्या सचिव शीला पाटील असतील. या कार्यक्रमात मीना बाग, ललिता पाटील, विद्या कोतकर, क्षमा शर्मा, नयना कापुरे मार्गदर्शन करतील. कार्यक्रमास संस्थापक माजी प्राचार्य डी. एफ.पाटील, अध्यक्ष व्ही.टी. जोशी, उपाध्यक्ष आनंद नवगिरे, सल्लागार आर.पी. बागुल, दत्तात्रय बोरसे, कार्याध्यक्ष राधा शर्मा, कार्याध्यक्षा उज्वला देशमुख, सल्लागार उपप्राचार्य मंगला शिंदे, सहसचिव संगीता नवगिरे, सल्लागार प्राजक्ता देशमुख, सहसचिव संगीता प्रजापत, सल्लागार अशोक महाजन, सल्लागार अर्चना पोटे- सपकाळ, सल्लागार कैलास भास्कर अहिरे, उपाध्यक्ष राजेश धनराळे, उपाध्यक्ष यतीन मोदी, कोषाध्यक्ष डॉ. संजय माळी उपस्थित राहतील.

### केसीईच्या अभियांत्रिकीत ५५ विद्यार्थ्यांच्या परिसर मुलाखती

**जळगाव :** खान्देश कॉलेज ऑफ एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ



इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयांत परिसर मुलाखतीचें आयोजन करण्यात आले होते. या आठवड्यात दोन परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. त्यात स्किल एकटेड प्रा .लिमिटेड पुणे यांचे विद्यमाने मुलाखती घेण्यात आल्या. जिल्हातील विविध शाखेच्या ५५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. विद्यार्थ्यांचे कौशल्य,सवांद ,वाचन, लेखन, तांत्रिक माहिती या घटकांद्वारे यात ११ मुलांची निवड करण्यात आली. मुलाखतीचे आयोजन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. मनीष महाले यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय सुगंधी यांनी निवड झालेल्या विदयार्थ्यांचे कौतुक केले.

### रोटरी क्लब ऑफ वेस्टतर्फे ८ रोजी 'मु. पो. जळगाव ४२५००१ टॉक शो'

**जळगाव :** येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे ८ जून रोजी दुपारी ४.३० ते ६.३० या वेळेत मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे नव्या पिढीला प्रेरणा आणि दिशा देणारा 'मु.पो. जळगाव ४२५००१' या टॉक शोचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुरेश भोळे हे उपस्थित राहतील. शहरवासियांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष विनित जोशी, मानद सचिव भद्रेश शहा, तुषार तोतला, माजी अध्यक्ष गनी मेमन यांनी केले आहे.

# आरोग्य सेवेचा नवा आयाम : पालकमंत्र्यांच्या वाढदिवसाचे जनकल्याणात रुपांतर

## जळगाव ग्रामीणमध्ये महाआरोग्य सप्ताह यशस्वी; २९०० रुग्ण तपासले, ३८ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी व २६ रुग्ण अँजिओग्राफीसाठी रवाना

**तभा वृत्तसेवा**
**पाळधी/धरणगाव/जळगाव, ४ जून**

'आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, आणि ती प्रत्येकाच्या दारी पोहोचली पाहिजे,' असा आग्रह व्यक्त करत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जळगाव ग्रामीण विधानसभा मतदारसंघात आरोग्य संजीवनी अभियान अंतर्गत महाआरोग्य सप्ताहाचे प्रभावी आयोजन करण्यात आले. या माध्यमातून २९०० पेक्षा अधिक रुग्णांची मोफत तपासणी करून गरजू रुग्णांना तज्ज्ञ उपचाराची संधी मिळाली.

या सप्ताहात विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे भरवण्यात आली. गावनिहाय तपासणी पुढीलप्रमाणे झाली.

पाळधी- ४८६, आव्हाणे- ३८७, म्हसावद- ११२, भोकर- २९७, पिंप्री खुर्द- ३९४, धरणगाव- १९२, शिरसोली- ५५२ तसेच नशिराबाद १२९ अशा एकूण २९०० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. विशेषतः आजच्या पाळधी शिबिरात कांताई नेत्रालयाचे डॉ. बेग यांच्या मार्गदर्शनाखाली १०१ रुग्णांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी ३८ रुग्ण मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी हॉस्पिटलला पाठवण्यात आले. शाहू महाराज हॉस्पिटलच्या हृदयरोग विभागाचे तज्ज्ञ डॉ. भारुडे व सहकारी डॉ. कृष्णा वाघमारे यांच्या पथकाने ६९ रुग्णांची हृदयरोग तपासणी केली, त्यातील १३ रुग्णांची एंजिओग्राफी आवश्यक असल्याचे निदान झाले. सर्व सप्ताहात एकूण ४२ रुग्णांना अँजिओग्राफी तपासणी करण्यास सुचविलेले आहे. कॅन्सर तपासणीसाठी नाशिक येथील




नामको हॉस्पिटल व जळगाव कॅन्सर केअर व रेडिएशन सेंटर जळगाव यांच्या पथकाने १०७ रुग्णांची तपासणी केली. यामध्ये २ मॅमोग्राफी चाचण्या व १२ पॅप स्मिर तपासण्यादेखील करण्यात आल्या. किरणोपचार तज्ज्ञ डॉ. स्वप्नील मोरे, डॉ. बच्छाव यांचे योगदान यामध्ये राहिले. अजून दोन दिवस या तपासण्या यांचा उपक्रम सुरूच राहणार आहे. शासनाच्या स्टेमी प्रकल्प व महालॅब्स प्रकल्प यांचाही सहभाग या शिबिरात घेण्यात आला.

या उपक्रमाचे नियोजन जि.प.चे माजी सदस्य प्रतापराव पाटील व महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे विभागप्रमुख डॉ. योगेश पाटील यांनी केले. मुक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष मुकुंदराव गोसावी यांचेही सहकार्य लाभले.

यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, 'आरोग्य सेवा ही केवळ सरकारी जबाबदारी नाही, तर ही सामाजिक बांधिलकी आहे. अशा उपक्रमातून ग्रामीण भागात आरोग्याविषयी जागृती निर्माण होते आणि लोकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडतो.'

शिबिरामध्ये शिवसेना व युवा सेनेचे पदाधिकारी, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, आरोग्य अधिकारी, शेकडो स्वयंसेवक, तसेच मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती. हा उपक्रम केवळ वाढदिवसाचे औचित्य न ठेवता, जनतेच्या हितासाठी आरोग्यसेवेचे एक उत्कृष्ट उदाहरण ठरला आहे. सामाजिक बांधिलकी, तांत्रिक कौशल्य आणि शासकीय सहकार्य यांचे त्रिवेणी संगम या शिबिरातून अनुभवायला मिळाला.

# सात वर्षांपासून कोथळीचे संत मुक्ताई मंदिर कळसाविना

## निधीसाठी आमदार खडसे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ४ जून**

मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी येथील श्री संत मुक्ताई मंदिराचे काम निधी अभावी रखडले असून गत सात वर्षांपासून हे मंदिर कळसाविना असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान मंदिराच्या पूर्ण बांधकामासाठी राज्य शासनाकडून निधी मिळावा याकरीता जिल्हा नियोजन विभागाने समितीची मान्यता घेऊन प्रस्ताव द्यावा असे पत्र राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार एकनाथराव खडसे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

माजी मंत्री आमदार एकनाथराव खडसे यांनी जिल्हाधिकाराऱ्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, संत मुक्ताई मंदिर कोथळी या तीर्थक्षेत्राचे जिर्णो द्धारासाठी निधी मागणी प्रस्ताव १४ जुलै २०२३ रोजी सादर करण्यात आला होता. मात्र हा प्रस्ताव हा नियोजन विभागाच्या ४ जुन २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची मान्यता घेवून सादर करण्यात आला नाही. परिणामी संत मुक्ताई मंदिर कोथळी या तीर्थक्षेत्रासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

तीर्थक्षेत्रासाठी निधी उपलब्ध करून देणे संदर्भात तारांकित प्रश्न क्र. ९०३ उपस्थित केला होता. यापूर्वी विधानसभा सदस्य असताना मुक्ताई मंदिर कोथळी या तीर्थक्षेत्रासाठी सन २०१८ मध्ये ९.०८ कोटी रुपयांचा निधी मिळाला होता. त्याच निधीतून झालेले काम करण्यात आले आहे. त्यानंतर मात्र प्रशासनाच्या ढिसाळ कार्यप्रणालीमुळे स्थानिक लोक प्रतिनिधीच्या दुर्लक्षामुळे अद्यापही अप्राप्त असून मंदिराचे काम अपूर्णावस्थेत असल्याचा आरोप आ. खडसे यांनी केला आहे. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मागील ७ वर्षापासून संत मुक्ताई मंदिर कळसाविना आहे ही खेदाची बाब आहे. तरी शासनाचे नियोजन विभागाच्या निर्णयानुसार पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची म ान्यता घेवून सुधारित प्रस्ताव सादर करून या मंदिराचा जिर्णोध्दार करावा अशा मागणीचे पत्र आ. खडसेंनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

# शालेय साहित्य खरेदीच्या सक्तीविरोधात शिक्षण विभागाचे आदेश

## हिंदू जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव ४ जून**

राज्यातील अनेक खासगी व निमशासकीय शाळांमध्ये विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानातूनच शालेय साहित्य, गणवेश, वह्या-पुस्तके, बूट इत्यादी खरेदी करण्याची सक्ती केली जाते. याद्वारे शाळा व्यवस्थापन व व्यापारी यांच्यामध्ये आर्थिक साटेलोटे निर्माण होत असून त्याचा थेट फटका पालकांना बसतो. हा अन्याय रोखण्यासाठी हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'च्या पाठपुराव्याला यश मिळाले असून जळगाव जिल्ह्याच्या जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी अशा सक्तीविरोधात सर्व सरकारी आणि खासगी शाळांना स्पष्ट आदेश निर्गमित केला आहे. हा आदेश केवळ जळगावपुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण राज्यभरात लागू करावा, अशी मागणी 'सुराज्य अभियाना'च्या वतीने शासनाकडे करण्यात आली आहे, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे उत्तर महाराष्ट्र संघटक प्रशांत जुवेकर यांनी पत्रकार परिषदेत केली.

पद्मालय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत अधिवक्ता निरंजन चौधरी, माहिती अधिकार कार्यकर्ते नरेंद्र सपकाळे, 'सुराज्य अभियाना'चे माधव सावलानी, हिंदु जनजागृती समितीचे गजानन तांबट उपस्थित होते. जुवेकर म्हणाले की, या आदेशानुसार, आता कोणत्याही शाळेला विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानातूनच साहित्य खरेदी करण्यास भाग पाडता येणार नाही. विद्यार्थ्यांना कुठल्याही दुकानातून साहित्य घेण्याचे स्वातंत्र्य असेल. शिक्षण हक्क कायद्यानुसार अशा सक्तीला कायदेशीर मान्यता नाही. अशी सक्ती करणाऱ्या शाळांवर व संचालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. गरज वाटल्यास शाळेची मान्यता रहित करण्याचा विचार करावा. पालक व विद्यार्थ्यांना तक्रार करण्यासाठी 'टोल फ्री' क्रमांक किंवा ई-मेल सुविधा उपलब्ध करून द्यावी. तक्रारदाराचे नाव व माहिती गोपनीय ठेवून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करावी, तर विद्यार्थ्यांची आर्थिक लुटमार रोखली जाऊ शकते, असा विश्वास 'सुराज्य अभियाना'च्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. आदेशाच्या अंमलबजावणीसाठी पाठपुरावा आणि पालकांमध्ये जागृती करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



### फैजपूरला शिवसेना सदस्य नोंदणी अभियान

**फैजपूर, ता. यावल :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्याकरता शिवसेना सदस्य नोंदणी अभियानांतर्गत तडवी वाडा वार्ड क्रम ांक तीनमध्ये सदस्य नोंदणी अभियान पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार चंद्रकांत पाटील यांच्या आदेशाने शिवसेना सदस्य नोंदणी अभियान सुरुवात करण्यात आली. जिल्हाप्रमुख समाधान महाजन, तालुकाप्रमुख राजेश काटोके, शहरप्रमुख पिंटू मंडवाले, युवा शहरप्रमुख कैलास भोई, तालुका प्रमुख पूजा पाटील, किशोर कापले, विनायक मंडवाले, ऑफलाइन सदस्य नोंदणी करण्यात आली. त्यास लाडक्या बहिणीचा मोठा प्रतिसाद मिळाला.

## पोलिसांनी राखेची वाहने पकडल्याने वाद; राख वाहतूक सुरूच ठेवणार -व्यावसायिक

**भुसावळ :** दीपनगर येथील राखेच्या वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. राखेचे वाहतूक करणारे ट्रॅक्टर वरणगाव परिसरातून वाहतूक करीत असताना पोलिसांनी बुधवारी तीन ते चार ट्रॅक्टर पकडले असता ट्रॅक्टरमालक आणि चालकासह जवळजवळ दोनशे ते तीनशे जणांचा जमाव पोलीस स्टेशनला जमा झाला होता.

जमावातील स्थानिक राख व्यावसायिक व मजुरांचे असे म्हणणे होते की, आम्ही या ठिकाणी स्थानिक रहिवासी असून आमची राख वाहतूक ट्रॅक्टरद्वारा सुरूच ठेवणार आहे. काही लोकप्रतिनिधीसुद्धा यावेळी पोलीस स्टेशनमध्ये आले होते. गेल्या अनेक वर्षापासून राखेचा व्यवसाय करून पोट भरणाऱ्या स्थानिकांवर जर गुन्हे दाखल केले जात असतील तर राख आमच्या हद्दीतून हटवा, कारण प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे व स्थानिक केवळ रोजगारासाठी तो त्रास सहन करीत आहे. परंतु टेंडर घेणारा ठेकेदार हा या वाहतुकीस मज्जाव करीत असून पोलिसांना हाताशी धरून ही वाहतूक बंद पाडण्याच्या मार्गावर आहे.

# असाही एक संत

वृक्ष मित्र, पद्मभूषण सुंदरलाल बहुगुणा यांच्या मुलाखतीसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात जायचं ठरलं. शुभ्र वस्त्र, डोक्याला बांधलेला शुभ्र रुमाल, लांब दाढी तीदेखील शुभ्र असे कृशकाय भारताचे सुंदर आणि बहुगुणी 'लाल' भव्य मंदिरात स्थिरावलेले संत भासले.



चिपको आंदोलनाचे प्रवर्तक, काश्मीर ते कोहिमापर्यंत पाच हजार किलोमीटरची पदयात्रा करून हिमालयातील जंगलं वाचविण्यासाठी जिवाचं रान करणारे कट्टर गांधीवादी सुंदरलालजी मी प्रत्यक्ष बघत आहे आणि त्यांच्याशी संवाद साधणार आहे, यावर माझा विश्वासच बसेना... कशी आणि काय सुरुवात करू या संभ्रमात असताना त्यांच्या प्रेमळ-स्मित चेहऱ्याकडे बघून दडपण दूर झालं. चरण वंदना केली व मनोमनी त्यांच्या अर्धांगिनीला- बिमलादेवींना, तसंच गावागावात महिलांना एकत्रित करून आंदोलन करणाऱ्या गौरा देवीलाही नमन केलं.

श्री. सुंदरलालजी बहुगुणा सांगू लागले... 'गावाचं नाव रेनी, सध्याच्या उत्तराखंडातील गढवाली प्रदेशातील चमोली जिल्हा. तिथं व्यावसायिक वृक्षतोड आणि जंगलतोडीवरील धोरणाचा विरोध करायचा होता म्हणून पवित्र धागे बांधले, तिथं श्रीमद् भगवतगीता वाचली आणि झाडांना मिठी मारुन रक्षण सुरू झालं... जवळ जवळ दोन आठवडे उपोषण केलं. नंतर चळवळीला यश आलं. वृक्षतोड थांबली.

ते संयत आणि धीरगंभीर आवाजात सांगत होते. 'आपल्या सभोवतालची सृष्टी संकटात आहे. अत्यावश्यक प्रत्येक घटक-हवा, पाणी, जमीन इत्यादी दूषित होत आहे. वनस्पती, पशुपक्षी, कीटक इतकंच काय मानवावरही दुष्परिणाम जाणवताहेत...

**पर्यावरण दिन विशेष**

माँ के दूधपर बच्चों का हक होता है, किंतु आजका बच्चा तो खून चूस रहा है! (त्यांच्या विरोध जमिनीत खोलवर केलं जात असलेलं बोरींग!)

पर्यावरण रक्षण हा एक स्वतंत्र विषय अभ्यासक्रमात असावा, अशी किमान अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'मानवी जीवनाची गुणवत्ता आणि त्याचं अस्तित्व कायम राखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना जाणीवपूर्वक राबविण्याची क्षमता नागरिकांमध्ये विद्यार्थी अवस्थेपासूनच निर्माण करणं हे पर्यावरण शिक्षणाचं उद्दिष्ट असावं. प्लॉस्टीकचा अनावश्यक वापर टाळावा आणि सजीवांचा नैसर्गिक परिसर जपायला हवा, ही काळाची गरज आहे.' आजीवन वनसंरक्षण आणि सामाजिक न्यायासाठी झटणारा असा हा संत!

मित्रांनो, झारखंडमध्ये काही शाळांत इको क्लबच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण, वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि बागायती शिकवली जाते. तशी सोय सर्व राज्यांमध्ये असावी, असं नाही का वाटत?

**-डॉ. उषा शर्मा,** जळगाव

# 'गद्दारी नव्हे खुद्दार राजा गुलाबरावच जिल्ह्याचा राजा'

'वक्त के साथ जो चले, वही रहनुमा होता है,
'झुकनेवाले नहीं, झुकानेवाले गुलाब होते हैं !'

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आणि जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा आज वाढदिवस! पण त्यांच्या वाढदिवशी त्यांना शुभेच्छा देताना केवळ वाढदिवसाच्या शुभेच्छा म्हणणं ही अपुरी भावना ठरेल. कारण हा नेता केवळ राजकारणी नाही, तो जनतेच्या व कार्यकर्त्यांच्या हृदयाचा राजा आहे. बाळासाहेब ठाकरे यांचा धगधगतं धनुष्यबाण घेऊन चालणाऱ्या नेत्यांमध्ये प्रमुख नाव -मंत्री गुलाबराव पाटील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनी जो उठाव केला, तो उठाव गद्दारीचा नव्हे, तो उठाव होता खरी शिवसेना वाचवण्याचा. आज ज्यांच्याकडे धनुष्यबाण आहे, ज्यांच्याकडे शिवसेनेचं नाव आहे -तीच खरी शिवसेना आणि हाच निकाल जनतेने दिला -लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमधून. गुलाबराव पाटील यांना 'खोक्यांचा मंत्री' म्हणणारे विरोधक आज स्वतः राजकीय दुष्काळात बुडाले आहेत. कारण जिथं गुलाब असतो, तिथं काट्यांचं काय चालणार?

**गद्दार नाही, विचारांचे वारसदार**

राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप झाला, एकनाथ शिंदे यांनी शिवसेना वाचवण्यासाठी बंड पुकारलं. तेव्हा गुलाबराव पाटील हे त्यासोबत होते. डोळ्यात शिवसेनेची अस्मिता आणि हृदयात बाळासाहेबांचा विचार. त्यांच्या या उठावाचं आज यश सिद्ध झालं. कारण धनुष्यबाण हेच शिवसेनेचं अधिकृत चिन्ह ठरलं आणि जनता आजही गुलाबराव पाटील आणि शिवसेनेच्या बाजूने ठाम उभी आहे. विरोधक गद्दारी म्हणाले, खोक्यांचा आरोप केला, पण वेळेने आणि जनतेने हे सर्व फेटाळून लावलं. गद्दारीचा डाग नाही, ही तर जनतेच्या न्यायासाठीची क्रांती होती.

**विरोधकांच्या जळजळीला गुलाब पाणी हेच उत्तर!**

गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वात जळगाव जिल्ह्याला नवी दिशा मिळाली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत घराघरात पाणी पोहचवलं जातंय. रस्ते, शाळा, आरोग्य, कृषी -प्रत्येक क्षेत्रात नाविन्यपूर्ण विकासकामे त्यांनी सुरू केली आहेत. विरोधकांच्या आरोपांना गुलाबराव पाटील हे कधी आक्रमक शैलीत, तर कधी मार्मिक मिश्किलपणे उत्तर देतात -अगदी 'गुलाबशाही' पद्धतीने. ते नेहमी म्हणतात, 'वडाच्या पारंब्या जशा जमिनीत खोलवर रुजतात, तसा आपला कार्यकर्ता, आपला नेता जमिनीशी जोडलेला असला पाहिजे.'

पाणी द्यायचं जनतेला आणि विरोधकांना पाजायचं गुलाब पाणी!
हे त्यांचं राजकारण, हेच त्यांचं व्यवस्थापन! ते नेहमी म्हणतात, 'मी सत्तेच्या गादीवर नाही बसलोय तर मी विकासाची गाडी चालवायला आलोय' मंत्री गुलाबराव पाटील यांचं विशेषत्व म्हणजे ते सत्तेत असोत वा विरोधात -त्यांच्या आवाजात जनतेचा हुंकार असतो. ते अधिकारी, कर्मचारी, जनता आणि कार्यकर्त्यांमध्ये सुसंवाद साधणारे मंत्री आहेत. ते अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते आणि जनता यांच्या समन्वयाने गावोगावी पाणी पोहचवतात, आणि विरोधकांना 'गुलाब पाणी' पाजतात. जलजीवन मिशन अंतर्गत साडेपाच वर्षांपासून गावागावात पाणी पोहचवणारे ते एकमेव मंत्री ठरले आहेत. विकास आणि व्यवस्थापन हेच त्यांच्या कारकिर्दीचं यशस्वी सूत्र ठरले आहे. ते विकासाची गाडी चालवणारे खरे मंत्री ठरत आहे.

गुलाबराव पाटील यांचं कार्य हे केवळ मंत्रिपदापुरतं मर्यादित नाही, ते शिवसेनेच्या रक्षणासाठी लढणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचं प्रेरणास्थान आहे. त्यांच्या वाढदिवसा निमित्त जनतेचा आशीर्वाद, कार्यकर्त्यांचं प्रेम आणि शिवसेनेचा विश्वास हेच त्यांचं खरं बलस्थान आहे.

शेवटी एवढंच... भाऊनी गद्दारी नव्हे तर खुद्दारी केली. खुद्दार असे माझा राजा -जनतेने वाजविला विरोधकांचा बंड बाजा
भाऊ, वाढदिवसाच्या मनःपूर्वक आणि लाखमोलाच्या शुभेच्छा! आपल्या नेतृत्वाने जिल्हा आणि राज्य अधिकाधिक बहरो आणि शिवसेनेचं धनुष्यबाण जनतेच्या मना-मनांमध्ये पोहोचो हीच प्रभूचरणी प्रार्थना!

शुभेच्छुक
**-विष्णू भंगाळे,** शिवसेना जिल्हाप्रमुख, माजी महापौर व सिनेट सदस्य, जळगाव (९४२२२७७१७७)

# राजकारणातील वारकरी : मंत्री गुलाबराव पाटील



'निस्सीम श्रद्धेचे रूप, लोकसेवेचे व्रत आणि भक्तीमार्गाची उर्मी - हाच खरा वारकरी!'

'नामस्मरणाच्या पावलांवर चालणारा मंत्री, आणि लोकसेवेच्या वाटेवर श्रद्धेने झुकणारा वारकरी म्हणजे गुलाबराव पाटील.' धर्म, अध्यात्म आणि समाजसेवा यांचा सुरेल संगम जर कुणा व्यक्तीत पाहावयाचा असेल, तर तो म्हणजे गुलाबराव पाटील. महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे कॅबिनेट मंत्री असूनही, ते वारकरी संप्रदायाच्या मार्गाशी अखंड जोडले गेले आहेत. त्यांच्या जीवनात प्रशासनाचे कर्तव्य आणि अध्यात्माचे साध्य यांचा सुंदर संगम घडलेला आहे. म्हणूनच त्यांना 'राजकारणातील वारकरी' अशी ओळख लाभलेली आहे.

राजकारणात राहूनही त्यांनी विवेक, विनय, सेवा या त्रिसूत्रावर आधारित कार्यपद्धती अवलंबली. संघर्षात संयम, विरोधात नम्रता आणि टीकेच्या क्षणी संतत्व दाखवणारे ते आजच्या राजकारणात एक दुर्मिळ उदाहरण ठरले आहेत. गुलाबराव पाटील हे केवळ कर्तबगार मंत्री नाहीत, ते एक चालतं बोलतं वारकरी तत्वज्ञान आहेत. त्यांनी दाखवलेला मार्ग हा भाविकांसाठी, तरुण नेत्यांसाठी आणि जनतेसाठीही प्रेरणादायी आहे.

**'संतांचे विचार, जनतेची साथ**

गुलाबराव पाटील-भक्ती आणि कर्तव्याचा संगम!'
गुलाबराव पाटील हे वारकऱ्यांच्या संगतीतच आपली जीवनसाधना करत आले आहेत. विठ्ठल नामाच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि संत तुकाराम - ज्ञानेश्वरांच्या अभंगात रमलेली त्यांची वृत्ती, ही एकीकडे भक्तीची आणि दुसरीकडे लोकशाहीची सेवा करणारी आहे. दरवर्षी पंढरपूर वारीला सामील होणारे गुलाबराव पाटील, स्वतः ला केवळ एक मंत्री न मानता, एक वारकरी भाविक मानतात. वारी हीच साधना आणि सेवा हीच ईश्वरपूजा, या भूमिकेतून त्यांनी हजारो भाविकांना पंढरपूर दर्शन घडवले आहे. 'राजकारण हे जर भक्तीभावाने केलं, तर तेही एक यज्ञ होतो.'

गुलाबराव पाटील यांची राजकीय कारकीर्द ही केवळ सत्तेची नव्हे, तर संस्कारांचीही आहे. संतांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी त्यांनी भजनी मंडळांना साहित्य वाटप, कीर्तन, दिंडी आणि पालख्या यांना मदत, तसेच जिल्ह्यातील यात्रास्थळांचा विकास, भजनकारांना मानधन, आणि वारकरी भवनाचे स्वप्न साकार करत वारकरी चळवळीला आधार दिला आहे.

**'भक्तीचा मार्ग म्हणजेच सेवा आणि सेवा म्हणजेच समाजप्रेम.'**

गुलाबराव पाटील यांनी वारकरी परंपरेतून जे संस्कार घेतले, त्यांचा ठसा त्यांच्या प्रशासनातील कार्यपद्धतीतही स्पष्ट दिसतो. संयम, नम्रता, सेवाभाव आणि विवेक या संतविचारांची प्रचिती त्यांच्या प्रत्येक निर्णयात जाणवते. म्हणूनच विरोधक असो वा सामान्य नागरिक, प्रत्येक जण त्यांच्या समर्पित कार्याची दाद देतो.

**वारकरी भवन - श्रद्धेचा भव्य वास्तू**

राज्यातील पहिल्या डीपीडीसीच्या माध्यमातून जिल्हा स्तरावरील वारकरी भवनाचे स्वप्न जळगाव जिल्ह्यात आकार घेत आहे आणि त्याच्या मागे उभे आहेत गुलाबराव पाटील. हा त्यांच्या श्रद्धेचा, आणि वारकरी संस्कृतीबद्दल असलेल्या बांधिलकीचा भव्य पुरावा आहे. हे भवन फक्त भिंतींचा संच नाही, तर भक्तिरसाची वास्तू आहे. 'टाळ मृदंगाचा नाद, अभंगांचा गंध - मंत्रमुग्ध होई वाट, विठ्ठल नाव संग' याप्रमाणे अनेक मंदिरांचे जीर्णोद्धार, धार्मिक स्थळांना पर्यटनस्थळांचा दर्जा, भजन-मंडळांसाठी साहित्य, शिक्षण संस्थांमध्ये वह्यांचे वाटप, दिव्यांगांसाठी ई-बाईक - ही कार्ये केवळ सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची नाहीत, तर भक्तिभावाने प्रेरित आहेत. 'जर मंत्री झालो नसतो, तर मी कीर्तनकारच झालो असतो.' ही त्यांची नम्र कबुलीच सांगते, की त्यांचं अंतःकरण राजकारणात नव्हे, तर अध्यात्मातच नांदत आहे.

'राजकारण ही सेवा आणि सेवा हीच ईश्वरपूजा मानून गुलाबराव पाटील यांनी राजकारणालाच भक्तीमय केलं आहे. त्यामुळे त्यांचं जीवन हे एक अखंड कीर्तनच आहे - लोकसेवेचं, श्रद्धेचं आणि नम्रतेचं आहे.

**-डॉ. जगदीश पाटील,** सदस्य, मराठी भाषा अभ्यास मंडळ, बालभारती (८१४९४९८०२०)

**जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव**
विकास
पोस्ट बॉक्स नं. ३२, शिवाजी नगर रोड, जळगांव - ४२५००१
फोन नं. ०२५७ - २२२६६४५-४८ फॅक्स नं. ०२५७ - २२२५६११

**टेंडर नोटीस**

**जळगाव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघासाठी खालील नमुद केले प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | कामाचा तपशील | अ. क्र. | कामाचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | अॅल्युमिनिअम कॅन खरेदी | ७ | वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्दीचा वार्षीक करार |
| २ | कडबा कुट्टी संयंत्र खरेदी | ८ | संघातील रेफ्रीजरेशन प्लान्ट येथील अॅटोमॅटीक स्काडा पीएलसी सॉफ्टवेअर Alien Bradley (Rockwell Automation) देखभाल दुरुस्तीचा वार्षीक करार |
| ३ | स्क्रैप एस.एम.पी. बॅग्ज विक्रीचा वार्षीक करार | | |
| ४ | पारोळा येथील शितकरण केंद्राचे बांधकाम | | |
| ५ | पाचोरा येथील शितकरण केंद्राचे बांधकाम | ९ | गाय दुध भुकटी विक्री |
| ६ | फैजपुर येथील शितकरण केंद्राचे बांधकाम | | |

सदर निविदेतील कामाचा तपशील, अनामत रक्कम, नियम अटी व शर्ती इत्यादी माहिती संघाच्या www.vikas.coop या वेबसाईटवर पांहावयास मिळतील. **अ.क्रं. १ ते ०९ च्या निविदा दि. १३/०६/२०२५ रोजी संध्या ५.०० वाजेपर्यंत संघाच्या कार्यस्थळी अनामत रक्कमेसह पाठवावे. सदरच्या जाहीराती मध्ये काही बदल झाल्यास त्याची सुचना संघाच्या www.vikas.coop या वेबसाईटवर अपलोड करण्यात येईल.** कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशता मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार संघाने राखुन ठेवलेला आहे.

**कार्यकारी संचालक**

# दूरदृष्टीचा नेता, विकासाचा शिल्पकार : नामदार गुलाबराव पाटील

माणूस मोठा होतो तो केवळ पदाने नव्हे, तर आपल्या कृतीतून आणि समाजासाठी केलेल्या कार्यातून. जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून गेली काही वर्षे कार्यरत असलेल्या नामदार गुलाबराव पाटील यांनी त्यांच्या जबाबदार, संयमित आणि सर्वसमावेशक नेतृत्वाने जिल्ह्याचा विकासाचा नवा अध्याय लिहिला आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा हा आढावा म्हणजे त्यांच्या कार्यक्षमतेला आणि लोकहिताला केलेला सलाम आहे.

संवेदनशील आणि सर्जनशील नेतृत्व नामदार गुलाबराव पाटील यांच्या भाषणांत आकडेवारीपेक्षा सामान्य माणसांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा ध्यास दिसतो. महाराष्ट्र दिन असो की शेतकरी संमेलन किंवा प्रशासकीय बैठक, त्यांच्या भाषणांत सामाजिक संवेदना आणि विकासाचे स्पष्ट उद्दिष्ट नेहमीच प्रकर्षाने जाणवते. जम्मू-काश्मीर हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहतानाची त्यांची संवेदनशीलता आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांचा समतोल त्यांच्यातील मानवतेची आणि नेतृत्वाची सांगड दाखवतो.

दृढ आणि परिणामकारक विकासदृष्ट पालकमंत्री म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याने विकासात अभूतपूर्व प्रगती केली. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १०० टक्के निधी खर्च करून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला, परिणामी जिल्ह्यासाठी अतिरिक्त ७० कोटी रुपयांचा निधी मिळाला. हे त्यांच्या प्रभावी नियोजनाचे ठळक उदाहरण आहे.

धोरणात्मक परिपक्वता पूर्वी विरोधक म्हणून शेतकरी हितासाठी शासनाविरुद्ध शिंगाडा मोर्चा काढणारे गुलाबराव पाटील यांनी मागील ५ वर्षात पालकमंत्री म्हणून शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी डीपीच्या प्रश्नावर ११० कोटी पेक्षाही मोठा निधी मंजूर करून त्यांनी विरोधासाठी विरोध नव्हे, तर समस्येची खरी ओळख आणि त्यावर उपाय करण्याचा आदर्श ठेवला आहे.

गृहनिर्माणातून स्वप्नपूर्ती प्रधानमंत्री आवास योजना, रमाई योजना, पारधी गृहनिर्माण योजना आदी योजनांतून १.०९ लाख घरकुले पूर्ण करून १.२२ लाख घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. हे केवळ आकडे नाहीत, तर हजारो कुटुंबांच्या स्वप्नपूर्तीचे साक्षीदार आहेत.

महिला सक्षमीकरणाचे समर्थक ३ लाख महिलांचे बचत गट आणि 'लखपती दीदी' योजनेतून आर्थिक स्वावलंबनाची दिशा निश्चित केली. 'बहिणाबाई मार्ट' योजनेअंतर्गत मंजूर झालेले १२ मार्केट मार्ट ही महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची भक्कम पावले आहेत.

ऊर्जेची भक्कम पायाभरणी दीपनगर येथे सुरू असलेला ६६० मेगावॅट क्षमतेचा थर्मल प्रकल्प आणि मुख्यमंत्री सौर वाहिनी योजनेतून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास अखंडित वीजपुरवठा करण्याचा संकल्प हे जिल्ह्याच्या कृषी आणि औद्योगिक विकासाला अधिक गती देणारे उपक्रम आहेत.

दळणवळण आणि वाहतूक क्षेत्रात क्रांतिकारक बदल जळगाव विमानतळावर नाशिक, पुणे, मुंबई, अहमदाबाद व कोल्हापूर अशा प्रमुख शहरांना थेट विमानसेवा सुरू करण्यात आली आहे. रेल्वे स्टेशनचे अमृत योजनेतून आधुनिकीकरण आणि चौपदरीकरण, तसेच पाचोरा-जामनेर नवीन रेल्वे मार्गामुळे जिल्ह्याची वाहतूक व्यवस्था बळकट होत आहे.

आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती आरोग्य क्षेत्रात खाजगी रुग्णालयांत गरीबांसाठी परवडणाऱ्या व दर्जेदार उपचारांची व्यवस्था निर्माण केली आहे. राष्ट्रीय दर्जाचे बॉक्सिंग केंद्र, क्रीडा संकुल, मेडिकल हब आणि कॉलेजेस उभारणीचा प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे.

शेती आणि सिंचनासाठी ठोस पावले २००० एकर शेततळी योजना, सिंचन सुविधा, मत्स्यव्यवसाय विस्तार हे उपाय जिल्ह्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी करण्यात आलेले महत्त्वपूर्ण प्रयत्न आहेत.

सामाजिक न्यायाचा अग्रणी नेता फुले- शाहू -आंबेडकरांच्या विचारांवर चालणारे गुलाबराव पाटील हे केवळ योजना जाहीर न करता त्यांची काटेकोर अंमलबजावणी करतात. प्रत्येक गाव आणि वस्तीत जाऊन तिथल्या गरजा ओळखत त्यांनी 'जिल्हा म्हणजे एक कुटुंब' या भावनेने काम केले आहे.

गुलाबराव पाटील यांचा वाढदिवस म्हणजे केवळ अभिनंदनाचा दिवस नाही, तर त्यांच्या दूरदृष्टी आणि लोकाभिमुख नेतृत्वातून प्रेरणा घेण्याचा दिवस आहे. त्यांना दीर्घायुष्य लाभो, उत्तरोत्तर यश लाभो, आणि महाराष्ट्राच्या तसेच जळगाव जिल्ह्याच्या प्रगतीचा हा प्रवास असाच पुढे सुरू राहो. हीच प्रभू चरणी प्रार्थना!

शुभेच्छुक
**-शिवराज पाटील,** शिवसेना तालुकाप्रमुख व माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य, जळगाव
(७३८७८७२८७१)




































www.tarunbharat.net
तरुण भारत
मायगोवा
नागपूर, गुरुवार, ५ जून २०२५




रोखठोक

**हितेश शंकर**

# पाकिस्तानला दणका आणि डाव्यांची मळमळ...!



तुम्हाला २३ मार्च २०१३ ची संध्याकाळ आठवते का? जर नसेल तर मी तुम्हाला आठवण करून देतो. याच दिवशी संध्याकाळ होण्यापूर्वी, दिल्लीतील रायसीना रोडवरील बुद्धिजीवींच्या मेळाव्याचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रेस क्लबमध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्राची प्रतिकृती अतिशय दिमाखात उभी होती. पण संध्याकाळपर्यंत, फक्त त्याचा लहान तुकडाच तेथे शिल्लक राहिला होता... प्रतिकृती गायब झाली नाही, ती चोरीला गेली नाही, तर ती तोडण्यात आली... आणि तीही पहिल्यांदाच नाही तर दुसऱ्यांदा. हा मुद्दा पांचजन्यने प्रामुख्याने उपस्थित केला होता.

व्वारे, बुद्धिजीवींनो! ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या नुसत्या प्रतिकृतीबद्दल इतका राग! पण का? जरा लक्षात घ्या, जेव्हा जेव्हा देशाच्या सीमेवर तणाव वाढतो, तेव्हा क्षेपणास्त्रांच्या बातम्या मथळे बनतात आणि त्यावेळी देशात आणखी एका गोटात खळबळ उडते. ही खळबळ केवळ लष्करी रणनीती किंवा आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीपुरती मर्यादित नाही, तर ती भारतीय समाजातील विचारसरणी, असुरक्षितता आणि आकांक्षा देखील अधोरेखित करते. भारत आणि रशियाने संयुक्तपणे विकसित केलेले आणि ज्याचे नाव ब्रह्मपुत्र आणि मॉस्कोवा नद्यांच्या संगमावरून घेतले गेले आहे. ते केवळ एक क्षेपणास्त्रच नाही तर ते भारताच्या तांत्रिक, सामरिक आणि मानसशास्त्रीय चेतनेचे प्रतीक बनले आहे.

**अद्वितीय ब्रह्मोस**

ब्रह्मोसची तांत्रिक वैशिष्ट्ये अद्वितीय आहेत. हे एक सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र आहे, जे मॅक २.८ ते ३.० वेगाने आकाशात झेपावू शकते (म्हणजे ध्वनीच्या वेगापेक्षा सुमारे तीन पट जास्त). त्याची श्रेणी २९० ते ८०० किलोमीटरपेक्षा जास्त आहे आणि ते २००-३०० किलोग्रॅम वजनाची पारंपरिक किंवा आण्विक शस्त्रे वाहून नेऊ शकते. हे ध्वनीपेक्षा जास्त वेगाने उडून जबरदस्त प्रहार करणारे बहुआयामी वैशिष्ट्य असलेले असे क्षेपणास्त्र आहे जे जमिनीच्या पृष्ठभागापासून केवळ तीन ते दहा पंधरा मीटर उंचीपासून पंधरा हजार मीटर उंचीपर्यंत उडून तीनशे किलोमीटरपर्यंत अचूकतेने मारा करू शकते. ते जमिनीच्या पृष्ठभागावरून, पाणबुड्या आणि आकाशातून उडणाऱ्या विमानांवरून सोडले जाऊ शकते आणि त्याचे पेलोड म्हणजेच वॉरहेड पारंपरिक ते अणुऊर्जेपर्यंत असू शकते.

ब्रह्मोस क्षेपणास्त्राचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे 'मॅन्युव्हरेबल' तंत्रज्ञान. म्हणजेच, लक्ष्यावर डागल्यानंतरही ते आपला मार्ग बदलू शकते, इकडेतिकडे हलणारे, फिरणारे लक्ष्यही गाठू शकते आणि रडार किंवा इतर क्षेपणास्त्र शोध प्रणालींना चुकवण्यास अर्थात 'चकमा' देण्यास ते सक्षम आहे. लष्कर, नौदल आणि हवाई दल- या तीनही सेनादलांसाठी - हे एक असे क्षेपणास्त्र आहे जे भारताची सुरक्षा बहुआयामी आणि लवचिक बनवते. परंतु ब्राह्मोसचे प्रतिध्वनी केवळ युद्धभूमीपुरतेच मर्यादित नाही. हे प्रतिध्वनी भारतीय समाजातही ऐकू येतात, विशेषतः त्या वर्गात, जे भारताच्या लष्करी सामर्थ्यात वाढ झाल्याने अस्वस्थ, अशांत आहेत. जेव्हा जेव्हा भारत ब्राह्मोससारखी क्षेपणास्त्रे तैनात करतो किंवा सर्जिकल स्ट्राईक करतो तेव्हा देशात शांती, शांती आणि 'डी-एस्केलेशनचे' आवाज उठू लागतात. जर तुम्ही हे प्रतिध्वनी काळजीपूर्वक ऐकले तर तुम्हाला आढळेल की हे आवाज बहुतेकदा अशा व्यासपीठांवरून येतात जिथे प्रेस क्लब, विद्यापीठे आणि माध्यमांच्या नावाखाली वादविवाद, चर्चासत्रे होतात. येथे युक्तिवाद केले जातात की, 'लष्करी सामर्थ्याने शांती प्रस्थापित करता येत नाही किंवा शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे तणाव वाढतो' पण आज, पहलगामच्या वेदना आणि ऑपरेशन सिंदूरच्या पराक्रमाच्या सावलीत बसून, शांतपणे विचार करा - हा युक्तिवाद, हे तर्क योग्य आहेत का? ते निष्पक्षपणे मांडले आहेत का? हे युक्तिवाद भारताच्या आणि समाजाच्या हितासाठी केले जातात का? किंवा, भारताच्या स्वावलंबी आणि बलवान होण्यामुळे निर्माण होणाऱ्या अस्वस्थतेचे प्रतिबिंब तर यात उमटत नाही? जर तुम्ही थोडे अधिक काळजीपूर्वक पाहिले, थोडे अधिक निरीक्षण केले तर तुम्हाला आढळेल की हे शांतीदूत आणि त्यांचे समर्थक जे काही विशेष प्रसंगी शांतीचे गीत गातात तेच नक्षलवाद्यांच्या हिंसाचाराचे आणि वेगवेगळ्या ठिकाणी दहशतवाद्यांच्या कृत्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष समर्थन करीत असतात. सरकारी यंत्रणेकडून छळ झाल्यामुळे नक्षलवादी शस्त्रे हाती घेतात हा त्यांचा नेहमीचा युक्तिवाद असतो, दहशतवाद्यांच्या जिहादी कृत्यालाही हे बुद्धिजीवी तात्त्विक मुलामा देतात. त्यांची शांतीची व्याख्या निव्वळ सोयीस्कर असते. मानवाधिकारांचे हनन झाल्याचे खोटे नॅरेटिव्ह रचण्याचा बौद्धिक खेळ ते नेहमीच खेळत राहतात. हा प्रश्न केवळ विचारसरणीचा नाही तर आत्मविश्वास आणि असुरक्षिततेच्या मापदंडांवर देखील याचे परीक्षण झाले पाहिजे. पाकिस्तानच्या आयएसआय जनरलला ब्रह्मोसची भीती वाटणे स्वाभाविक आहे. पण जेव्हा भारतात बसलेले काही बुद्धिजीवी याला चिथावणीचे राजकारण म्हणतात, तेव्हा खरी चिंता भारताच्या सामर्थ्याची असते, युद्धाच्या भयावहतेची नाही. कारण हिंसाचाराच्या माध्यमातूनच परिवर्तन घडू शकते हा तर वामपंथी बुद्धिजीवींचा नेहमीचा युक्तिवाद असतो. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या हिंसाचाराला डाव्यांचा नेहमीच पाठिंबा असतो. वास्तविक पाहता, ब्रह्मोस हे स्वदेशी शास्त्रज्ञ, संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) आणि भारतीय उद्योगांचे सामूहिक यश आहे. सुरक्षा क्षेत्रातील ही प्रगती स्वदेशीच्या घोषणेचा परिणाम आहे. हीच गोष्ट समाजातील त्या वर्गाच्या डोळ्यांत नेहमी खुपते जे मजबूत, सशक्त भारताऐवजी 'ब्लीड इंडिया विथ ए था थाऊजंड कट्स' चे स्वप्न पाहतात.

> **जेव्हा जेव्हा भारत आपले सामर्थ्य वाढवतो तेव्हा तेव्हा वामपंथी विचारसरणीच्या लोकांची अस्वस्थता अचानक वाढते. त्यांना युद्धाची शक्यता दिसू लागते, का? भारत शक्तिशाली होत असल्याबद्दल वामपंथी विचारसरणीच्या लोकांची अस्वस्थता समजून घेणे आवश्यक आहे.**

'ब्लीड इंडिया विथ ए था थाऊजंड कट्स' (हजार जखमा करून भारताला रक्तबंबाळ करणे) हे धोरण पाकिस्तानचे माजी लष्करी हुकूमशहा जनरल झियाउल हक यांच्या डोक्यातून निघाल्याचे मानले जाते. झियाउल हक पाकिस्तानचे राष्ट्रपती असताना १९८० च्या दशकात हे धोरण तयार आणि अमलात आणण्यात आले. पारंपरिक युद्धाऐवजी 'प्रॉक्सी वॉर' द्वारे सतत अंतर्गत अस्थिरता आणि दहशतवादाद्वारे भारताला दुर्बळ करणे हा त्याचा उद्देश होता. या अंतर्गत, भारतातील काश्मीर, पंजाब (खलिस्तान चळवळ) आणि देशातील इतर सीमावर्ती भागात अतिरेकीपणा आणि दहशतवादाला प्रोत्साहन देण्याची योजना आखण्यात आली. हे धोरण अमलात आणण्यासाठी आयएसआयला मुख्य साधन बनवण्यात आले. जगभरात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे प्रतीक असलेले प्रेस क्लब भारतात अनेकदा एका विशिष्ट विचारसरणीचे व्यासपीठ बनून जाते. येथे जेएनयूमध्ये दिले जाणारे नारे प्रेस रिलीज बनतात, 'दानवां'साठी 'मानवाधिकारां'ची चर्चासत्रे आयोजित केली जातात आणि सैन्याच्या पराक्रम व शौर्यावर टीका करण्यासाठी नॅरेटिव्ह, युक्तिवाद आधीच तयार केले जातात. हे समजून घेणे आवश्यक आहे की युद्धभूमी ही आता केवळ सीमांपुरतीच मर्यादित नाही; ही लढाई मायक्रोफोन आणि 'पॅनेल डिस्कशन' मध्ये देखील लढली जाते आणि हे देशाच्या राजधानीच्या अगदी मध्यभागी असलेले एक ठिकाण आहे जिथे वामपंथी आघाडी बऱ्याच काळापासून कार्यरत आहे.

**डाव्यांची अस्वस्थता वाढते तेव्हा...**

भारताची वाटचाल स्वावलंबनाकडे अर्थात आत्मनिर्भरतेकडे होत असताना, संरक्षण क्षेत्रात एचएएल, डीआरडीओ, एल ॲण्ड टी सारखी भारतीय नावे चमकताच, काही 'सिक्युरिटी एक्सपर्ट्स'ना मळमळ वाटू लागते. भारताच्या प्रत्येक यशाने, प्रगतीच्या गाठलेल्या टप्प्याने आणि पाकिस्तानला बसलेल्या प्रत्येक दणक्याने या सेक्युलर, पुरोगामी बुद्धिजीवींची अस्वस्थता वाढते. जर भारताने ब्रह्मोस तैनात केले तर त्यांना यात 'युद्धाचा उन्माद' दिसतो. चीनने भारतावर डोळे वटारताच हे बुद्धिजीवी ड्रॅगनला फटकारण्याऐवजी भारतालाच घाबरवू लागतात. जेव्हा त्यांना देश आणि राष्ट्रीय स्वाभिमानाशी संबंधित प्रश्न विचारले जातात तेव्हा त्यांचे वाय-फाय बंद पडते. जेव्हा भारत व्याप्त काश्मिरात (पीओजेके) सर्जिकल स्ट्राईक करतो तेव्हा ते 'युद्ध थांबवण्याचे आवाहन' करतात, जेणेकरून भारत पुढच्या वेळी तयारी करू नये. त्यांचा चष्मा, दृष्टिकोन आणि रणनीती अगदी स्पष्ट आहे- सावध, सतर्क, सज्ज राहू नका, सामर्थ्यशाली होऊ नका आणि जर हल्ला झाला तर आम्हाला मध्यभागी ठेवून बोलणी करा' जेव्हा ब्रह्मोससारखी क्षेपणास्त्रे भारताच्या संरक्षणासाठी तैनात केली जातात, तेव्हाच काही बुद्धिजीवी 'तणाव वाढण्या' बद्दल बोलू लागतात. पण जर तुम्ही थोडेसे खोदून पाहिले तर तुम्हाला आढळेल की त्यांच्या टि?टर हँडलवर २६/११ बद्दलचा संताप किंवा पुलवामाबद्दलची वेदना कधीच दिसत नाही. पाकिस्तानने पाळलेल्या जिहादी दहशतवाद्यांनी निष्पाप लोकांना गोळ्या घातल्या तरी ते तोंडातून 'ब्र' देखील काढत नाहीत. परंतु जर भारताने सणसणीत प्रत्युत्तर दिले तर ते 'ग्लोबल इमेज' बद्दल चिंतित होतात.

वस्तुस्थिती ही आहे की हा वामपंथी वर्ग भारतात बसून पाकिस्तानचे धोरण अप्रत्यक्षपणे राबवत असतो, जसे की भारताने किती दूरवर हल्ला करावा, किती मोठ्याने बोलावे आणि किती वेळा गप्प राहावे वगैरे... हे देखील सत्य आहे की युद्ध कोणासाठीही सुखद नसते. शांती, संवाद आणि विवेकाची गरज ही प्रत्येक सभ्य व सुसंस्कृत समाजाचे मूलभूत निकष आहेत. पण जेव्हा या शहाणपणाची, विवेकाची केवळ भारताकडून, केवळ भारतीय सैन्याकडून, केवळ भारतीय शास्त्रज्ञांकडूनच अपेक्षा केली जाते आणि उर्वरित जगाकडून नाही, तेव्हा ते केवळ एकतर्फी होते. विवेक, शहाणपणाची अपेक्षा केवळ भारताकडूनच का? असा प्रश्न या बुद्धिजीवींना कधीच पडत नाही. ब्रह्मोसचे प्रतिध्वनी आम्हाला आठवण करून देतात की सुरक्षा आणि शांती दोन्ही आवश्यक आहेत - आणि दोन्हींसाठी संवाद देखील आवश्यक आहे. भारताची खरी ताकद या विविधतेत, या विचारात व संवाद साधण्याच्या इच्छेत आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने दाखवलेले शौर्य आणि नंतर युद्धबंदी दरम्यान दाखवलेला संयम हे या विविधतेचे आणि या इच्छाशक्तीचे प्रतिबिंब आहे. एकाच झटक्यात नष्ट झालेले नूर खानसारखे तळ सांगत आहेत की पाकिस्तानच्या तथाकथित सर्वात सुरक्षित बालेकिल्ल्यात आता काहीही सुरक्षित नाही. उपग्रह प्रतिमा संपूर्ण जगाला हेच सांगत आहेत. ब्रह्मोस आता केवळ एक क्षेपणास्त्र नाही तर चेतना आहे. ही चेतना एकीकडे वामपंथीयांना घाबरवते, तर दुसरीकडे संपूर्ण देशाला जागृत करते की भारत आता स्वसंरक्षणासाठी इतरांवर अवलंबून नाही, तर स्वबळावर विकसित केलेल्या तंत्रज्ञानावर आणि स्वतःच्या अटींवर उभा आहे. ही चेतना आम्हाला शिकवते की प्रेस क्लब किंवा अशा इतर ठिकाणी स्थापित केलेल्या ब्रह्मोसच्या प्रतीकांवर वाईट नजर ठेवणाऱ्या त्या तथाकथित बुद्धिजीवींना वैचारिकदृष्ट्या निष्प्रभ करणे आता राष्ट्रहितासाठी आवश्यक आहे. प्रत्येक ब्रह्मोसला अशा एका लेखाची आवश्यकता आहे, जो त्याचे वैचारिक संरक्षण करेल. प्रत्येक सर्जिकल स्ट्राईकनंतर एक 'नॅरेटिव्ह स्ट्राईक' व्हायला हवा की हे युद्ध नाही तर न्यायाचा प्रतिकार आहे. आणि जेव्हा एखादा वामपंथी 'शांती'बद्दल बोलेल तेव्हा आपण त्याला विचारले पाहिजे, की कोणाची? भारताची की पाकिस्तानची?

ब्रह्मोसचा खरा हल्ला सीमेपलीकडून नाही. भारताच्या लष्करी सामर्थ्यामुळे, प्रगतीमुळे वामपंथी बुद्धिजीवी अस्वस्थ व अशांत झाले आहेत. नकारात्मक मानसिकतेचे हे वामपंथी 'युद्ध नको, उपाय हवा' असा एकच घोशा लावतात. मात्र, 'उपाय नाही तर सतत व्यत्यय हवा' अशीच त्यांची वर्तणूक असते ही वस्तुस्थिती आहे. ब्रह्मोसचा हा हल्ला अचूक ठरला आहे कारण कुंकवाच्या लालीमुळे त्या लोकांचे चेहरे लाल झाले आहेत जे आतापर्यंत दहशतवाद्यांच्या सुरात सुर मिसळवून 'लाल सलाम' ची गाणी गात होते.

**(पांचजन्यवरून साभार)**

दखल

# कुंकवाचा रंग रक्ताच्या रंगापेक्षा वेगळा नाही

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभा खासदार डॉ. शशी थरूर यांनी काही दिवसांपूर्वी एका विदेशी वाहिनीला मुलाखत दिली होती. यामध्ये त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' का राबवण्यात आले हे स्पष्ट केले. जर पाकिस्तानने कोणतेही वाकडे पाऊल उचलले तर भारत त्याला सणसणीत प्रत्युत्तर देण्यास तयार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या मुलाखतीचे संपादित अंश येथे देत आहोत.**



> पाकिस्तान घूमजाव करण्यात पटाईत आहे, हे विसरू नका. २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात १७० जणांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्यात आपला सहभाग असल्याचे पाकिस्तानने नाकारले. जेव्हा एका दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात आले तेव्हा त्यांना कबूल करणे भाग पडले की या हल्ल्यात त्यांचा हात होता. ओसामा बिन लादेन पाकिस्तानी लष्करी तळापासून काही अंतरावरच राहत होता. परंतु ही बाब पाकिस्तानने कायमच नाकारली.

**प्रश्न : भारत आणि पाकिस्तान पूर्ण युद्धाच्या उंबरठ्यावर आहेत का?**

**उत्तर** : नक्कीच नाही. भारताला युद्धात रस नाही. भारत केवळ हा संदेश देऊ इच्छित होता की दहशतवादी पाकिस्तानी भूमीवरून येथे येऊन निष्पाप नागरिकांची हत्या करून सुरक्षितपणे परत जाऊ शकत नाहीत. भारताने केवळ स्वसंरक्षणार्थ प्रतिक्रिया दिली, तीही अतिशय सावधानपूर्वक आणि विचारपूर्वक. केवळ ज्ञात दहशतवादी तळ आणि दहशतवादी संघटनांच्या मुख्यालयाला लक्ष्य केले गेले. कोणत्याही सरकारी किंवा लष्करी आस्थापनेला नाही. पण पाकिस्तानने नियंत्रण रेषेवरून प्रचंड तोफगोळे डागले, ज्यामध्ये १९ भारतीय नागरिक ठार झाले आणि ५९ जण गंभीर जखमी झाले. भारतानेही याला अतिशय सडेतोड उत्तर दिले. जेव्हा पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी भारतीय लष्करी प्रतिष्ठानांवर हल्ले करण्याचा प्रयत्न केला तेव्हा मात्र भारताने पाकिस्तानी हवाई संरक्षण दलांवर हल्ला केला. त्याळे भारत तणाव वाढवत नाही, तर केवळ सुयोग्य प्रतिक्रिया देत आहे, हे अगदी स्पष्ट आहे.

**प्रश्न : अहवालांमध्ये असे म्हटले आहे की भारताच्या हल्ल्यांमध्ये मुलेही मृत्युमुखी पडली आहेत. एक मशीद उद्ध्वस्त करण्यात आली. हल्ले खरोखरच अचूक आणि संयमी होते का?**

**उत्तर** : बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय आणि मुरीदके येथे लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय हे कुप्रसिद्ध दहशतवादी अड्डे होते. जर कोणी तिथे राहत असेल तर ते दहशतवादी नेत्यांचे कुटुंब किंवा दहशतवादी बनण्यासाठी प्रशिक्षण घेत असलेले लोक होते. ही कोणत्याही प्रकारे निष्पाप ठिकाणे, शाळा, मशिदी किंवा घरे नव्हती. येथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते, निधी दिला जातो, सुसज्ज केले जाते आणि भारतातील निष्पाप नागरिकांची हत्या करण्यासाठी पाठवले जाते. भारत यावरच प्रतिक्रिया देत होता.

**प्रश्न : दहशतवादाला प्रोत्साहन देण्यामागे पाकिस्तानचा हेतू काय असेल? पुरावा काय आहे?**

**उत्तर** : पाकिस्तान घूमजाव करण्यात अर्थात 'यू-टर्न' घेण्यात पटाईत आहे, हे विसरू नका. २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात १७० जणांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्यात आपला सहभाग असल्याचे पाकिस्तानने नाकारले. जेव्हा एका दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात आले तेव्हा त्यांना कबूल करणे भाग पडले की या हल्ल्यात त्यांचा हात होता. ओसामा बिन लादेन पाकिस्तानी लष्करी तळापासून काही अंतरावरच राहत होता. परंतु ही बाब पाकिस्तानने कायमच नाकारली. एक गोष्ट अगदी स्पष्टपणे समजून घेऊया की भारत ही एक स्थिर शक्ती आहे. त्याचे लक्ष आपली अर्थव्यवस्था वाढवण्यावर, उच्च तंत्रज्ञान सुधारण्यावर आणि तरुणांना उज्ज्वल भविष्य प्रदान करण्यावर आहे. पाकिस्तान हा एक कट्टरपंथी देश आहे जो भारताच्या काही भागांवर कब्जा करू इच्छितो कारण तेथे राहणारे लोक पाकिस्तानी लोकांप्रमाणेच एका धर्माचे पालन करतात. भारतात २० कोटी मुस्लिम आहेत, ते त्यांच्यावर कब्जा करू इच्छितात का? हा एक हास्यास्पद दृष्टिकोन आहे जो पाकिस्तानने स्वीकारला आहे. ते गेल्या ३० वर्षांपासून भारतात रक्तपात घडविण्यासाठी आणि काश्मीर प्रदेशावर कब्जा करण्यासाठी दहशतवादी पाठवत आहे.

पाकिस्तानला हे समजत नाही की निष्पाप नागरिकांच्या हत्येमुळे बदला घेतला जाईल. पठाणकोट हल्ला झाला तेव्हा पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला चौकशीत सामील होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. ते आले आणि परत जाऊन म्हणाले की भारताने हा हल्ला केला आहे. पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने एअर स्ट्राईक केला. पण यावेळी पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला तेव्हा भारताने पाकिस्तानातील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. भारताला शांतता हवी आहे आणि आम्ही पाकिस्तानी लोकांनाही असेच करण्याचे आवाहन करू. लाल कुंकू हे सौभाग्याचे प्रतीक आहे. मुली-महिला ते लावतात. सिंदूरचा अर्थात कुंकवाचा रंग रक्ताच्या रंगापेक्षा फारसा वेगळा नाही.

**प्रश्न : कधीकधी दोन्ही देशांना ८० वर्षे जुने प्रश्न सोडवण्याची संधी मिळते. या संदर्भात काही आशा आहे का?**

**उत्तर** : जर वर्तमान संकटाचा विचार केला तर भारताला संयम बाळगण्याचे आवाहन करण्याची गरज नाही, कारण भारत आधीपासूनच संयम बाळगत आहे. भारताने आधीच म्हटले आहे की तो कोणतीही लष्करी कारवाई करणार नाही, परंतु लष्करी कारवाई लादली गेल्यास सडेतोड उत्तर देईल. म्हणून, आंतरराष्ट्रीय समुदायाने बस एवढेच करायचे आहे की त्यांनी पाकिस्तानला योग्य मार्गाने जाण्यास सांगावे. ज्या दिवशी तो दहशतवादी हल्ले थांबवेल, त्या दिवशी सर्व काही ठीक होईल. जर त्यांना युद्ध हवे असेल तर त्यांना युद्ध मिळेल. दोन्ही देशांपैकी कोणता देश युद्धात टिकून राहण्याची क्षमता बाळगतो याबद्दल फार कमी लोकांना शंका आहे. आता चेंडू पूर्णपणे पाकिस्तानच्या कोर्टात आहे. आम्ही दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानला जे हवे आहे ते मुळीच मिळू देणार नाही.

पाकिस्तानशी कोण बोलू शकते आणि त्याला या परिस्थितीतून बाहेर काढू शकते आणि कोण तणाव कमी करण्यास मदत करू शकेल? ते कोणाचे म्हणणे मान्य करतील? कारण असे दिसत नाही की वॉशिंग्टनला या संघर्षात थोडेसेही सहभागी होण्याची इच्छा आहे. चीनने या विषयावर एक मनोरंजक विधान केले आहे. तो पाकिस्तानचा 'सदाहरित' मित्र आहे. पाकिस्तानच्या एकूण कर्जाच्या ३० टक्के कर्जावर चीनचे नियंत्रण आहे. याशिवाय, चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर देखील आहे जो चीनसाठी आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. अशा परिस्थितीत, पाकिस्तान चीनचे ऐकेल अशी अपेक्षा केली जाऊ शकते.

**प्रश्न : टाईम्स ऑफ इंडियाने आपल्या एका ऑनलाईन वृत्तात लिहिले आहे की, 'अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हेन्स यांनी संयम बाळगण्याचे आवाहन केले, ज्यामुळे भारतात संताप निर्माण झाला.' भारताला अमेरिकेने विश्वासघात केल्याचे वाटत आहे का?**

**उत्तर** : मी हा लेख वाचलेला नाही, म्हणून मला लेखकाचा हेतू माहीत नाही. भारताने आधीच संयमाविषयी सांगितले आहे. आम्ही हे आधीच स्पष्ट केले आहे की आमची कारवाई केवळ दहशतवादी हल्ल्याला प्रतिसाद म्हणून होती. आम्हाला संयम बाळगण्याचे आवाहन करण्याऐवजी, पाकिस्तानला संयम बाळगण्याचे आवाहन करणे अधिक आवश्यक आहे. जर त्यांनी गोळीबार सुरूच ठेवला तर भारत देखील जोरदार प्रत्युत्तर देईल. भारताला देखील स्वाभिमान आहे.

**प्रश्न : या संपूर्ण घटनेत तुम्हाला कोणत्याही बाजूने अण्वस्त्रांचा वापर करण्याचा धोका किंवा संकेत जाणवला का?**

**उत्तर** : भारताकडून तर निश्चितच नाही. भारत अण्वस्त्रांचा वापर करण्याची धमकी देत नाही, कारण ते आमचे धोरणच नाही. पाकिस्तानचे असे कोणतेही धोरण नाही. पाकिस्तानने अनेक वेळा इशारा दिला आहे की ते प्रथम अण्वस्त्रांचा वापर करू शकतात. पाकिस्तानची तुलना भारताशी करणे पूर्णपणे चुकीचे आहे. एक देश दहशतवादाचा समर्थक आहे आणि दुसरा दहशतवादाचा बळी आहे. एका देशाने प्रथम अण्वस्त्र हल्ल्याला नकार दिला आहे आणि दुसऱ्याने पर्याय खुला ठेवला आहे. म्हणून जर काही जबाबदारी असेल तर ती केवळ पाकिस्तानचीच आहे. त्याने आपल्या वर्तनावर संयम ठेवावा.

**प्रश्न : तुम्हाला हे संपूर्ण प्रकरण कुठे जात आहे असे वाटते?**

**उत्तर** : आशा आहे की काही विदेशी राजधानीतील लोक पाकिस्तानला स्पष्टपणे सांगतील की, 'तुम्ही पुरेशा गोळ्या झाडल्या आहेत, पुरेसे जीव घेतले आहेत, आता थांबा.'

जर ते असे म्हणाले नाहीत, विशेषः बीजिंग, तर परिस्थिती खूप अस्थिर होऊ शकते. पाकिस्तानला आपल्या सैन्याची प्रतिष्ठा वाचवण्यासाठी युद्धाचा शॉर्टकट घेण्याचा मोह होऊ शकतो. जगाच्या नजरेत, पाकिस्तान दहशतवादाला प्रोत्साहन देणारा देश म्हणून ओळखला जातो. हाच देश तालिबानला प्रोत्साहन देत आला आहे. हिलरी क्लिंटन यांनी असेही म्हटले आहे की, त्यांनी विषारी साप पाळले आहेत आणि आज तेच त्यांना दंश करीत आहेत. आता पाकिस्तानला जगाच्या मदतीची सर्वांत जास्त गरज आहे. यासाठी त्याला शांतीच्या मार्गावर यावे लागेल.

***(अल अरेबिया इंग्लिशवरून साभार)***

राष्ट्ररक्षा

ब्रिगेडियर हेमंत महाजन

९०९६७०१२५३

# माहिती युद्ध : भारतापुढील एक मोठे आव्हान

## 'ऑपरेशन सिंदूर' आणि देशहितावरील राजकारण




युद्ध किंवा सीमावर्ती कारवाई केवळ लष्कराच्या सामर्थ्यावर अवलंबून नसते, तर तिची खरी ताकद जनतेचा पाठिंबा आणि राष्ट्रभावनेने प्रभावित कृतिशील जनता असते. अशा परिस्थितीत देशाची एकजूट टिकवणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. १४० कोटी भारतीय एकमुखाने भारतीय लष्कराच्या पाठीशी उभे असतानाही, काही विरोधकांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या झाडल्याच नाहीत, अशी भूमिका काहींनी घेतली.

भारताने नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करून 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी केले. या कारवाईत १०० हून अधिक दहशतवादी ठार झाले. पाकिस्तानने भारतावर डागलेली क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्सला भारताने चोख प्रत्युत्तर दिले, ज्यामुळे पाकिस्तानच्या हवाई तळांचे आणि दारूगोळा भांडारांचे मोठे नुकसान झाले. यामुळेच पाकिस्तानने नमते घेत भारताकडे युद्धविरामाची मागणी केली आणि ती मान्य झाली.

काही जणांना भारत-पाक युद्ध हवे होते, पाकव्याप्त काश्मीर परत घेण्याची मागणी अनेकांनी केली होती. काही जणांनी देश न जिंकलेल्या युद्धाचा विजय साजरा करीत आहे, असे तारे तोडले. पाकिस्तानने स्वतःच्या झालेल्या नुकसानीची सविस्तर यादीही प्रसिद्ध केली. भारताचा हेतू साध्य झाला. मात्र भारत-पाक युद्धाची वाट पाहणाऱ्या विरोधकांचा हेतू साध्य न झाल्याने त्यांनी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली.

### देशहितावर राजकीय टीका: काही प्रश्न

भारत सरकारने सर्वपक्षीय शिष्टमंडळे जगभरात पाठवण्याचा निर्णय घेतला असताना, काही राजकीय पक्ष पुरावे द्या, पारदर्शकता कुठे आहे अशा मागण्या करताना दिसतात. देशहिताच्या विषयांवर किमान सर्वपक्षीय एकजूट अपेक्षित आहे. अनेक जण विचारतात की आपण किती विमाने गमावली. पण ते कधीही विचारत नाहीत की या युद्धात भारतीय सैन्याने किती पाकिस्तानी विमाने पाडली किंवा किती विमानतळ उद्ध्वस्त केले.पहलगामच्या दहशतवादी हल्ल्याबाबत काही म्हणाले, भावाभावांना आपसात लढवण्यासाठी ही घटना घडली आहे. त्यांनी स्पष्ट करावे की कोण आणि कुणाचे भाऊ? अजून कितीवेळ या असल्या दहशतवादी 'भाईं'चा चारा व्हायचे आहे? दहशतवाद्यांनी केवळ हिंदू असल्याने २६ हिंदूंना त्यांच्या पत्नी आणि लहान मुलांसमोर ठार मारले. ते पुरुष मुस्लिम आहेत का, हे तपासण्यासाठी पॅन्टही उतरवल्या. तरीही काही नेते म्हणाले की, दहशतवाद्यांना इतका वेळ असतो का, की ते कुणाचा धर्म विचारून मारतील? याचाच अर्थ, दहशतवादी हल्ल्यातील पीडित कुटुंब खोटे बोलत आहेत. पीडितांना खोटे ठरवून दहशतवादी 'धर्मांध' नव्हतेच, असे सांगण्याचा खटाटोप का केला? एका मुख्यमंत्र्यांनी पाकिस्तानसोबत युद्ध नको असे मत व्यक्त केले. पाकिस्तानचा इतका पुळका का? तसेच, त्या दहशतवाद्यांनी महिलांना हातही लावला नाही, असे काही म्हणाले. दहशतवाद्यांनी महिलांना मारले नाही, केवळ हिंदू पुरुषांना मारले, याबद्दल त्यांचे उपकार मानायचे का? मतांच्या लाचारीसाठी काही राजकीय नेते काहीही विधाने करू शकतात का?

या घटनेनंतर एक गोष्ट मात्र अतिशय स्पष्टपणे सिद्ध झाली की, देशाचे शत्रू सीमेपारच नाही, तर भारताच्या आतमध्येही दबा धरून बसले आहेत. समाजकारण, राजकारण आणि प्रसारमाध्यमात असलेल्या देशशत्रूंचे उघड किंवा छुपे समर्थन करणाऱ्या विषारी सापांचे काय करायचे, हाच प्रश्न आहे.

### अंतर्गत शत्रू ; कठोर कारवाईची गरज

सीमेबाहेर आणि अंतर्गतही गृहयुद्ध पुकारणाऱ्या या असल्या लोकांवर आता कडक कारवाई होणे गरजेचेच आहे. या देशद्रोह्यांना ठेचायलाच हवे.

### नागरिक म्हणून आपली भूमिका

भारतात चाललेल्या भारतविरोधी किंवा देशद्रोही प्रचाराचा उपयोग पाकिस्तान आणि चीनने माहिती युद्धात (इन्फर्मेशन वॉरफेअर) विजय मिळवण्यासाठी पुरेपूर करून घेतला आहे. पाकिस्तानी लष्कराच्या प्रवक्त्याने एका पत्रकार परिषदेत आंतरराष्ट्रीय माध्यमांसमोर एक व्हिडिओ दाखवला. या व्हिडिओमध्ये, भारताचे प्रसिद्ध पत्रकार करण थापर हे काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांची मुलाखत घेत होते. या मुलाखतीत सत्यपाल मलिक यांनी सांगितले की, पुलवामामध्ये सीआरपीएफच्या जवानांना पाकिस्तानी दहशतवाद्यांनी नाही, तर भारतानेच मारले आणि पाकिस्तानवर खोटे आरोप केले. पुलवामा हल्ला झाला तेव्हा सत्यपाल मलिक हे काश्मीरचे राज्यपाल असल्याने त्यांच्या विधानाला महत्त्व दिले जाते. पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय माध्यमांसमोर शंभरहून अधिक भारतीयांचे व्हिडीओ दाखवले, ज्यात हे भारतीय, भारतविरोधी भाषा वापरत होते आणि पाकिस्तानची बाजू मांडत होते. थोडक्यात, हे भारतीय आंतरराष्ट्रीय माध्यमांसमोर पाकिस्तानचे प्रवक्ते म्हणून काम करीत होते आणि हे सिद्ध करत होते की भारताने किंवा भारतीय प्रवक्त्यांनी दिलेली माहिती चुकीची होती आणि पाकिस्तान जे म्हणत होता ते बरोबर होते.

> पहलगाम दहशतवादी हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर' नंतर एक गोष्ट मात्र सिद्ध झाली की, देशाचे शत्रू सीमेपारच नाही, तर भारताच्या आतमध्येही दबा धरून बसले आहेत. समाजकारण, राजकारण आणि प्रसारमाध्यमात असलेल्या देशशत्रूंचे उघड किंवा छुपे समर्थन करणाऱ्या विषारी सापांचे काय करायचे, हाच प्रश्न आहे. सीमेबाहेर आणि अंतर्गतही गृहयुद्ध पुकारणाऱ्या या असल्या लोकांवर आता कडक कारवाई होणे गरजेचेच आहे. या देशद्रोह्यांना ठेचायलाच हवे.

### पाकिस्तानला मिळालेला 'मानसिक विजय'

या युद्धात पाकिस्तानने मोठा मानसिक विजय मिळवला का? पाकिस्तानने जगाचे लक्ष दहशतवाद/दहशतवादी हल्ल्यांपासून काढून घेतले आणि यावर लक्ष केंद्रित केले की, भारत आपल्या नागरिकांचे काश्मीरमध्ये रक्षण करू शकला नाही, पाकिस्तानने भारताचे खूप जास्त लष्करी नुकसान केले आहे, युद्धात भारताचा पराभव झाला आहे आणि पाकिस्तानच्या लष्कराने जास्त चांगली कामगिरी बजावली आहे. याचा परिणाम असा झाला की, पाश्चिमात्य माध्यमांनी लिहिलेले लेख किंवा संपादकीय बहुतेक वेळा भारताच्या विरोधात होते आणि पाकिस्तानच्या बाजूने होते. खरे तर, पाश्चिमात्य मीडियाने भारताचे समर्थन करायला हवे. कारण भारत एक लोकशाही राष्ट्र आहे. परंतु त्यांनी पाकिस्तानी लष्कराच्या ताब्यात असलेल्या पाकिस्तानचे म्हणणे बरोबर आहे असे सांगितले. पाश्चात्त्य माध्यमांनी अशा प्रकारची मते बनवण्यामध्ये भारताच्या आत भारतीयांनी केलेल्या देशविरोधी विधानांचा पुरेपूर वापर केला.

थोडक्यात, माहिती युद्धात किंवा मानसिक युद्धात भारत खूपच मागे पडला. पाकिस्तानला हे मानसिक युद्ध जिंकण्यात मदत करणाऱ्यांवर देशाच्या आत काय कारवाई करायची हे भारतीय जनतेने ठरवायला पाहिजे.

### विरोधाला आळा घालण्यासाठी उपाययोजना

परदेशातील वर्तमानपत्रांचे अनेक पत्रकार जे भारताच्या विरोधात लिहितात, त्यांची ओळख पटवून त्यांच्याविरुद्ध देखील कारवाई करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, त्यांच्यावर भारतात बहिष्कार टाकला जाऊ शकतो. त्यांना भारतात येण्यासाठी व्हिसा देणे थांबवले जाऊ शकते. एवढेच नव्हे, तर ते ज्या वर्तमानपत्रात लिहितात त्या वर्तमानपत्रावर सुद्धा बहिष्कार टाकला जाऊ शकतो किंवा त्यांना भारताच्या आत ब्लॉक केले जाऊ शकते.'ऑपरेशन सिंदूर' संपून अनेक दिवस झाले आहेत, परंतु अजूनही हे अपप्रचार युद्ध, दुष्ट प्रचार युद्ध किंवा मानसिक युद्ध सुरूच आहे.

### माहिती योद्धा बना!

अशा युद्धामध्ये देशभक्त नागरिक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. विदेशातील समाज माध्यमे, मुद्रित माध्यमे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये जेव्हा जेव्हा भारताच्या विरोधात काही बोलले जाते किंवा लिहिले जाते, त्याला लगेचच प्रत्युत्तर त्या त्या मीडियामध्ये देणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, न्यूयॉर्क टाईम्सने जर एखादा भारतविरोधी लेख लिहिला तर न्यूयॉर्क टाईम्सला ईमेल पाठवून या लेखात केलेल्या माहितीचे खंडन करायला पाहिजे आणि न्यूयॉर्क टाईम्सला दाखवून दिले पाहिजे की त्यांनी लिहिलेले लेख पूर्णपणे चुकीचे आहेत. आंतरराष्ट्रीय माध्यमांची व्याप्ती प्रचंड आहे. म्हणून, प्रत्येक सुशिक्षित भारतीयाने माहिती योद्धा बनून अशा भारतविरोधी लिखाणांवर लक्ष ठेवून त्याला प्रत्युत्तर देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. 'ऑपरेशन सिंदूर' ही केवळ एक सैनिकी कारवाई नाही. दहशतवाद्यांना, पाकिस्तानला आणि देशांतर्गत कार्यरत असलेल्या राष्ट्रद्रोही शक्तींना दिलेला हा निर्णायक इशारा आहे. भारत आता केवळ प्रतिक्रिया देणारे राष्ट्र राहिले नसून, ते निर्णायक निर्णय घेणारे, विश्वासार्हता कायम ठेवणारे आणि जबाबदारीने कारवाई करणारे राष्ट्र म्हणून जागतिक पातळीवर उदयास येत आहे. हे यश एका रात्रीत मिळालेले नाही, तर दशकभराच्या दूरदृष्टीचा, संकल्पाचा आणि सततच्या प्रयत्नांचा तो परिपाक आहे. हे यश कायम राखायचे असेल, तर राजकीय, सामाजिक आणि वैचारिक स्तरावर 'राष्ट्र प्रथम' या भावनेने एकत्र येणे हीच काळाची मागणी आहे. राष्ट्रद्रोही शक्तींना ठेचायलाच हवे.

मंथन

डॉ. विवेक राजे/९८८१२४२२२४


# नागरिक कर्तव्यांचे पालन...

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शताब्दी वर्षाच्या निमित्ताने 'पंच परिवर्तनाची' हाक दिली. या पंच परिवर्तनातील अत्यंत महत्त्वाचा आयाम म्हणजे नागरिक कर्तव्यांचे पालन हा होय. अत्यंत योग्य वेळी, अत्यंत महत्त्वाचा असा हा आयाम संघाने निवडला आहे. भारतीय लोकशाहीमध्ये १) विधिमंडळ २) न्यायपालिका ३) प्रशासन आणि ४) प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे चार आधारस्तंभ आहेत असे म्हटले जाते. विधानमंडळांनी निवडलेले २९६ प्रतिनिधी आणि ९३ नियुक्त प्रतिनिधी अशा ३८९ प्रतिनिधींनी दोन वर्षे ११ महिने १८ दिवसांच्या एकूण कालावधीत १६६ दिवसांच्या बैठकांमधे विचार विनिमय करून तयार केलेल्या संविधाना द्वारे काही मूलभूत अधिकार आणि नागरिक कर्तव्य जनतेला बहाल केले गेले. दुर्दैवाने स्वातंत्र्यप्राप्तीपासून या देशात केवळ घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचाच डंका पिटण्यात आला. जनतेला दिलेले मूलभूत अधिकार निश्चितच महत्त्वपूर्ण आहेत. पण कोणत्याही लोकशाही देशात केवळ अधिकारांवरच सर्व जनतेचे लक्ष केंद्रित होणे हे देखील घातकच ठरते. कारण अधिकार आणि कर्तव्ये नेहमीच हातात हात घालून येतात. भारतात मात्र लोकशाहीचे वरील चारही स्तंभ, जनतेला कर्तव्यांचे शिक्षण आणि जाणीव करून देण्यात कमी पडले, ही वस्तुस्थिती आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकांची ११ मूलभूत कर्तव्ये वा जबाबदाऱ्या देखील सांगितल्या आहेत. ही अकरा कर्तव्य पुढीलप्रमाणे.

१) संविधानाचे पालन करणे २) राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करणे ३) भारताचे सार्वभौमत्व आणि एकता टिकवून ठेवणे ४) राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा देणाऱ्या उदात्त आदर्शांचे पालन करणे ५) सर्व भारतीयांमध्ये समान बंधुत्वाची भावना वाढवणे ६) सामाजिक परंपरा आणि संस्कृतीचा आदर करणे ७) पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे ८) सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ९) वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी विचार विकसित करणे. १०) सामुदायिक आणि वैयक्तिक उपक्रमांमध्ये उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे ११) हिंसा आणि गैर-कायदेशीर कृत्यांपासून दूर राहणे.

ही सगळी मूलभूत कर्तव्ये देशाच्या नागरिकांना त्यांची जबाबदारी सांगणारी आहेत. त्याचप्रमाणे सर्व नागरिकांच्या मनात देशभक्तीची भावना तसेच सामाजिक सौहार्द निर्माण करणारी आहेत. नागरिक म्हणून प्रत्येक माणसाचा सहभाग वाढवणारी जशी आहेत तशीच घटनेने दिलेले अधिकार आणि कर्तव्ये यांचा समतोल साधणारी आहेत. या देशाची एकात्मता वाढविणारी आहेत तशीच या देशाच्या लोकशाही व्यवस्थेत लोकांचा सहभाग वाढवणारी आहेत. मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्य यांचा समतोल साधला की, हा वाढलेला सहभाग, वाढलेली एकात्मता, देशभक्ती आणि जबाबदारीची जाणीव या देशाला सामर्थ्यशाली बनवणारे आहे. म्हणून सर्वसामान्य माणसाला/नागरिकाला या कर्तव्यांची समज आणि जाणीव व पालन आवश्यक आहे.

दुर्दैवाने या देशातील नागरिकांना घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांची टोकदार जाणीव आहे, असे लक्षात येते. अधिकारांविषयी या देशातील सामान्य नागरिकांना विशेष शिक्षण देण्यात आले. मात्र कर्तव्यांविषयी फारसे अवगत करण्यात आले नाही. केवळ अधिकारांची जाणीव असलेली कोणतीही व्यक्ती समाजाकडून, कुटुंबाकडून, व्यवस्थेकडून फक्त फायदा ओरबाडून घ्यायला शिकते. अधिकारांची जाणीव असलेला कुटुंबातील नाकर्ता कर्तृत्वहीन मुलगा कोणतेही योगदान न देता जसा बापाला केवळ आपला वाटा मागत संपूर्ण कुटुंबाची हानी करतो तसेच केवळ घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचीच जाणीव असलेले नागरिक देखील राष्ट्रहानी करीत असतात. वास्तविक कर्तव्यांना हिंदू विचारधारा अधिकारांपेक्षा जास्त महत्त्व देते. भारतीय तत्त्वज्ञानात हा मुद्दा वारंवार आणि प्रकर्षाने दिसून येतो. पण आज भारतीय राष्ट्रजीवनात मात्र बहुतांश नागरिक केवळ अधिकारांचाच विचार आणि वापर करताना दिसतात. सुशिक्षित नागरिक अनेकदा घटनेने सांगितलेल्या कर्तव्यांविषयी बोलतात, अनेकजण निष्ठेने आपल्या राष्ट्रीय कर्तव्यांचे पालन देखील करतात. पण दुर्दैवाने अशा जागृत नागरिकांचे प्रमाण कमी आहे. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे हे आमचे घटनादत्त कर्तव्य आहे. पण सार्वत्रिक अनुभव असा आहे की बहुतेक संप, मोर्चे, बंद, आंदोलनांमध्ये आंदोलकांद्वारे सार्वजनिक मालमत्तेचेच नुकसान करण्यात येते आणि हे नुकसान होत असताना सर्वसामान्य नागरिक बघ्याचीच भूमिका घेताना दिसतो. अनेकदा अनेक राष्ट्रीय मालमत्ता कळत न कळत विद्रूप केल्या जातात आणि याला आम्ही कोणत्याही प्रकारे अटकाव करीत नाही. राष्ट्रगीत आणि राष्ट्रध्वजाचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे. परंतु राष्ट्रगीत गायले जात असताना एक विशिष्ट समाज उठून उभे राहण्याचे साधे सौजन्य पाळत नाही. इतर कोणा नागरिकाने आग्रह केला तर तिथे मारामारी करण्यासही ही मंडळी तयार असतात आणि बहुसंख्य लोक बघ्याची भूमिका घेणे पसंत करतात. स्वातंत्र्य आणि प्रजासत्ताक दिनी हौसेने घेतलेले राष्ट्रध्वज कोणताही विचार न करता जमिनीवर टाकून/फेकून दिले जातात. देश आणि समाजाची दीर्घकाळात मोठी हानी होईल अशीच अनेक बाबतीत आमची वागणूक असते. आज २०२५ च्या ज्या वक्फ सुधारणा विधेयकाचा विचार देशाचे सर्वोच्च न्यायालय अग्रक्रमाने करताना दिसते आहे. मात्र २०१३ मध्ये संसदेत पारित झालेल्या वक्फ सुधारणा विधेयकावर कोणताही विचार करण्यास देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने नकार देत खालच्या कोर्टात जायला सांगितले होते. नागरिक कर्तव्य पालनाचा वा जनमताचा रेटा आज आहे, तसा तेव्हाही असता तर सर्वोच्च न्यायालयाने २०१३ च्या वक्फ बोर्ड सुधारणांवर निदान सुनावणी घेतली असती. पण हे न घडल्याने आज वक्फ बोर्ड आणि मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचा भस्मासुर निर्माण झाला आहे. नागरिकच आपल्या जागृत कर्तव्य पालनातून लोकशाहीच्या चारही स्तंभांवर दबाव ठेवूनच सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक हित साधू शकतात. पण आमच्या राष्ट्रीय कर्तव्यांविषयी सामान्य नागरिकांच्या मनात एक प्रकारची अनास्था आज दिसून येते. एका मोठ्या समाजघटकाच्या मनात नागरिक कर्तव्यांच्या बाबतीत इतकी प्रचंड अनास्था आहे की या देशातील कोट्यवधी लोक लोकशाही व्यवस्थेत महत्त्वपूर्ण असलेले मतदान करण्याचे कर्तव्य देखील बजावण्यास नकार देताना दिसतात. या अनास्थेला अनेक कारणे आहेत. एकतर घटनेत दिलेली कर्तव्यांची सूची परिपूर्ण नाही. यातून काही महत्त्वपूर्ण कर्तव्ये सुटून गेलेली आहेत. उदाहरणार्थ, मतदान करण्याचे कर्तव्य किंवा जे काही कर व्यक्ती वा आस्थापनेवर लावले जातात ते वेळेवर योग्य गणन करून भरणे अशी काही नागरिक कर्तव्ये या यादीत आलेली नाहीत. दुसरे म्हणजे कर्तव्य पालनात कसूर केल्यास न्यायालयीन वा दंडात्मक कारवाईची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे जरी कर्तव्य सूची घटनेत दिली असली तरी ती परिणामकारक होत नाही. घटनाकारांना कदाचित नागरिक कर्तव्यपालनात कसूर करणार नाहीत असे वाटले असावे. या सूचीत दिलेली कर्तव्ये नक्की काय आहेत याबाबत स्पष्टता नसल्याने अनेकदा नागरिकांचा गोंधळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उदाहरणार्थ समग्र सांस्कृतिक परंपरांचा आदर म्हणजे नक्की काय आणि कोणत्या परंपरा याविषयी स्पष्टपणे निर्देश दिलेला नाही. या घटनादत्त कर्तव्यांचे शिक्षण, प्रचार आणि काही प्रमाणात प्रशिक्षण देण्यात सर्वच घटनात्मक संस्था कमी पडल्याचे जाणवते. या सगळ्यांचा अपरिहार्य परिणाम म्हणजे देशातील नागरिकांमधे सगळ्याच कर्तव्य पालनाप्रती एक अनास्था निर्माण झालेली दिसते.



नागरिक कर्तव्य हे भारतीय संविधानाचे मूलभूत सिद्धांत मानायला हवे, असा स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आय.आय.एम. स्टुडंट्स विरुद्ध आय.आय.एम. (२०११) या खटल्यात दिलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या मते मूलभूत नागरिक कर्तव्य ही मूलभूत अधिकारांइतकीच महत्त्वपूर्ण आहेत. मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्य दोन्ही ठिकाणी घटनेत मूलभूत हा शब्द वापरण्यात आलेला आहे आणि म्हणूनच ते समान महत्त्वाचे ठरतात. नागरिक कर्तव्यांचे पालन हे न्याय, स्वातंत्र्य, बंधुभाव व समानता या सिद्धांतावर आधारित एक लोकशाहीवादी समाज निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. तसेच नागरिक कर्तव्य पालन शासन व्यवस्थेत लोकसहभाग अधोरेखित करीत सर्वसमावेशक विकासासाठी शाश्वत दिशानिर्देश करतात. कर्तव्य पालन हे भारतीय व्यक्ती व समाज चारित्र्याचे अभिन्न अंग आहे. भारतीय समाजात कर्तव्य पालनाचा आदर्श प्रभू रामचंद्र आहेत. त्यामुळे भारतीय समाजात कर्तव्यांना अधिकारांपेक्षा नेहमीच वरचे स्थान दिलेले आढळते. कर्तव्य पालनाचा आग्रह धरणारा समाज नेहमीच अधिक संघटित, सशक्त, समानता आणि न्यायावर आधारित असतो. रा. स्व. संघाचे हिंदू संघटन आणि राष्ट्रीय चारित्र्य निर्माणाचे ध्येय देखील हेच आहे.

आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे/९४२२८०४४३०

# ध्यास स्वतंत्र बलुचिस्तानचा!




१९४८ पर्यंत बलुचिस्तान स्वतंत्र होता. मात्र पाकिस्तानने या देशावर कब्जा करून पाकिस्तानमध्ये विलीन केले होते. तेव्हापासून बलुचिस्तान हा पाकिस्तानमधील सर्वांत मोठा प्रांत आहे. बलुचिस्तान प्रांताने पाकिस्तानचा ४८ टक्के भूभाग व्यापला आहे. क्वेटा ही बलुचिस्तानची राजधानी आहे. बलुचिस्तानची लोकसंख्या १ कोटी तर क्षेत्रफळ ३ लक्ष ४७ हजार चौकिमी आहे. पंजाब प्रांताची लोकसंख्या १२ कोटी ७० लक्ष तर क्षेत्रफळ २ लक्ष चौकिमी आहे. सिंधची लोकसंख्या ५.५ कोटी तर क्षेत्रफळ १ लक्ष ४१ हजार चौकिमी आहे. खैबर पख्तुन्ख्वाची लोकसंख्या ३ कोटी ५५ लक्ष तर क्षेत्रफळ १ लक्ष चौकिमी आहे. फेडरली ॲडमिनिस्टर्ड ट्रायबल एरियाची (एफएटीए) लोकसंख्या ५० लक्ष तर क्षेत्रफळ २७ हजार किमी. आहे.

याशिवाय पाकिस्तानने १९४८ पासून बळकावलेले भूभाग असे आहेत. गिलगिट व बाल्टिस्तान याची लोकसंख्या १८ लक्ष तर क्षेत्रफळ ७३ हजार चौकिमी आहे. पाकव्याप्त काश्मीरची लोकसंख्या ४० लक्ष ४५ हजार तर क्षेत्रफळ १३ हजार चौकिमी आहे.

बळकावलेला भूभाग वगळला तर उरलेले सर्व भूभाग मिळून आजचा लांबुळका व रुंदी कमी असलेला पाकिस्तान तयार होतो. मीर यार बलोच यांनी बलुचिस्तान देश हा स्वतंत्र झाल्याची घोषणा नुकतीच म्हणजे १० मे २०२५ रोजी केली आहे. अशाप्रकारे बलुचिस्तान हा एक देश नव्याने उदयाला येऊ पाहतो आहे. पण स्वतंत्र बलुचिस्तानच्या निर्मितीच्या मार्गात आंतरराष्ट्रीय मान्यतेसारख्या अनेक अडचणी आहेत. बलुच लोक आजूबाजूच्या देशातही विखुरलेले आहेत. जसे की, इराणमधील सिस्तान प्रांतात बलुच लोक बहुसंख्येत आढळतात. ऐतिहासिक दृष्ट्या हा प्रांत बलुचिस्तानचा भाग आहे. आजही या प्रांतातील बलुचांचे बलुचिस्तानमधील बलुचांशी संबंध आहेत. हा संपूर्ण भाग अविकसित आणि दरिद्री आहे. अफगाणिस्तानमध्येही निमरोज प्रांतात बलुच लोक बहुसंख्येने राहत आहेत. हेलमंद, फरयाब, तखर, हेरात, कंधार, बदख्शा आदी प्रांतातही बलुचांची संख्या भरपूर आहे. हे सर्व भाग मिळून विशाल बलुचिस्तान निर्माण व्हावा अशी आकांक्षा बलुच नेते बाळगून आहेत.

बलुचिस्तानातील मराठे म्हणजे १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युद्धानंतर कैद झालेल्या मराठा सैनिकांचे वंशज आहेत. बलुचिस्तानमध्ये ते युद्धकैदी म्हणून आले होते. त्यांनी तिथे आपली संस्कृती व भाषा जतन केली आहे. हे मराठे बुग्ती जमातीत मिसळून गेले म्हणून त्यांना बुग्ती मराठे असेही म्हणतात. या मराठ्यांच्या एकूण २० जाती तिथे आहेत. त्या भारतातील मराठ्यांच्या जातींशी साम्य राखून आहेत. एका जातीचे नाव तर पेशवाई आहे. आपण पेशव्यांचे वंशज आहोत, असे ते मानतात. १७६१ मध्ये झालेल्या तिसऱ्या पानिपत युद्धानंतर, मराठा सैनिकांना मोठ्या संख्येत अहमदशाह अब्दालीच्या सैन्याकडून कैद करण्यात आले होते. या कैद्यांना बलुचिस्तानमध्ये नेण्यात आले आणि तिथे ते अनेक वर्षे राहत आहेत. या मराठ्यांच्या वंशजांना रॉड किंवा रोअर मराठा म्हणूनही ओळखले जाते. बलुचिस्तानात मराठा कौमी इत्तेहाद नावाची मराठा संघटना आहे. बलुचिस्तानमधील हा मराठा समुदाय, आजही भारतासोबत राजकीय संबंध ठेवून आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव सुरू झाल्याचा मुहूर्त साधत बलुचिस्तानच्या स्वातंत्र्ययोद्ध्यांनी स्वातंत्र्याची घोषणा केली. हा बलुच जनतेने घेतलेला राष्ट्रीय निर्णय (नॅशनल व्हर्डिक्ट) आहे, असे ते म्हणाले. बलुच नेते मीर यार बलुच यांनी रिपब्लिक ऑफ बलुचिस्तानच्या निर्मितीची घोषणा करीत हा नवीन देश पाकिस्तानपासून फारकत घेत असल्याचे जाहीर केले. एवढेच नव्हे तर बलुच संघटनेने दिल्लीत स्वतंत्र उच्चायुक्तालय सुरू करण्याची मागणी केली आहे. जागतिक पटलावर भारतासह अन्य देशांनी आपल्याला साथ द्यावी यासाठी ते प्रयत्नशील आहेत. पाकिस्तान बलुचांचा वंशविच्छेद करीत आहे, पाकिस्तान बलुच लोकांना युद्धबंदी मानते, त्यांना बलुच संस्कृतीच नष्ट करायची आहे, असा गंभीर आरोप बलुच नेते मीर यार बलुच यांनी पाकिस्तानवर केला आहे.

मीर यार बलोच हे एक लेखक तर आहेतच तसेच ते स्वतंत्र बलुचिस्तानसाठी लढणाऱ्या बलुच लिबरेशन आर्मीचे नेतृत्वही करीत आहेत. संयुक्त राष्ट्रांनी त्यांची शांती सेना बलुचिस्तानमध्ये पाठवावी आणि पाकिस्तानच्या सैन्याला त्यांच्या नवीन सीमेच्या आतच राहण्यास सांगावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. वरवर पाहता हे सर्व साध्य होणे कठीण दिसते. पण जिद्दी बलुच समाजाचा स्वातंत्र्यासाठीच्या प्रभावी लढ्याचा इतिहास खूप जुना आहे, हेही विसरता येणार नाही. बलुच लोक पराक्रमी आणि लढवय्ये मानले जातात. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानच्या सैन्यावर हल्ला केला आणि त्यांना माघार घेण्यास आणि क्वेटा सोडण्यास भाग पाडले, हेही नजरेआड करता यायचे नाही. या पूर्वी २०२५ च्या मार्च महिन्यात नैऋत्य पाकिस्तानमध्ये तर बलुच बंडखोरांनी एका ट्रेनचेच अपहरण करून प्रवाशांना सुमारे ३६ तास ओलीस ठेवले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या १९४७ च्या कायद्यानुसार भारताची फाळणी करण्यात आली भारत आणि पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश निर्माण करण्यात आले. या दोन देशांवरील ब्रिटिश सत्ता पूर्णपणे नष्ट झाली. बलुच लोकांची इच्छा नसतानाही बलुचबहुल प्रदेश पाकिस्तानमध्ये यावेळी सामील करून घेण्यात आला. तेव्हापासून स्वतंत्र होण्यासाठी बलुच लोकांचा पाकिस्तान शासनाशी सतत संघर्ष सुरू आहे.

धर्म एक असेल तर तेवढ्या भरवशावर एक राष्ट्र उभे होत नाही/ करता येत नाही. युरोप हे जुने उदाहरण आहे. युरोपमध्ये कितीतरी छोटी राष्ट्रे आहेत. ती सगळी बहुतांशी ख्रिश्चन राष्ट्रे आहेत. तर पाकिस्तान हे त्यातल्या त्यात नवीन उदाहरण आहे. मुस्लिम धर्मी सिंधी, पंजाबी, बलुची, पख्तून व बंगाली (तरी बरे की हे सर्व बहुतांशी सुन्नी आहेत) यांचे एक राष्ट्र झाले नाही/ होणार नाही. बांगला देश निर्माण झाला यामागचे हेही एक कारण आहे. उद्या सिंध व बलुचिस्तान आणि पश्तूनबहुल वेगळे झाले तर त्यामागचेही हेच एक प्रमुख कारण असेल. मग उरेल केवळ आजचा वरचढ व उद्दाम पंजाब!

ग्वादार बंदर बांधण्यासाठी चीन आपले वित्तबळ, मनुष्यबळ व तंत्रबळ देऊ करतो आहे. बलुचिस्तानातून या बंदराच्या साह्याने चीनला अरबी समुद्रात प्रवेश हवा आहे. शिवाय बलुचिस्तानमध्ये नैसर्गिक वायू, खनिजे, कोळसा, गंधक, क्रोमियम, लोह आणि हिरे यांचे साठे सापडले आहेत. म्हणून चीनला जसा बलुचिस्तानमधून जाणारा चीन-पाकिस्तान आर्थिक महामार्ग हवा आहे पण म्हणूनच बलुचिस्तानला तो नको आहे.

ऑपरेशन सिंदूर नंतर परिस्थिती खूप बदलली आहे. भारताचे पारडे चार बाबतीत वरचढ झाले आहे. पाकव्याप्त काश्मीर, सिंधू जलवाटप करार, बलुचिस्तान आणि पाकिस्तानचे अण्वस्त्र साठवण केंद्र. पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारतानुकूल वारे वेगाने वाहू लागले आहेत. उद्या पाकव्याप्त काश्मीर भारतात आले तर भारताचा अफगाणिस्तान मार्गे बलुचिस्तानशी संपर्क प्रस्थापित होऊ शकेल. आज भारत आणि बलुचिस्तानच्या सीमा एकमेकींना स्पर्श करीत नाहीत. ही अडचण दूर झाली तर भारत बलुचिस्तानसाठी खूप काही करू शकेल. पाकिस्तानला रुंदी/खोली नाही. तो लांबुळका आहे. बलुचिस्तान वेगळा झाला तर पाकिस्तानचा नकाशा एखाद्या अस्थिपंजर व्यक्तीसारखा दिसू लागेल. युद्धात गरज पडल्यास मागे सरकायला पुरेशी भूमी असावी लागते. हा मुद्दा दुसऱ्या महायुद्धात रशियाला जर्मनीबरोबर लढताना कामी आला होता. उद्या सिंधूचे पाणी पाकिस्तानला आजच्या सारखे मिळाले नाही तर पाकिस्तानची पंचाईत होणार आहे. पाकिस्तान अण्वस्त्र हल्ल्याची धमकी भारताला देत असतो. या युद्धात ज्या ठिकाणी पाकिस्तानने ही अण्वस्त्रे साठवून ठेवली आहेत त्या बोगद्याच्या दोन्ही तोंडाशी भारताने बॉम्ब हल्ले करून मोठाली भगदाडे पाडून ती त्याच बोगद्यात बंदिस्त केली आहेत, अशा वार्ता पाकिस्तानातूनच बाहेर आल्या आहेत. गलितगात्र पाकिस्तानच्या विभाजनाची उलटी गिनती (काऊंट डाऊन) सुरू झाली आहे, असे म्हणतात ते उगीच नाही.

## विश्लेषण

**जया भारती**



# निकाहच्या माध्यमातून वैचारिक, कट्टरपंथी घुसखोरी

## राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका

'ऑपरेशन सिंदूर' नंतर आपण पाहिले की अशी भारतात अशी जोडपी आढळून आली ज्यांचे धागदोरे पाकिस्तानशी जुळलेले आहेत. हा साधासुधा विषय नाही तर राष्ट्रीय सुरक्षेतील त्रुटींशी संबंधित एक मोठा मुद्दा आहे, यावर गंभीर विचार आणि धोरणात्मक नियमन आवश्यक आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप हिंदूंच्या निर्घृण हत्येने संपूर्ण देशाला हादरवून सोडले. परंतु या दुःखद घटनेनंतर, आणखी एक गंभीर धोका हळूहळू पुढे आला आहे. हा धोका केवळ हिंसाचारपुरताच मर्यादित नाही तर प्रदीर्घ काळपासून सुरू असलेल्या पाकिस्तानी नागरिकांच्या घुसखोरीशी संबंधित आहे. या बेकायदेशीर घुसखोरीमुळे राष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका तर निर्माण झाला आहे. भारत सरकारने सुरक्षेच्या उपाय म्हणून देशात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या देशात परत जाण्यास सांगितले तेव्हा हे सगळे उघड झाले. या निर्णयानंतर जे दृष्य समोर आले त्यामुळे देशाला धक्का बसला. मोठ्या संख्येने भारतीय मुस्लिम महिला त्यांच्या पाकिस्तानी पतींकडे परत जाऊ इच्छित होत्या. परंतु त्यांना ते शक्य झाले नाही. कारण त्यांच्याकडे भारतीय पासपोर्ट होते किंवा त्यांची मुले भारतात जन्माला आली होती आणि ते भारतीय नागरिक होते.

जेव्हा देश आपल्या मृत देशबांधवांविषयी शोक व्यक्त करत होता तेव्हा काही मुस्लिम समुदायांकडून मेणबत्ती मार्च आणि एकतेची प्रतीकात्मक रॅली काढली जात होती. परंतु या सर्वांमागे आणखी एक चिंताजनक सत्य समोर आले आहे. मोठ्या संख्येने भारतीय मुस्लिम महिलांचे विवाह पाकिस्तानी पुरुषांशी झाले आहेत आणि अनेक प्रकरणांमध्ये पाकिस्तानी महिला भारतीय मुस्लिम पुरुषांशी विवाह करून भारतात राहत आहेत. ही कुटुंबे केवळ भारतातच राहत नाहीत, तर येथे मुले जन्माला घालत आहेत आणि भारतीय नागरिकांच्या सर्व अधिकारांचा, योजनांचा फायदा घेत आहेत.

### भारतीय भूमीवर शत्रू राष्ट्राची संतती?

अहवालांनुसार, अशा विवाहांमधून ८ ते १५ मुले जन्माला येत आहेत. भारतात जन्माला आल्यामुळे या सर्वांना कायदेशीर रीत्या भारतीय नागरिकत्व मिळत आहे. म्हणजेच, पाकिस्तानी आई किंवा वडिलांची मुले सहजपणे भारतीय नागरिकत्व मिळवत आहेत. तर त्यांचे पालक अशा देशाचे नागरिक आहेत जे गजवा-ए-हिंदच्या विचारसरणीचे अनुसरण करून अनेक दशकांपासून भारताविरुद्ध दहशतवादी युद्ध करीत आहेत. काही पाकिस्तानी पुरुष भारतातील मुस्लिम महिलांशी निकाह करीत आहेत आणि 'पीआर' (पर्मनंट रेसिडन्सी) अर्थात कायमस्वरूपी निवासस्थान घेऊन येथेच स्थायिक होत आहेत. ते येथे कुटुंबे वाढवत आहेत, भारतात जन्मलेल्या आपल्या मुलांच्या नावावर मालमत्ता खरेदी करत आहेत आणि भारतीय कायद्यातील त्रुटींचा उघडपणे फायदा घेत आहेत. हे केवळ निकाह नाहीत तर पद्धतशीर वैचारिक, कट्टरपंथी आणि लोकसंख्या घुसखोरीचा भाग आहेत. या काही वैयक्तिक प्रेमकथा नाहीत. हा एक पॅटर्न आहे जो कुठलेही शस्त्रे न वापरता भारताची लोकसंख्याशास्त्रीय संरचना आणि सुरक्षा व्यवस्था बदलण्याचा एक मूक प्रयत्न आहे.

### निकाह की भारताच्या सुरक्षेशी तडजोड!

या मुलांच्या निष्ठा कुठल्या देशावर असतील. ज्यांचे वडील शत्रू देशाचे आहेत, त्यांच्यावर अस्सल भारतीय मूल्याचे संस्कार कसे होतील. ही मुले भारतीय संस्कारात वाढतील की पाकिस्तानच्या विचारसरणीचा त्यांच्यावर परिणाम होईल? जेव्हा ही मुले मोठी होतील आणि मतदान करतील, सर्व सरकारी सुविधा घेतील किंवा प्रचार-प्रसारात सामील होतील तेव्हा ती भारतासाठी एक नाजूक, गंभीर परिस्थिती नसेल काय?

### शत्रुसंपत्ती कायद्याच्या गंभीर मर्यादा

पाकिस्तानसारख्या शत्रू राष्ट्रातील नागरिकांना भारतातील मालमत्ता प्राप्त होऊ नये या उद्देशाने भारताने 'शत्रू मालमत्ता कायदा, १९६८' संसदेत पारित केला. परंतु आजच्या संदर्भात, हा कायदा अपूर्ण असल्याचे सिद्ध होत आहे. हा कायदा केवळ शत्रू देशाच्या नागरिकांना मालमत्तेच्या अधिकारांपासून वंचित ठेवतो. परंतु शत्रू देशाचे नागरिक आणि भारतीय नागरिकांच्या विवाहातून भारतात जन्मलेल्या मुलांविषयी मौन बाळगतो. म्हणजेच, कायदेशीर रीत्या आम्ही एक बॅकडोअर अर्थात मागील बाजूने दरवाजा उघडला आहे, जेणेकरून शत्रू देश भारताच्या लोकसंख्येमध्ये आणि मुख्य प्रवाहात घुसखोरी करू शकेल.

### हा भारताच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न

जेव्हा भारतीय महिला पाकिस्तानी पुरुषांशी निकाह करतात आणि भारतात ८-१० किंवा त्याहून अधिक मुलांना जन्म देतात- ही केवळ वैयक्तिक पसंत राहू शकत नाही. हे एक गंभीर राष्ट्रीय संकट बनते.

**१. राष्ट्रीय सुरक्षेवर परिणाम** : अशा मुलांची मानसिकता, शिक्षण आणि विचारसरणीवर निश्चितच पाकिस्तानचा प्रभाव पडू शकतो. हीच मुले मोठे होऊन डिजिटल जिहाद, आयडिओलॉजिकल अ‍ॅण्ड पोलिटिकल सबव्हर्जन (राजकीय सैद्धांतिक क्षय) आणि वैचारिक युद्धाच्या माध्यमातून भारताविरुद्ध काम करू शकतात.

**२. व्होट बँकचे राजकारण** : असे नागरिक भारतात मतदान करून देशाच्या राजकारणाची दिशाच बदलू शकतात. ही परिस्थिती सीमा क्षेत्र आणि संवेदनशील राज्यांमध्ये अत्यंत धोकादायक सिद्ध होऊ शकते.

**३. आर्थिक शोषण**: या कुटुंबांना भारताचे विनामूल्य शिक्षण, आरोग्य, रेशन, गृहनिर्माण योजनांचा फायदा मिळतो. आज भारतातील शत्रू देशातील नागरिकांच्या मुलांचे पालनपोषण भारत सरकारच्या योजनांद्वारे आणि भारतीय करदात्यांच्या संपत्तीद्वारे होत आहे. हा केवळ आर्थिक अन्यायच नाही तर राष्ट्रीय सुरक्षेची ती उघडउघड थट्टा आहे. म्हणूनच, जर याला भारताच्या लोकांशी केलेला विश्वासघात आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

### आता गरज कठोर कायदेशीर बदलांची

**१. नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती** : जर पालकांपैकी कोणीही एक शत्रू राष्ट्राचे (जसे की पाकिस्तान किंवा चीन) असेल तर अशा मुलांना भारतात जन्म घेतल्यावरही नागरिकत्व देऊ नये. हे देशाच्या सुरक्षिततेशी तडजोड करण्यासारखे असेल.

**२. मागील विवाह आणि मुलांचा आढावा** : केंद्र सरकारने एका राष्ट्रीय टास्क फोर्सची निर्मिती करून सर्व भारत-पाक नागरिक विवाह आणि त्यांच्या मुलांचे कायदेशीर मूल्यांकन केले पाहिजे. भारताचे नागरिकत्व सोडून देण्याच्या अटीवरच अशा विवाहास परवानगी दिली जावी.

**३ जोडीदाराच्या व्हिसावर बंदी स्पाऊस व्हिसा (दीर्घकालीन)**: पाकिस्तानसारख्या शत्रू देशांकडून मिळणाऱ्या सर्व 'रिलेशन व्हिसा' (स्पाऊस व्हिसा लाँग-टर्म) वर ताबडतोब बंदी घातली पाहिजे आणि भारतात आधीच अस्तित्वात असलेल्या लोकांची राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून चौकशी केली पाहिजे.

### 'वैवाहिक निष्ठे' ची अट अनिवार्य केली पाहिजे

जर एखाद्या भारतीय नागरिकाने शत्रू देशातील नागरिकाशी विवाह केला तर त्याचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात आले पाहिजे. ही वैयक्तिक बाब नाही तर भारताच्या सार्वभौमत्वाशी थेट संघर्ष आहे. अशा व्यक्तींना कोणतीही नोकरी किंवा लाभाचे अथवा अधिकाराचे पद, कोणत्याही प्रकारची निवडणूक, सर्व प्रकारच्या सरकारी सुविधा, अनुदान आणि आरक्षण या सर्व गोष्टींमधून आजीवन वंचित केले पाहिजे.

### तिसऱ्या देशाचे नागरिक बनून भारतात घुसखोरी

जर एखादी व्यक्ती शत्रू देशाची नागरिक असेल, जरी तिला यूके, कॅनडा किंवा आखाती देशांसारख्या तिसऱ्या देशाचे नागरिकत्व मिळाले असेल, तर तिच्याशी विवाह केल्यावर संबंधित व्यक्तीचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात आले पाहिजे.

पाकिस्तानी नागरिक आधी एखाद्या पाश्चात्त्य देशाचे नागरिकत्व प्राप्त करतात आणि नंतर भारतात विवाहाच्या माध्यमातून स्थायी अर्थात कायमस्वरूपी निवासस्थान किंवा नागरिकत्व मिळविण्याच्या दिशेने वाटचाल करतात. हा आता वैयक्तिक जीवनाचा भाग न राहता एक पूर्व -नियोजित धोरणाचा भाग बनत आहे. ही केवळ पासपोर्ट किंवा देश बदलण्याची प्रक्रिया नाही तर विचारधारा, निष्ठा आणि राष्ट्रीय सुरक्षेविषयी वचनबद्धतेचा विषय आहे. अशा व्यक्तींची भारतातील उपस्थिती, मग ते अन्य कुठल्याही देशाचे नागरिक का असेना, भारताची अंतर्गत सुरक्षा, सांस्कृतिक अखंडता आणि सामाजिक समरसतेसाठी दीर्घकालीन धोका उत्पन्न करू शकते.

### कायदेशीर त्रुटींमुळे सहज घुसखोरी

- पाकिस्तानी पुरुष, जे एकतर पाकिस्तानमध्ये राहतात किंवा भारतात दीर्घकालीन व्हिसावर आहेत. ते भारतीय मुस्लिम महिलांशी निकाह करतात आणि मग बनावट कागदपत्रे किंवा सरकारी यंत्रणेतील भ्रष्ट लोकांच्या मदतीने भारतातच स्थायिक होतात.
- बऱ्याच भारतीय मुस्लिम स्त्रिया भारतीय नागरिक बनून राहतात. परंतु त्यांचा निकाह पाकिस्तानी पुरुषांशी झाला आहे.
- या भारतीय मुस्लिम महिलांच्या त्यांच्या मुलांना, ते भारतात जन्मल्यामुळे भारतीय नागरिकत्व मिळते. याचा परिणाम म्हणून, अशी कुटुंबे भारतात पूर्णपणे स्थापित होतात आणि येणाऱ्या पिढ्या मतदान करण्यापासून सरकारी लाभ मिळजवण्यापर्यंत सर्व काही साध्य करतात आणि दुसरीकडे त्यांची मुळे शत्रू देशाशी जोडली जातात.

### हा पूर्वग्रह नाही, स्वसंरक्षण

काही लोक याला मानवाधिकारांचा मुद्दा म्हणून विरोध करू शकतात. काँग्रेसच्या नेतृत्वात भारतातील विरोधी पक्ष सातत्याने पाकिस्तानच्या समर्थनार्थ उभे असल्याचे दिसून येते तेव्हा हे पक्ष अशा कोणत्याही राष्ट्रीय हिताचे संरक्षण करणाऱ्या कायद्याला विरोध करतील हे स्वाभाविक आहे. दुसरीकडे भारतातील मुस्लिम समाजाचा एक वर्ग- जो पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ रॅली-मोर्चे काढतो, परंतु हा वर्ग काश्मिरी हिंदू किंवा बांगलादेशी हिंदूंच्या हत्याकांडावर तोंडातून ब्र देखील काढत नाही. ज्यांनी पाकिस्तानचे झेंडे जमिनीवरून उचलून हाती घेऊन फडकवले अशा लोकांसाठी तर अशा कठोर कायद्यांची आवश्यकता आहे. परंतु आपण हे समजून घेतले पाहिजे की हा एक धार्मिक किंवा वैचारिक पूर्वग्रह नाही तर स्वसंरक्षणाचा नैसर्गिक अधिकार आहे. जेव्हा शत्रू देशातून वैवाहिक घुसखोरीद्वारे भारताची लोकसंख्या संरचना आणि सुरक्षा यंत्रणा कमकुवत करण्याची रणनीती स्वीकारली जात असेल तर अशा परिस्थितीत कायद्याने स्पष्ट आणि कठोर नियंत्रण अनिवार्य होऊन जाते. शत्रू देशातील नागरिक येथे येऊन विवाह करून आपली मुळे मजबूत करत असतील तर ती मानवता नाही तर निव्वळ मूर्खपणा आहे. प्रत्येक सार्वभौम देशाला आपल्या सांस्कृतिक, लोकसंख्याशास्त्रीय आणि सुरक्षा हितांचे संरक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

जर ही वैचारिक आणि लोकसंख्याशास्त्रीय घुसखोरीवर तातडीने आणि कठोर नियंत्रण लादले नाही तर भारतातील इतर भाग देखील पश्चिम बंगालसारख्या त्रासदायक, संकटग्रस्त भागात परिवर्तित होऊ शकतात - जेथे मूळ निवासी, विशेषकरून हिंदू समुदाय, इस्लामिक जिहादमुळे स्वतःच्याच भूमीवर असुरक्षित आणि दुर्लक्षित, उपेक्षित झाले आहेत. हे केवळ विवाहच नाही तर पाकिस्तान समर्थक विचार आणि कट्टर वैचारिक विस्तारवादाची नियोजित योजना आहे. भारतात जन्मलेल्या मुलांना नागरिकत्व देण्याच्या कायदेशीर त्रुटींचा गैरवापर करून अशी जनसंख्या निर्माण केली जात आहे, ज्यांची भारतावर निष्ठा नाही तर शत्रूराष्ट्र आणि विचारसरणीवर आहे. आज अशीच स्थिती ब्रिटन, फ्रान्स आणि स्वीडनसारख्या देशांमध्ये निर्माण झाली आहे. या देशातील मूळ नागरिक आता शरिया समर्थक झुंड आणि इस्लामिक फुटीरतावादाने ग्रस्त आहेत. या धोक्यांपासून भारताला वाचवण्यासाठी आता केवळ एका नेतृत्वावर देशाचा विश्वास आह आणि ते म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी. त्यांचे साहसी, राष्ट्रवादी आणि निर्णायक नेतृत्वच या आव्हानाचा समर्थपणे सामना करू शकते. आज देशवासीयांचे डोळे आशा व अपेक्षांसह पंतप्रधान मोदींकडे खिळले आहेत. नागरिकत्व कायद्यात सुयोग्य दुरुस्ती करून पंतप्रधान भारताची सांस्कृतिक ओळख, अस्मिता जपतील तसेच देशाची सुरक्षा आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करतील अशी देशवासीयांना आशा आहे. आज युद्ध केवळ शस्त्रास्त्रांनी लढले जात नसून माहिती-तंत्रज्ञान युद्ध तसेच वैचारिक, संसाधनांसाठी छद्म (स्यूडो) युद्धे देखील लढली जात आहेत. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत भारताला अर्थात देशवासीयांना आता जागे व्हावेच लागेल आणि देशाला पोखरून काढणारी ही बिळे पक्की बुजवावीच लागतील. कोणत्याही परिस्थितीत देशाच्या सुरक्षेवर तडजोड मान्य नाही. जर आताच सावधगिरी बाळगली नाही तर शत्रू देश आमची डेमोग्राफी (लोकसंख्याशास्त्र संरचना) बदलण्यास व आपली विचारधारा फैलावण्यास यशस्वी होऊ शकतो. तसेच यामुळे आमच्या लोकशाहीला देखील धोका उत्पन्न होऊ शकतो. त्यामुळे जागे वा सावधान हे शब्द कायमचे लक्षात ठेवा.

*(पांचजन्यवरून साभार)*

## इतिहास

# पराक्रमी शिलाहार घराणे

भारताला सामर्थ्यशाली, समृद्ध करण्यात ज्या राजघराण्यांनी किंवा राजवंशांनी महत्त्वाची भूमिका वठवली किंवा आपले अमूल्य योगदान दिले त्यात शिलाहार या मध्ययुगीन राजघराण्याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. शिलाहारांची तीन घराणी पश्चिम महाराष्ट्रात उदयास आली. एक, उत्तर कोकणात ठाणे व कुलाबा या जिल्ह्यांवर राज्य करीत होते. त्यात १,४०० गावांचा समावेश होता, अशी पारंपरिक समजूत होती. या घराण्याला उत्तर कोकणचे शिलाहार म्हणतात. त्यांची राजधानी पुरी (रायगड जिल्ह्यातील राजापुरी किंवा दंडा राजपुरी) येथे होती. अरबी समुद्रावर या घराण्याचे वर्चस्व होते. त्यातील काहींनी 'पश्चिम समुद्र चक्रवर्ती' ही पदवी धारण केली होती.

शिलाहारांचे दुसरे घराणे दक्षिण कोकणात (याला सप्तकोकण म्हणत) राज्य करीत होते. त्यांची राजधानी बलिपत्तन (सध्याचे रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण) येथे होती.

शिलाहारांचे तिसरे घराणे कोल्हापूर, सातारा, सांगली व बेळगाव या जिल्ह्यांतील काही भागातील प्रदेशावर राज्य करीत होते. त्यांची राजधानी वळिवाड येथे होती. हे कोल्हापूच्या नैर्ऋत्येस सु. ४८ किमी. वर असलेले वळवडे असावे, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. त्याचे आता राधानगरीत रूपांतर झाले आहे. काही जुन्या लेखांत कोल्हापूर आणि प्रणालक (पन्हाळा किल्ला) यांचाही राजधानी म्हणून उल्लेख येतो, तर काहींच्या मते कोल्हापूरच्या पूर्वेकडील वळिवडे हे विद्यमान खेडे त्यांच्या राजशिबिराचे स्थान असण्याची शक्यता आहे.

ही तिन्ही घराणी आपणास विद्याधर जीमूतवाहनाचे वंशज म्हणवीत. या जीमूतवाहनाने एका नागाला वाचविण्याकरिता स्वतःचा देह एका शिलेवर बसून गरुडाला अर्पण केला होता म्हणून या वंशाला शिलाहार (शिलेवरील गरुडाचा आहार) असे नाव पडले, ही आख्यायिका शिलाहारांच्या लेखात सापडते.

उत्तर कोकण आणि कोल्हापूर-सातारा या जिल्ह्यांतील प्रदेशांवर राज्य करणारे शिलाहार आपले वर्णन 'तगरपुरवराधीश्वर' असे करतात. तेव्हा ते मूळचे तगरनगराहून आले होते, हे उघड आहे. हे तगर मराठवाड्याच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर होय, हे आता निश्चित झाले आहे. याचा उल्लेख महत्त्वाची बाजारपेठ म्हणून टॉलेमी याच्या ग्रंथात आणि पेरिप्लस ऑफ द एरीथ्रीअन सी या प्राचीन ग्रीक ग्रंथात येतो. शिलाहार कानडी-भाषी होते असे दिसते कारण त्यांच्या ताम्रपटात राजांनी धारण केलेली 'मलगलण्ड', 'गण्डरगण्ड', 'विल्लविडे'' यांसारखी कानडी बिरुदे आढळतात.

उत्तर कोकणच्या शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष पहिला कपर्दी (कार. सु. ८००-८२५) याने राष्ट्रकूट सम्राट तिसरा गोविंद याला उत्तर कोकणात राष्ट्रकुटांची सत्ता पसरविण्यास मदत केली असावी म्हणून गोविंदाने तो प्रदेश जिंकल्यावर येथे मांडलिक म्हणून कपर्दीची नेमणूक केली. उत्तर कोकणाला त्याच्या नावावरून 'कपर्दिद्वीप' किंवा 'कवडीद्वीप' म्हणत. हे घराणे उत्तर कोकणात सु. ८०० पासून १२६५ पर्यंत म्हणजे सु. साडेचारशे वर्षे राज्य करीत होते. तेथे यांच्या सोळा पिढ्या झाल्या.

कपर्दीनंतर तिसऱ्या पिढीतल्या वप्पुवन्न राजाच्या (कार. सु. ८८०-९१०) काळात राष्ट्रकूट सम्राट द्वितीय कृष्ण याने ठाणे जिल्ह्याचा उत्तर भाग मधुमती या सामंताच्या ताब्यात दिला. तेथे त्याच्या तीन पिढ्या राज्य करीत होत्या. त्यांची राजधानी संयान (डहाणू तालुक्यातील संजान) येथे होती. ही दोन्ही घराणी राष्ट्रकूट सम्राटांचीच मांडलिक होती. पण त्यांच्यात वारंवार खटके उडत, असे दिसते. इ. स. ९७४ मध्ये झालेल्या राष्ट्रकुटांच्या पतनानंतर शिलाहार अपराजिताने त्यांचा उच्छेद करून त्यांचा प्रदेश खालसा केला. हे घराणे शेवटपर्यंत राष्ट्रकूट सम्राटांशी एकनिष्ठ राहिले. त्यांच्या पतनानंतर अपराजिताने (कार. सु. ९७५-१०१०) उत्तरकालीन चालुक्य सम्राट तैलपापुढे मान न वाकवता आपल्या स्वातंत्र्याच्या निदर्शक अशा 'पश्चिमसमुद्राधिपति' आणि 'मांडलिकत्रिनेत्र' अशा पदव्या धारण केल्या. पुणक (पुणे), संगमेश्वर व चिपळूण जिंकून घेऊन आपल्या साम्राज्याची सीमा दक्षिण कोकणात व घाटावर नेली. त्याच्या ताम्रपटात त्याच्या राज्याच्या सीमा पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत : उत्तरेस लाट (दक्षिण व मध्य गुजरात), दक्षिणेस चंद्रपूर (गोव्यातील चांदोर), पश्चिमेस समुद्र व पूर्वेस यादव भिल्लमाच्या खानदेशातील राज्यापर्यंत. त्याने माळव्याचा परमार नृपती सिंधुराज याच्या छत्तीसगडातील स्वारीत आपला पुत्र पाठवून त्यास साहाय्य केले होते, असे पद्मगुप्ताच्या नवसाहसांकचरित काव्यावरून दिसते.



शिलाहारांचे तिसरे घराणे कोल्हापूर, सातारा, सांगली व बेळगाव या जिल्ह्यांतील काही भागातील प्रदेशावर राज्य करीत होते. त्यांची राजधानी वळिवाड येथे होती. हे कोल्हापूच्या नैर्ऋत्येस सु. ४८ किमी. वर असलेले वळवडे असावे, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. त्याचे आता राधानगरीत रूपांतर झाले आहे. काही जुन्या लेखांत कोल्हापूर आणि प्रणालक (पन्हाळा किल्ला) यांचाही राजधानी म्हणून उल्लेख येतो, तर काहींच्या मते कोल्हापूरच्या पूर्वेकडील वळिवडे हे विद्यमान खेडे त्यांच्या राजशिबिराचे स्थान असण्याची शक्यता आहे. ही तिन्ही घराणी आपणास विद्याधर जीमूतवाहनाचे वंशज म्हणवीत. या जीमूतवाहनाने एका नागाला वाचविण्याकरिता स्वतःचा देह एका शिलेवर बसून गरुडाला अर्पण केला होता म्हणून या वंशाला शिलाहार (शिलेवरील गरुडाचा आहार) असे नाव पडले, ही आख्यायिका शिलाहारांच्या लेखात सापडते.

चालुक्यांना अपराजिताचे सामर्थ्य सहन होणे शक्य नव्हते. तैलपाचा पुत्र सत्याश्रय याने त्याच्या प्रदेशावर स्वारी करून त्याला त्याच्या पुरी राजधानीत कोंडले. एक कर्नाटकचा कवी म्हणतो, 'एका बाजूस सत्याश्रयाची सेना व दुसऱ्या बाजूस समुद्र यांच्या कैचीत सापडल्यामुळे अपराजिताची अवस्था जिची दोन्ही टोके जळत आहेत, अशा काठीवरील किड्यासारखी झाली'. नंतर शिलाहारांना चालुक्यांचे मांडलिकत्व स्वीकारावे लागले पण ते परमार भोजाला सहन न होऊन त्याने उत्तर कोकणावर स्वारी करून शिलाहार अरिकेसरी ऊर्फ केशिदेव याचा पराभव केला. त्यानिमित्त त्याने इ. स. १०२० मध्ये दिलेले दोन ताम्रपट सापडले आहेत.

अपराजितानंतर त्याचे छित्तराज, नागार्जुन व मुम्मुणिराज असे तीन पुत्र एकामागून एक गादीवर आले. छित्तराजाच्या कारकिर्दीत कदंब नृपती षष्ठदेव याने कवडीद्वीप जिंकले. तसेच कोल्हापूरच्या गोंक राजानेही अपराजिताचा पराभव करून 'कोंकणाधिपति' अशी पदवी धारण केली. छित्तराजाने अंबरनाथ येथील शिवालय बांधण्यास प्रारंभ केला. ते मुम्मुणीने पूर्ण केले. तेथे त्याचा सन १०६० चा शिलालेख सापडला आहे.

मुम्मुणीच्या कारकिर्दीत शिलाहार आणि कदंब यांचा वैवाहिक संबंध जळून आला. मुम्मुणीने (कार. सु. १०४५-७०) कदंब द्वितीय षष्ठदेव याचे स्वागत करून त्याला आपली कन्या अर्पण केली. मुम्मुणीच्या नंतर गूहल्लाने उत्तर कोकणावर स्वारी केली. यात त्याला एका मुसलमान अधिपतीचे साहाय्य झालेले दिसते. त्याने देश उद्ध्वस्त करून हिंदूंचा छळ केला पण पुढे नागार्जुनाचा मुलगा अनंतदेव याने यवन आक्रमकांना हाकून लावले.

अनंतदेव (सु. १०७०-१११०) याच्या कारकिर्दीत अखेरीस कदंब दुसरा जयकेशी याने पुन्हा उत्तर कोकणावर स्वारी करून तेथील राजाला ठार केले आणि तो प्रदेश आपल्या राज्यात सामील केला. इ. स. ११२५-२६ च्या नरेंद्र येथील शिलालेखात जयकेशीचा 'कवडीद्वीपाधिपति' म्हणून उल्लेख आहे पण पहिल्या अपरादित्याने लवकरच आपल्या देशाला कदंबांच्या मगरमिठीतून सोडविले. अपरादित्याने दूरच्या काश्मिरातही तेजःकंठ यास आपला वकील नेमले. तेथे त्याने याज्ञवल्क्यस्मृतीवरील अपरादित्याच्या अपरार्कानामक टीकेचा प्रचार केला.

यानंतरचा उल्लेखनीय शिलाहार नृपती मल्लिकार्जुन (कार. सु. ११५५-७०) हा होय. याच्या कारकिर्दीत गुजरातच्या चालुक्य कुमारपालाने कोकणावर स्वारी करून मल्लिकार्जुनाला ठार मारले आणि कोकण प्रदेश आपल्या राज्यास जोडला पण दुसऱ्या अपरादित्याने (कार. सु. ११७०-९५) तो परत मिळवून 'महाराजाधिराज' व 'कोंकणचक्रवर्ती' अशा स्वातंत्र्यनिदर्शक पदव्या धारण केल्या. या वंशातील उल्लेखनीय राजा गंडरादित्य (कार. सु. ११०५-४०) हा होता. विक्रमादित्याने त्याला 'निःशंकमल्ल' अशी पदवी दिली होती. याचे अनेक ताम्रपट सापडले आहेत. त्याने इरुकुडी गावाजवळ गण्डसमुद्रनामक विशाल तलाव बांधून त्याच्या काठावर हिंदू, बौद्ध व जैन या तिन्ही धर्मांची देवळे बांधली होती. त्याचा पुत्र विजयादित्य (कार. सु. ११४०-७५) याने उत्तर कोकणचा राजा पहिला अपरादित्य याला त्याची गादी मिळवून देण्यास साहाय्य केले होते. शेवटचा शिलाहार नृपती सोमेश्वर (कार. सु. १२५५-६५) यानेही याच पदव्या घेतल्या होत्या. त्याच्या काळी देवगिरीच्या यादवांची सत्ता वृद्धिंगत होत होती. त्यांना शिलाहारांच्या या पदव्या सहन होणे शक्य नव्हते. यादव सम्राट कृष्ण याने आपला सेनापती मल्ल यास कोकणावर स्वारी करण्यास पाठविले होते. त्याने विजय मिळविला असे म्हणतात पण यादवांचा फायदा झालेला दिसत नाही. नंतर कृष्णाचा भाऊ महादेव याने पुन्हा युद्धास सुरुवात करून गजसेनेसह कोंकणावर स्वारी केली. सोमेश्वराने जमिनीवर पराभव पावल्यावर समुद्राचा आश्रय घेतला पण तेथेही महादेवाने त्याचा पाठलाग करून त्याला जलसमाधी दिली. या प्रसंगाचे शिल्प बृहन्मुंबईत बोरिवली येथे सापडले आहे. हे युद्ध सु. १२६५ मध्ये झाले असावे. यानंतर यादवांनी आपला अधिकारी अच्युत यास कोंकणावर राज्यपाल म्हणून नेमले. त्याचा इ. स. १२७२ चा लेख मिळाला आहे.

इतर प्राचीन भारतीय राजांप्रमाणे शिलाहारांनी धर्म, विद्या व कला यांना आश्रय दिला होता. दक्षिण कोकणच्या रट्टराजाने मध्य भारतातून आलेल्या मत्तमयूर पंथाच्या शैव आचार्यास ग्रामदान दिले होते. इतर शाखेच्या राजांचाही हिंदू व जैन धर्मास आश्रय होता. त्यांनी अनेक देवळे बांधली होती. त्यांतील काही अंबरनाथ, पेल्हार, कोल्हापूर व वाळकेश्वर येथे अद्यापि विद्यमान आहेत. कोल्हापूरच्या शिलाहारांनी महालक्ष्मीच्या पूजेअर्चेकरिता काही दाने दिली होती. तसेच जैन तीर्थंकरांच्या बस्तीकरिताही आणि जैन मुनींच्या योगक्षेमाकरिताही काही भूमी दिली होती. शिलाहारांचा विद्येसही आश्रय होता. शिलाहार नृपती पहिल्या अपरादित्याने याज्ञवल्क्यस्मृतीवर अपरार्का टीका लिहिली होती. तिचा दूरच्या काश्मिरातही प्रसार झाला. कोल्हापूरच्या शिलाहारांनी बांधलेल्या अनेक मंदिरांपैकी खिद्रापूर (कोप्पेश्वर व ऋषभनाथ) आणि अंबरनाथ (शिव-अम्रेश्वर) येथील मंदिरे वास्तुशिल्पदृष्ट्या प्रसिद्ध आहेत. अंबरनाथ येथील शिवमंदिर हे तारकाकृती विधानाचे असून नागरशैलीतील भूमिज उपशैलीत बांधले आहे. कोल्हापूरच्या आग्नेयीकडील खिद्रापूर गावात असलेले कोप्पेश्वर मंदिर बाराव्या शतकातील असून चालुक्य वास्तुशैलीत बांधले असून त्याचे विधान तारकाकृती आहे.

**(संदर्भ : विश्वकोश)**



# कांचीपुरमचे प्राचीन कैलाशनाथर मंदिर

भारतातील प्रत्येक राज्यात अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. ज्यात त्या त्या राज्याच्या संस्कृतीचे प्रतिबिंब उमटते आणि प्रत्येक मंदिराचेही एक आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. त्याचप्रमाणे दक्षिण भारतातील बहुतांश मंदिरे त्यांच्या खास वास्तुकलेमुळे देशातच नव्हे, तर संपूर्ण जगात प्रसिद्ध आहेत. दक्षिण भारतातील कांचीपुरम, तामिळनाडू येथील कैलाशनाथर मंदिर हे अशा वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे.

कांचीपुरम हे हिंदू धर्माच्या लोकांसाठी पवित्र स्थानांपैकी एक मानले जाते. या शहराला मंदिरांचे शहर असेही म्हणतात. कैलाशनाथर मंदिर भगवान शिवाला समर्पित आहे. हे मंदिर भगवान शिव, भगवान विष्णू, देवी, सूर्य, गणेश आणि कार्तिकेय यांच्या पूजेसाठी बांधले गेले आहे. कांचीपुरमच्या या मंदिरांमध्ये कैलाशनाथ मंदिर आहे ज्याला 'कांचीपुरमचे रत्न' म्हटले जाते. हे मंदिर सुमारे १,३०० वर्षे जुने असून येथे येणारे लोक या मंदिराच्या रचनेने मंत्रमुग्ध होतात.

> कैलाशनाथ मंदिराची रचना वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे. मंदिराच्या या वैशिष्ट्यामुळे ते इतर मंदिरांपेक्षा वेगळे ठरते. दगडांचे तुकडे एकत्र करून हे मंदिर बांधण्यात आल्याचे पुरातत्त्वशास्त्रज्ञांचे मत आहे. या मंदिराचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे मुख्य मंदिर परिसरात ५८ छोटी मंदिरे बांधण्यात आली आहेत.

कैलाशनाथ मंदिराची रचना वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे. मंदिराच्या या वैशिष्ट्यामुळे ते इतर मंदिरांपेक्षा वेगळे ठरते. दगडांचे तुकडे एकत्र करून हे मंदिर बांधण्यात आल्याचे पुरातत्त्वशास्त्रज्ञांचे मत आहे. या मंदिराचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे मुख्य मंदिर परिसरात ५८ छोटी मंदिरे बांधण्यात आली आहेत. एवढेच नव्हे तर मंदिराच्या प्रवेशद्वारावर, भिंतीवर आठ तीर्थक्षेत्रे आहेत, ज्यामध्ये दोन प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला आहेत तर सहा उजव्या बाजूला आहेत. या मंदिराच्या गर्भगृहावर द्रविड स्थापत्यशास्त्रात विमान बांधण्यात आले आहे. गर्भगृहात ग्रॅनाईटचे अप्रतिम आणि विशाल शिवलिंग स्थापित केले आहे. गर्भगृहाच्या सभोवतालच्या भिंतींवर भगवान शंकराची लिंगोद्भव, उर्ध्व तांडव मूर्ती, त्रिपुरांतक आणि हरिहर अशी रूपे कोरलेली आहेत. कांचीपुरमचे कैलाशनाथ मंदिर हे भगवान शिवाला समर्पित आहे, त्यामुळे दर सोमवारी येथे शिवाचे दर्शन घेण्यासाठी भाविक येतात. यासोबतच श्रावण आणि महाशिवरात्री महिन्यात हिंदूंची मोठी गर्दी उसळते. याशिवाय इतर अनेक उत्सवांच्या वेळी येथे भाविकांची जत्रा भरते. परंतु आध्यात्मिक दृष्टी व्यतिरिक्त कला आणि पुरातत्त्व शास्त्राची आवड असणारे लोकही या मंदिरात येतात.

## प्रासंगिक

# छत्रपती शिवराय; प्रेरणेचा अखंड झरा



हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा' या एकाच ध्यासाने संपूर्ण जीवन व्यापलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण घटना होय. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सहा प्रमुख उत्सवांमध्ये शिवरायांच्या राज्याभिषेकाचा दिवस 'हिंदू साम्राज्य दिन' म्हणून साजरा होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला यंदा ३५१ वर्षे पूर्ण झाली आहेत. ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशीला इंग्रजी तारखेप्रमाणे ६ जून १६७४ रोजी रायगडावर छत्रपतींचा राज्याभिषेक सोहळा अतिशय उत्साह व आनंदात पार पडला. हा सोहळा केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण भारतासाठी आनंद सोहळाच होता. ३५० वर्षांच्या गुलामगिरीनंतर याच दिवशी महाराष्ट्राने स्वराज्याचे सुवर्णसिंहासन पाहिले, त्यामुळे पारतंत्र्याच्या काळात सर्वत्र उत्साह संचारला, संपूर्ण हिंदुस्थानाला एक आशेचा किरण दिसला. हिंदूंच्या यशाच्या इतिहासाचे पुण्यस्मरण करणे आवश्यक आहे. अखिल हिंदुस्थानातील सर्वांना या दिवसाचे महत्त्व आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आपल्या सर्वांसाठीच परमवंदनीय आहेत. आपले संपूर्ण जीवन स्वातंत्र्यासाठी समर्पित करून त्यांनी आपल्याला जिंकायला शिकविले. शत्रू कितीही शक्तिशाली असला तरी तुमची इच्छाशक्ती प्रबळ व प्रयत्न प्रामाणिक असतील, तर अशक्य काहीच नाही. महाराजांनी हेच आपल्याला दाखवून दिले नव्हे, सप्रमाण सिद्ध केले. आज याच आत्मविश्वासाची, इच्छाशक्तीची व प्रामाणिक प्रयत्नांची गरज हिंदू समाजाला आहे. शिवरायांचे पुण्यस्मरण करून आपल्या शौर्याच्या इतिहासाचे आकलन करणे, हे हिंदुस्थानातील प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासाचे असे अद्वितीय नायक आहेत ज्यांचे केवळ वर्तमानातीलच नव्हे तर भावी अनेक पिढ्याही त्यांचे सदैव स्मरण करतील. याचे मुख्य कारण म्हणजे मध्ययुगीन काळात, जेव्हा इस्लामी आक्रमकांच्या अत्याचारांमुळे भारतीय समाज कमकुवत झाला होता, तेव्हा छत्रपती शिवरायांनी एक नवीन चेतना आणि जागृतीचा संघटित प्रयत्न करून त्याचे पुनरुज्जीवन केले.

ज्या काळात परकीय मुस्लिम आक्रमकांनी जबरदस्तीने धर्मांतर, सांस्कृतिक विनाश आणि धार्मिक स्थळे पाडून भारतीय संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला, त्या काळात शिवाजी महाराजांनी एक शक्तिशाली हिंदवी स्वराज्य स्थापन करून या विध्वंसक शक्तींचा सणसणीत पराभव केला.

आपल्या संघर्षादरम्यान, त्यांनी केवळ लष्करी दृष्टिकोनातूनच अद्वितीय रणनीती अवलंबली नाही तर भारतीय सनातन परंपरेनुसार प्रशासन, शेती, भाषा, चलन आणि धार्मिक व्यवस्थेत दूरदर्शी सुधारणा केल्या. त्यांचे राज्य केवळ एक प्रादेशिक शक्ती नव्हते, तर ते भारतीयांचा स्वाभिमान, सांस्कृतिक पुनर्जागरण आणि धर्मरक्षणाचे प्रतीक बनले. शिवरायांच्या राज्याचे उद्दिष्ट हिंदू समाजाचे रक्षण करणे हे होते. ख्यातनाम इतिहासकार व मराठा साम्राज्याचे अभ्यासक जी. एस. सरदेसाई (ज्यांना १९५७ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते) यांच्या मते, शिवरायांच्या बोलण्याचा, त्यांच्या वाणीचा जबरदस्त प्रभाव लोकांवर पडत असे. आपल्या सहकाऱ्यांना संबोधित करताना ते त्यांना समजावून सांगत असत की विदेशी मुस्लिम राजवटीने त्यांच्या देशातील जनतेवर कसे अत्याचार केले व त्यांचे धर्मांतर घडवून आणले. त्यांनी पाहिलेल्या आणि ऐकलेल्या अत्याचारांच्या घटना ते सविस्तर सांगत असत. या अन्यायाचा व अत्याचारांचा बदला घेणे हा आपला धर्म आणि कर्तव्य नाही काय? असे ते मावळ्यांना विचारत.

ते पुढे लिहितात, मुस्लिम राजवटीत संपूर्ण अंधकार होता. जनतेवरील अन्यायाची, अत्याचारांची कोणतीही चौकशी झाली नाही, न्याय मिळाला नाही. मोगल व आदिलशाहचे अधिकारी मन मानले तसा कारभार करीत होते. महिलांच्या अब्रुवर घाला, हत्या, हिंदूंचे जबरदस्तीने धर्मांतर, त्यांच्या मंदिरांचा, श्रद्धास्थानांचा विध्वंस, गायींची कत्तल - असे घृणास्पद अत्याचार मोगली, आदिलशाही व निजामशाहीत नेहमीचेच होते. निजामशाहीत तर क्रूर राज्यकर्त्यांनी जिजाबाईंचे वडील, त्यांचे बंधू आणि मुले यांची उघडपणे हत्या करण्यात आली. फलटणच्या बजाजी निंबाळकर यांना जबरदस्तीने मुसलमान करण्यात आले. अशी असंख्य उदाहरणे देता येतील. हिंदू सन्मानपूर्वक जीवन जगू शकत नव्हते. या सगळ्यामुळे शिवाजी महाराज अस्वस्थ व संतप्त होत असत. त्यांच्यात प्रबळ धर्माभिमान निर्माण झाला. स्वत्व व स्वाभिमान जागृत झाला. पातशाहीविरुद्ध बंडखोरीची तीव्र भावना त्यांच्या हृदयात निर्माण झाली. त्यांनी लगेचच स्वराज्याच्या कार्याला आरंभ केला. 'ज्यांच्या हातात शस्त्रांची शक्ती असते त्यांना कुठलेही भय नसते, कुठलीही अडचण त्यांच्या मार्गात येत नाही, असा विचार त्यांनी स्वतःशी केला.

भारतीय इतिहासकारांचे आचार्य म्हणून ओळखले जाणारे आर. सी. मजुमदार यांच्या मते, शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे कार्य सुरू केल्यानंतर अगदी लवकरच लोकांची मने जिंकली. ते नेहमीच सावध, सतर्क असायचे आणि कोणत्याही धोक्याचा आणि त्याच्या परिणामांचा सामना करण्यात ते आघाडीवर असायचे. ते त्यांच्या साथीदारांसोबत गुप्त बैठका घेत असत आणि हिंदूंवर होत असलेले अत्याचार थांबवण्यासाठी आपल्या मातृभूमीला मुस्लिम राजवटीपासून कसे मुक्त करायचे याचा अत्यंत गांभीर्याने विचार करीत असत.

सुप्रसिद्ध इतिहासकार जदुनाथ सरकार यांच्या मते, शिवाजी महाराजांचे राजकीय आदर्श असे होते की आपण आजही त्यात कोणतेही परिवर्तन न करता ते स्वीकारू शकतो. प्रजेला सुखी-समाधानी ठेवणे, स्वराज्यात शांती स्थापित करणे, सर्व जाती आणि धर्मांना समान संधी देणे, कल्याणकारी, सक्रिय आणि निष्पक्ष प्रशासकीय व्यवस्था स्थापित करणे, व्यापाराला चालना देण्यासाठी नौदल विकसित करणे आणि मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी प्रशिक्षित सैन्य निर्माण करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते.

महादेव गोविंद रानडे यांनी निदर्शनास आणून दिले आहे की छत्रपती शिवाजी त्यांच्या काळात नेपोलियनप्रमाणेच महान संघटक व नागरी संस्थांचे निर्माता होते. महाराष्ट्राचे प्रसिद्ध इतिहासकार गजानन भास्कर मेहेंदळे हे आपल्या 'शिवाजी: हिज लाईफ अँड टाईम्स' या पुस्तकात लिहितात, 'शिवाजी महाराजांनी आपल्या आयुष्याच्या अगदी सुरुवातीच्या काळातच स्वतःला एक वास्तविक शासक (दे फॅक्टो सॉवरेन)सार्वभौम म्हणून सादर केले. हे त्यांच्या शिक्क्यावरून सिद्ध होते; सर्वांत प्राचीन दस्तावेज (ज्यात हा शिक्का आहे) २८ जानेवारी १६४६ रोजीची आहेत. त्यावेळी शिवराय केवळ सोळा वर्षांचे होते.

गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या मते, 'शिवभारत'चे लेखक कविंद्र परमानंद हे शिवाजी महाराजांच्या समकालीन होते. ते त्यांच्यासोबत आग्रा येथेही गेले होते आणि शिवरायांशी त्यांचे निकटचे संबंध होते. त्यांनी 'शिवभारत' हे महाकाव्य स्वतः शिवाजी महाराजांच्या आदेशाने रचले होते. म्हणून ते शिवरायांचे अधिकृत चरित्र मानले जाऊ शकते, असे नमूद केले आहे. या महाकाव्यात, एक प्रसंग म्हणून हे विधान देखील आढळते, जे अली आदिलशहाने अफझलखानाला शिवाजी महाराजांविरुद्ध पाठवताना केले होते असे म्हटले जाते: ते विधान असे, 'मुस्लिमांचा धर्म त्या शिवाजीकडून नष्ट केला जात आहे, ज्याला आपल्या धर्माचा खूप अभिमान आहे आणि ज्याने बालपणापासूनच यवनांचा (मुसलमानांचा) अपमान केला आहे.

प्रसिद्ध इतिहासकार केदार फडके लिहितात, शिवाजी महाराज शेकडो डोंगरी किल्ले, सागरी किल्ले आणि हजारो सैनिकांचे स्वामी बनले होते. भारतीय लोक त्यांच्याकडे त्यांचे भाग्य बदलू शकणारे व्यक्तिमत्त्व म्हणून पाहू लागले होते. कवी भूषण यांनी त्यांना 'हिंदूपती पातशाह' ही पदवी बहाल केली होती. महात्मा गांधी म्हणत असत, 'ज्या प्रांतात लोकमान्य टिळकांचा जन्म झाला, ज्या प्रांताने आधुनिक युगातील वीरांना जन्म दिला, ज्या प्रांतात शिवाजी महाराजांचा जन्म झाला आणि ज्या प्रांतात रामदास स्वामी आणि तुकाराम महाराज हे महान संत होऊन गेले त्या प्रांताची यात्रा (प्रवास-दौरा) माझ्यासाठी कुठल्याही तीर्थयात्रेपेक्षा कमी नाही.'

### जन्म आणि उपदेश (१९ फेब्रुवारी १६३०)

शहाजी भोसले यांच्या पत्नी जिजाबाई यांनी संभाजी आणि शिवाजी या दोन पुत्रांना जन्म दिला. मोठा मुलगा महाराष्ट्रापासून दूर कर्नाटकात होता आणि लहान वयातच त्याचे निधन झाले. दुसरा पुत्र शिवाजी पुणे जिल्ह्याच्या उत्तरेकडील जुन्नर शहराजवळील शिवनेरीच्या किल्ल्यात जन्मला. त्यांच्या मातेने देवी शिवाईला पुत्राच्या कल्याणासाठी प्रार्थना केली होती, म्हणून जिजाबाईंनी आपल्या मुलाचे नाव त्याच देवीच्या नावावर 'शिवाजी' असे ठेवले.

शिवाजी १६४१-४२ मध्ये पुण्यात आले. त्यावेळी ते बारा वर्षांचे होते. त्यांच्यासोबत काही विश्वासू आणि अनुभवी लोक आणि काही इतर अधिकारी देखील होते. त्यांच्या आई जिजामाता या अफाट क्षमता, कणखर मनाच्या आणि दृढनिश्चयी व अत्यंत सुसंस्कृत होत्या. शिवाजी महाराजांचे संगोपन जिजामातेच्या देखरेखीखाली झाले. जिजामातेच्या संस्कार व शिकवणुकीमुळेच शिवाजी महाराजांमध्ये स्वधर्माविषयी स्वाभिमान आणि संस्कृतीविषयी आदराची भावना निर्माण झाली. जिजामातेच्या मार्गदर्शनामुळे शिवाजी महाराजांना भारताच्या अमूल्य सांस्कृतिक परंपरा, धार्मिक श्रद्धा आणि सहिष्णु दृष्टिकोनाविषयी अभिमान निर्माण झाला.

### विजयी शिवराय आणि त्यांचे मराठा साम्राज्य

किल्ले : छत्रपती शिवाजी महाराजांनी किमान दोनशे चाळीस किल्ले आणि गड सर केले आणि बांधले. मोगलांविरुद्ध त्यांनी जीवनभर केलेल्या संघर्षाच्या वेळी, मोगलांशी झालेल्या विविध युद्धाच्या वेळी या दुर्गम किल्ल्यांचे महत्त्व सिद्ध झाले. जिंकण्यास अतिशय दुर्गम व बळकट अशा या किल्ल्यांमुळेच शिवाजी महाराज स्वराज्य उभारू शकले, ही वस्तुस्थिती आहे. शिवरायांचे हे किल्ले आजही युवापिढीला प्रेरणा देतात व आमच्या पराक्रमी वीरांची आठवण करून देतात. लष्करी आणि प्रशासकीय या दोन्ही क्षेत्रात छत्रपतींनी सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावली, हे निर्विवाद आहे.

**लष्करी व्यवस्थापन** : शिवाजी महाराज त्यांच्या लष्करी प्रशासनात अतिशय कुशल होते. त्यांच्या शत्रूपेक्षा त्यांचे सैन्य संख्येने खूपच कमी असले तरी गुणवत्तेत शत्रूच्या तोडीस तोड होते. अतिशय जलद हालचाली, प्रचंड आक्रमक वृत्ती, चपळाई, वाऱ्याच्या वेगाशी स्पर्धा करता येईल एवढी गतिशीलता, गनिमी कावा ही त्यांच्या सैन्याची वैशिष्टे होती. त्यामुळेच बलाढ्य मोगली व आदिलशाही फौजेचा छत्रपती शिवरायांनी हातघाईच्या युद्धात सडकून पराभव केला, असे इतिहास सांगतो. शिवरायांनी आपल्या सैन्यात कडक शिस्त लागू केली आणि केवळ लष्करी कौशल्येच नाही तर देशभक्तीसाठी देखील आवाहन केले.

शिवाजी महाराजांनी लष्करी व्यवस्थापनाद्वारे संख्येने कमी असलेल्या आपल्या सैन्याचा सर्वोत्तम वापर केला. नैसर्गिक रीत्या अजिंक्य असलेले शिवाजी महाराजांचे डोंगरी किल्ले जिंकणे मोगलांना मुळीच सोपे नव्हते. साधारणपणे एका किल्ल्यामध्ये किमान पाचशे सैनिक असायचे, परंतु काही विशेष व महत्त्वाच्या किल्ल्यांवर मोठ्या संख्येत सैनिक असायचे. संपूर्ण किल्ला आणि त्याच्या चौकीची संपूर्ण जबाबदारी कधीही कोणत्याही एका अधिकाऱ्याला देण्यात येत नव्हती. प्रत्येक किल्ल्यावर एक हवालदार, एक सबनीस आणि एक सुभेदार असावा; हे तिघे अधिकारी समान दर्जाचे असावेत व या तिघांनी मिळून प्रशासन चालवावे, अशी व्यवस्था होती. किल्ल्यात धान्य आणि युद्ध साहित्याचा साठा ठेवण्याचीही यंत्रणा होती. यासाठी एका अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येत होती. त्याला कारखानीस म्हणत असत. उत्पन्न आणि खर्चाचे सर्व हिशेब त्याच्याच देखरेखीखाली लिहिले जात होते.

### छत्रपती शिवरायांचा प्रभाव

ख्यातनाम इतिहासकार स्कॉट-वॉरिंग म्हणतात की, छत्रपती शिवाजींनी आपल्या हयातीत चारशे मैल लांब आणि एकशे वीस मैल रुंद अशा विस्तीर्ण क्षेत्रात आपली सत्ता स्थापित केली होती. त्यांचे किल्ले भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पसरलेल्या पर्वतरांगांमध्ये पसरलेले होते. नियमित तटबंदीमुळे मोकळे रस्ते बंद झाले, प्रत्येक खिंड किल्ल्यांद्वारे नियंत्रित केली जात असे. शत्रूने हल्ला केल्यास किल्ल्यावरील उंच खडकावरून दगडधोंडे फेकले जात जेणेकरून शत्रूचे सैन्य, हत्ती आणि गाड्यांची गती कमी व्हावी.

सतराव्या शतकात मुघल साम्राज्य काबूल प्रांतापासून त्रिचनापल्लीपर्यंत, गुजरातपासून आसामच्या सीमेपर्यंत पसरले होते. देशाच्या जवळपास प्रत्येक भागात मुघल सम्राटाची सत्ता होती. परंतु १७१९ मध्ये, औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बारा वर्षांच्या आतच मराठ्यांनी थेट दिल्लीताब्यात घेतली आणि मुघल राजधानीच्या मुख्य रस्त्यांवर कूच केले. १७४० पर्यंत मराठ्यांनी माळवा आणि बुंदेलखंडवर वर्चस्व गाजवले; १७५१ मध्ये त्यांनी ओडिशावर आक्रमण केले आणि बंगाल आणि बिहारमधून चौथाई वसूल केली. १७५७ मध्ये त्यांनी गुजरातची राजधानी अहमदाबाद जिंकली आणि १७५८ मध्ये त्यांनी पंजाब ताब्यात घेतला आणि अटकच्या किल्यावर मराठा ध्वज फडकवला.

मराठ्यांनी परकीय शत्रूंशी लढण्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली. त्यांनी उत्तर कोकण पोर्तुगीजांपासून मुक्त केले आणि अफगाणिस्तानातून आक्रमकांना हाकलून लावण्यासाठी पानिपतच्या युद्धभूमीवर आपले प्राण अर्पण केले. १७८४ मध्ये मुघल सम्राट स्वतः महादजी शिंदे यांच्या छत्रछायेखाली आला आणि १७८४ ते १८०३ पर्यंत दिल्लीतील लाल किल्ल्याच्या तटबंदीवर मराठ्यांचा जरीपटका अभिमानाने फडकत होता. फॉरेस्टने म्हटल्याप्रमाणे, १८०३ मध्ये अस्सीच्या लढाईनंतरच ब्रिटिशांचे भारतावर वर्चस्व स्थापन झाले. पण जर शिवाजी महाराजांचा जन्म झाला नसता आणि १८ व्या शतकात छत्रपती शिवरायांनी केलेल्या क्रांतीने मोगल साम्राज्याचे अवशेष नष्ट केले नसते तर भारतीय इतिहास कदाचित वेगळा आणि विनाशकारी मार्गाने गेला असता.

जेव्हा समाज आत्मविस्मृत होतो, तेव्हा त्या समाजात अनेक प्रकारचे दोष उत्पन्न होतात. आपसात स्वार्थभाव निर्माण होऊन कलह होतो आणि या परिस्थितीचा परकीयांनाच लाभ होतो आणि सर्वसामान्य रयतेचे जगणे कठीण होते. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने सुलतान आणि परकीय सत्तांशी संघर्ष करत भारताच्या इतिहासात प्रदीर्घ काळाने हिंदूपदपातशाहीचे स्वतंत्र सिंहासन निर्माण केले. जेव्हा जेव्हा आपल्या देशावर आणि धर्मावर संकटे येतील, आक्रमणे होतील तेव्हा तेव्हा शिवरायांचा हा अपूर्व राज्याभिषेक सोहळा आम्हाला प्रेरणा देत राहील. एवढे या राज्याभिषेकाचे महत्त्व आहे. या सोहळ्याने हिंदू समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. म्हणूनच या राज्याभिषेक सोहळ्याचे हिंदू समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**(विचार विनिमय न्यास, दिल्लीवरून साभार )**

## पर्यावरण

# वाढत्या वाळवंटीकरणाने पृथ्वीवर संकट

## अनेक देशांतील धान्य उत्पादनात घट

योगेश कुमार गोयल

पृथ्वीचे वाढते तापमान अर्थात ग्लोबल वॉर्मिंग आज जगातील सर्वाधिक गंभीर चिंतेचा विषय समजला जातो. पर्यावरण संरक्षण व पर्यावरण संतुलन कसे राखावे यावर जगातील वैज्ञानिक व पर्यावरण तज्ज्ञ सातत्याने विचारमंथन करीत आहेत. एकीकडे ग्लोबल वॉर्मिंगचे संकट वाढत असतानाच दुसरीकडे वेगाने वाढणारे वाळवंटीकरण आज जगातील सर्वाधिक गंभीर समस्या बनत चालली आहे. या वाळवंटीकरणाचा एकूणच जागतिक पर्यावरणावर खोलवर परिणाम होत आहे. वाळवंटीकरण म्हणजे वाळवंटाचा मोठा विस्तार, ज्यामुळे विशेषतः कोरड्या भागात सुपीक जमीन नापीक जमिनीत परिवर्तित होत आहे. यावर लवकरात लवकर उपाययोजना न केल्यास संपूर्ण पृथ्वीवरच भीषण संकट कोसळणार, हे निश्चित आहे. यासाठी भौगोलिक बदलांबरोबरच मानवी क्रियाकलापही मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत. कोरडवाहू क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र की जेथे दाट हिरवळ वाढण्यास आवश्यक एवढा किंवा पुरेसा पाऊस पडत नाही. जगातील एकूण भूभागापैकी सुमारे ४० टक्के क्षेत्र (सुमारे ५४ दशलक्ष चौरस किलोमीटर) हे कोरडे क्षेत्र आहे आणि अशा कोरड्या-शुष्क भागात वाळवंटीकरण अधिक प्रमाणात दिसून येते.

जागतिक स्तरावर वाळवंटाच्या वाढत्या साम्राज्यामुळे अनेक देशांतील अन्नधान्य उत्पादनात घट होत आहे. याचा परिणाम केवळ मानवजातीवरच होत नसून सर्व प्राण्यांच्या प्रजातींवरही त्याचे भयंकर दुष्परिणाम होत आहेत. आंतरराष्ट्री सहकार्याने जागतिक स्तरावर वाळवंटीकरणाचा मुकाबला करण्यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येतात. वाळवंटीकरण आणि दुष्काळाची वाढती आव्हाने लक्षात घेता लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९९४ मध्ये वाळवंटीकरणाला प्रतिबंध करण्यासाठी प्रस्ताव मांडला होता. यानिमित्त नागरिकांना पाणी आणि अन्नसुरक्षेसोबतच परिस्थितिकी तंत्र अर्थात इकोसिस्टीमसंबंधी जागरूक करणे तसेच प्रत्येक स्तरावर दुष्काळाचा प्रभाव कमी करण्यासाठी कार्य करणे आणि धोरणकर्त्यांवर वाळवंटीकरणाशी संबंधित धोरणे तयार करण्यासाठी आणि ते रोखण्यासाठी कृती योजना तयार करण्यासाठी दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

जगातील ९५ टक्के अन्नधान्य शेतजमिनीवर तयार केले जाते, जी आपल्या अन्नप्रणालीचा आधार आहे. परंतु चिंताजनक बाब म्हणजे, या जमिनीचा एक तृतीयांश भाग सध्या निकृष्ट आहे, ज्यामुळे जगभरातील ३.२ अब्ज लोक प्रभावित झाले आहेत, विशेषतः ग्रामीण समुदाय आणि लहान शेतकरी जे यावर अवलंबून आहेत त्यांच्यावर वाळवंटीकरणाचा थेट परिणाम होतो. यामुळे उपासमार, दारिद्र्य, बेरोजगारी असे दुष्परिणाम होतात आणि लोकांना उपजीविकेसाठी जबरदस्तीने स्थलांतर करावे लागते. हवामानातील बदलामुळे या समस्या अधिकच तीव्र होतात. ज्यामुळे शाश्वत जमीन व्यवस्थापन आणि शेतीपुढे गंभीर आव्हाने निर्माण होतात आणि यामुळे परिस्थितीकी तंत्रातील लवचिकता कमकुवत होते.

हवामान संकट दुष्काळ, पूर आणि जंगलातील आगींमुळे वाळवंटीकरण वाढवत आहे. एकीकडे वाळवंटीकरणाची समस्या वाढत चालली आहे, तर दुसरीकडे वाळवंटीकरणामुळे हवामानाचे संकट अधिक गंभीर होत आहे. म्हणजेच वाळवंटीकरण आणि हवामान संकट एकमेकांशी जोडलेले आहेत. हवामानाच्या संकटात जमिनीच्या ऱ्हासाची अर्थात भू-क्षरणाचीही मोठी भूमिका आहे. पर्यावरणवाद्यांच्या मते, वातावरणात असलेल्या कार्बनच्या तुलनेत मातीमध्ये तीनपट जास्त कार्बन आहे आणि पृथ्वीवर असलेल्या कार्बनचा सर्वात मोठा साठा मातीमध्येच आहे.

> वेगाने वाढणारे वाळवंटीकरण आज जगातील सर्वाधिक गंभीर समस्या बनत चालली आहे, ज्याचा पर्यावरणावर खोलवर परिणाम होत आहे. वाळवंटीकरण म्हणजे वाळवंटाचा मोठा विस्तार, ज्यामुळे विशेषतः कोरड्या भागात सुपीक जमीन नापीक जमिनीत परिवर्तित होत आहे. यावर लवकरात लवकर उपाययोजना न केल्यास संपूर्ण पृथ्वीवरच भीषण संकट कोसळणार, हे निश्चित आहे.

**पर्यावरणावर होतोय् गंभीर परिणाम**



मातीतून कार्बन उत्सर्जन होऊन वातावरणात पोहोचल्याने जागतिक तापमानात वाढ होत असून वाळवंटीकरणामुळे ही समस्या आणखी तीव्र होत आहे. पृथ्वीच्या सतत वाढत असलेल्या तापमानामुळे सौरऊर्जा आणि हवेच्या स्वरूपातही बदल होत आहेत. आकडेवारीनुसार, जगभरातील एकूण कार्बन उत्सर्जनाच्या १०-१२ टक्के (३.६-४.४ बिलियन टन) उत्सर्जनासाठी भू-क्षरण कारणीभूत आहे आणि भारत हा जगातील तिसरा सर्वांत मोठा कार्बन उत्सर्जन करणारा देश मानला जातो, जिथे एकूण उत्सर्जित कार्बन डायऑक्साईडच्या तुलनेत भू-क्षरण (जमिनीची धूप) च्या ५० टक्के जास्त कार्बन डायऑक्साईड उत्सर्जित होत आहे. दुष्काळामुळे वाळवंटीकरणाची प्रक्रिया गतिमान होते आणि भारतातील लोकसंख्येचा मोठा भाग कोरड्या, शुष्क भागात राहतो. देशातील सुमारे ७० टक्के भूभाग (सुमारे २२.८३ कोटी हेक्टर) कोरडा समजला जातो आणि या कोरडवाहू जमिनीची उत्पादकता खूपच कमी आहे. देशातील सुमारे ७.३६ कोटी हेक्टर क्षेत्रफळ वाळवंटीकरणामुळे प्रभावित झाले आहे आणि भारतातील अनेक क्षेत्रे नेहमीच दुष्काळाच्या गर्तेत असतात.

जगात सध्या असलेल्या एकूण गुरांपैकी ८ टक्के गुराढोरांचे पालन भारतात केले जाते, तर जगात सध्या असलेल्या एकूण कुरणांपैकी केवळ अर्धा टक्के कुरणच भारतात आहे. त्याचप्रमाणे, भारताकडे जगाच्या एकूण भूभागापैकी केवळ २.४ टक्के भूभाग आहे परंतु एकूण मानवी लोकसंख्येच्या १८ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या आपल्या देशात आहे. जगातील इतर कोरडवाहू भागांपेक्षा भारतातील कोरडवाहू, शुष्क भागात मानवी लोकसंख्या आणि पशुधनाचा दबाव खूप जास्त आहे. मानव आणि गुरांचा हा असह्य दबाव वाळवंटीकरणाची समस्या वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

मानवाच्या अनावश्यक दबावामुळे कोरड्या-शुष्क भागाची नैसर्गिक व्यवस्था (तंत्रप्रणाली) कोलमडू लागते आणि ही विध्वंसक प्रक्रिया थांबवली नाही तर संपूर्ण नैसर्गिक प्रणालीचे रूपांतर वाळवंटात होते. लाकडासाठी झाडांची अंदाधुंद छाटणी किंवा जास्त चराईमुळे, त्या प्रणालीतील नैसर्गिक उपयुक्त वनस्पतींची संख्या लक्षणीय रीत्या कमी होते, ज्याची जागा निरुपयोगी आणि अखाद्य झाडे आणि वनस्पती घेतात, ज्याचा परिणाम म्हणजे ही नैसर्गिक व्यवस्था पूर्वीपेक्षा खूप कमी प्रमाणात मानव आणि गुरेढोरे यांना आधार देऊ शकते आणि हे दुष्टचक्र वाळवंटीकरणाला गती देते.

वाळवंटी भागात पाऊस खूप अनियमित असल्याने, अशा भागात उपलब्ध असलेल्या मर्यादित पाण्याचा कृषी उत्पादकतेवर लक्षणीय परिणाम होतो. कोरडवाहू भागात पाऊस कमी असला, तरी पडणारा पाऊस हा अतिशय जोरदार व वादळी स्वरूपाचा असतो, त्यामुळे अशा भागांतील पाऊस अनेकदा पुराचे स्वरूप घेऊन सुपीक जमिनी वाहून नेतो व तेथे मोठमोठे खड्डे व नाले तयार होतात, जे बऱ्याचदा शेतीसाठी निरुपयोगी ठरतात. त्यामुळे अनेक भागात वाळूचे मोठे ढिगारे तयार झाले आहेत. एका अंदाजानुसार, दरवर्षी नापीक क्षेत्रात प्रतिहेक्टर क्षेत्रातून पाण्याच्या प्रवाहामुळे १६.३५ टन माती वाहून जाते.

वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे वाळवंटीकरणाची प्रक्रिया गतिमान होते. मातीची धूप होण्याचा एक दुष्परिणाम म्हणजे पाण्याने वाहणारी माती जलाशयांमध्ये भरते, त्यामुळे त्यांची पाणी धारण करण्याची क्षमता कमी होत आहे आणि त्यामुळे पूरस्थिती गंभीर बनते. गेल्या काही वर्षांपासून देशातील अनेक भागात लाखो लोकांना पावसामुळे आलेल्या पुराच्या संकटाचा सामना करावा लागत आहे, हे त्याचे सर्वात मोठे कारण आहे. एवढेच नाही तर मोठमोठ्या जलविद्युत प्रकल्पांच्या तलावांमध्ये गाळ साचल्याने त्यातून निर्माण होणाऱ्या विजेचे प्रमाणही कमी होते.

वातावरणातील कार्बन कमी करण्याच्या प्रश्नाविषयी बोलायचे झाल्यास, तापमान दीड अंश सेल्सिअसने कमी करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वातावरणातील कार्बन झपाट्याने शोषून घेण्याची गरज आहे आणि पर्यावरणवाद्यांच्या मते, हे नैसर्गिक कार्बन सिंकची क्षमता वाढवूनच केले जाऊ शकते आणि जंगले आणि शेतीच्या समस्यांची तीव्रता कमी करणाऱ्या सिंक यंत्रणेद्वारे (मॅकॅनिझम) एक तृतीयांशपेक्षा जास्त हवामान संकट कमी केले जाऊ शकते ज्यामुळे होतात. यासाठी जंगले, कुरणे आणि माती यामधील कार्बन साठवणे हा सर्वोत्तम मार्ग आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. यामुळे वाळवंटीकरण रोखण्यास मदत होऊ शकते.

वनीकरण, वनस्पती आच्छादन सुधारणे, पाण्याचा काटकसरीने व नियाजनबद्ध वापर, चांगल्या कृषी पद्धतींद्वारे मातीची धूप कमी करणे इत्यादी उपायांद्वारे जमिनीतून बायोमास उत्पादन आणि सेंद्रिय कार्बन सामग्री (कंटेंट ) सुधारणे शक्य आहे. जंगलतोड थांबवून आणि पुन्हा झाडे लावून २०५० पर्यंत १५० अब्ज टनांपेक्षा अधिक कार्बन कमी केला जाऊ शकतो आणि या काळात शेतजमिनीव्यतिरिक्त ३०-६० अब्ज टन कार्बन कोरड्या भागात साठवला जाऊ शकतो, असे पर्यावरणवाद्यांचे मत आहे. मात्र, वाळवंटीकरणाच्या वाढत्या समस्येमुळे कृषी उत्पादकतेत जी घट होत आहे त्यामुळे सुमारे २५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. चिंताजनक परिस्थिती अशी आहे की, भारतासारख्या विकसनशील देशात सतत वाढणाऱ्या लोकसंख्येच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी शेतीची उत्पादकता वाढवण्याची गरज भासू लागली आहे. परंतु वाढत्या वाळवंटीकरणामुळे धोरणांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्याची आवश्यकता आहे.

***(पांचजन्यवरून साभार)***